सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, १६ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २३२ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# मोदींनी देश सुरक्षित आणि समृध्द केला : अमित शहा



तभा वृत्तसेवा
हिंगोली, १५ नोव्हेंबर

देशात सर्वत्र बॉम्बस्फोट होत असतांना तत्कालीन सोनिया गांधी आणि मनमोहनसिंग यांचे काँग्रेसचे सरकार शांत बसले होते. परंतु आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने पाकीस्तानात घुसून सर्जिकल स्ट्राईक करून अतिरेक्यांचा खात्मा केला. मोदी यांनी देशाला सुरक्षित व समृध्द बनविण्याचे काम केले, असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी हिंगोली येथील जाहीर सभेत केला.

भाजप महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचारार्थ आयोजित रामलीला मैदानावरील जाहीर सभेत बोलतांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार टीका केली. यावेळी बोलतांना अमित शहा म्हणाले की, काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांनी राहुल गांधी यांना लॉन्च करण्याचे वीस वेळा प्रयत्न केले. आता २१ वा प्रयत्न देखील फोल ठरणार असल्याची टीका केली. कश्मीरमधील ३७० कलम पुन्हा लागू करण्याचा प्रस्ताव काँग्रेस पक्षाने आणला आहे मात्र गांधी घराण्याची चौथी पिढीही हे कलम पुन्हा लागू करू शकणार नाही. काँग्रेसने ७०वर्ष राम मंदिर अडवून ठेवले होते मात्र पंतप्रधान मोदी यांनी पाच वर्षातच केसही जिंकली, भूमीपूजन केले, मंदिर उभारले आणि प्रभू रामचाची प्राणप्रतिष्ठाही केली. यावर्षी प्रथमच प्रभू श्रीरामाची दिवाळी भव्य राम मंदिरात झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पुढे बोलतांना ते म्हणाले की, राज्यातील मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार सरकार गरजू जनतेला समर्पित असून जनतेला घरे, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, धान्य, मोफत गॅस सिलेंडर आता पाच लाख रूपयांपर्यंत मोफत औषधोपचाराची व्यवस्था केल्याचेही शहा यावेळी म्हणाले. महायुतीच सरकार दिव्यांग, वृध्द आणि विधवांना दरमहा १५०० रूपये सेवानिवृत्ती वेतन देणार असल्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. यावेळी भाजप महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आ. गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, शहराध्यक्ष कैलाशचंद्र काबरा यांची उपस्थिती होती.

## आता विजेऐवजी थेट 'हायड्रोजन' वर धावणार रेल्वे

नवी दिल्ली : जगामध्ये रेल्वे नेटवर्क हे खूप मोठं नेटवर्क आहे. प्रवासासाठी लाखो लोक तिचा वापर करत असतात. भारतात पुढच्या महिन्यात, डिसेंबर २०२४ मध्ये दळणवळण क्षेत्रात क्रांती येणार आहे. भारतीय रेल्वेसुद्धा आपल्या गाड्या आणि डब्याचं आधुनिकीकरण करत आहे आणि प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन ट्रेन सुरू करत आहे. देशात रस्त्यांचे जाळे घट्ट आहेत. तर आता मोदी सरकारने रेल्वेचे जाळे पण दाट करण्यावर भर दिला आहे. पुढच्या महिन्यात हायड्रोजनवर चालणारी पहिली ट्रेन भारतीय रेल्वेच्या ताफ्यात दाखल होणार आहे. रेल्वे प्रवाशांसाठी पर्यावरणाला अनुकूलतेसोबतच आरामदायक असल्याचा दावा करण्यात येत आहे. डिझेल आणि वीजेशिवाय ही रेल्वे धावणार आहे. रेल्वेची गतीशीलता तर वाढेलच पण पर्यावरणवर जपण्यात मोलाचा हातभार लागेल. ही पाण्यावर चालणारी ट्रेन लवकरच रुळांवरून थिरकणार आहे. या आगामी हायड्रोजन ट्रेनचे मार्ग, वेग आणि वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्ये येथे आहेत. देशात पहिल्यांदाच रेल्वे पाण्यावर धावणार आहे. प्रगत हायड्रोजन इंधन तंत्रज्ञानाद्वारे हे साध्य केले जाईल. ही ट्रेन वीज तयार करण्यासाठी पाण्याचा प्राथमिक स्त्रोत म्हणून वापर करेल. लवकरच हायड्रोजन ट्रेनचा पायलट प्रोजेक्ट सुरू होणार आहे. या ट्रेनला प्रति तास सुमारे ४०,००० लिटर पाण्याची आवश्यकता असणार आहे आणि या ऑपरेशनला समर्थन देण्यासाठी विशेष पाणी साठवण सुविधा तयार केल्या जातील.यामुळे पार्यावरणाचं नुकसान होणार नाही

## बीकेसी मेट्रो स्थानकात भीषण आग!

मुंबई : मुंबईतील बीकेसी मेट्रो स्थानकात आज दुपारी १ वाजून ९ मिनिटांच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत मेट्रोचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे प्राथमिक वृत्त आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बीकेसी मेट्रोच काम सुरू असताना वेल्डिंगमुळे खाली ठेवलेल्या लाकडी समानाने पेट घेतल्यामुळे ही घटना घडली. ४०-५० फूट खाली आग लागली असून या ठिकाणी मेट्रो स्थानकाचे काम सुरू होते १०० बाय ६० फूट च्या भागात हे काम सुरू होते या ठिकाणी लाकडं आणि इतर साहित्य असलेल्या भागात ही लागली. त्यामुळे संपूर्ण मेट्रो स्टेशनवर धूराचे लोट पसरले होते.

आगीची माहिती मिळताच घटनास्थळी तातडीने अग्निशमन दलाचे १० ते १२ बंब दाखल झाले. तसेच प्रशासनाकडून सर्व मेट्रो ऑपरेशन्स थांबवून मेट्रो स्टेशनमधील सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात आले. या आगीचा फटका मेट्रो सेवेला बसल्यामुळे बीकेसी स्थानकावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली. आतापर्यंत मेट्रोच्या तीन फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. दुपारी अडीच वाजेच्या सुमारास आग विझवण्यात आली.

दरम्यान, आग पूर्णपणे नियंत्रणात आणल्यानंतर दुपारी २ बाजून ४५ मिनिटांनी परवानगी मिळाल्यानंतर बीकेसी स्थानकावरील सेवा पूर्ववत करण्यात आल्या. तसेच या घटनेत कोणतीही दुखापत किंवा जीवितहानी झाली नसून प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत असे मेट्रोने म्हटले आहे.




# उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी निधी कमी पडू देणार नाही : एकनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ नोव्हेंबर**

महायुतीच्या काळात दोन वर्षात आमदार बालाजी कल्याणकर यांनी २ हजार ५०० कोटींचा विकास निधी आणला. यापुढेही उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी कल्याणकर यांना निधी कमी पडू देणार नाही, अशी हमी मुख्यमंत्र्यांनी दिली.

शहरातील भक्ती लॉन्स येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार अशोक चव्हाण, प्रवीण साले, उमेदवार बालाजी कल्याणकर, आनंद बोंढारकर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, मराठवाडा हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. मुंबई, ठाण्यानंतर बाळासाहेबांनी मराठवाड्यावर प्रेम केले. शिवसेना आणि मराठवाड्याचे वेगळे नाते आहे. इथले अनेक कार्यकर्ते, नेत बाळासाहेबांच्या विचारांनी प्रेरित झाले. महाविकास आघाडीच्या काळात कल्याणकर यांना एक रुपया निधी मिळाला नव्हता, परंतु महायुतीच्या काळात अडीच हजार कोटी देण्यात आले. नांदेड उत्तर मतदार संघात ७० हजार लाडक्या बहिणींना पाच महिन्यांचे पैसे दिले. महायुतीचे सरकार आल्यानंतर इथ एमआयडीसी मंजूर करु, असे



आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. ते पुढे म्हणाले की, काँग्रेस, उबाठा आणि तुतारीचे लोक या योजनेच्या विरोधात केले आणि कोर्टात गेले मात्र कोर्टाने फटकारले, असे मुख्यमंत्री म्हणाले. या योजनेत महिलांना १५०० रुपयांवर ठेवणार नाही. त्यांना लखपती करायचे आहे. कोणीही आले तरी लाडकी बहिण योजना बंद करणार नाही, असा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला. कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, राजस्थानमध्ये निवडणुकीत काँग्रसने खोटी आश्वासने देऊन सत्तेत आले आणि जनतेची फसवणूक केली, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली. डॉ. बाबासाहेबांना दोनवेळा काँग्रेसने हरवले. काँग्रेस जळके घर आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. अशोक चव्हाण यांनी ते ऐकले आणि ते महायुतीत आल्याने या जिल्ह्यात महायुतीची ताकद वाढली.

लाडके भाऊ, ज्येष्ठ नागरिक, शेतकऱ्यांसाठी महायुतीच्या वचननाम्यात १० आश्वासने दिली आहेत. यात महायुती सरकारने लाडक्या बहिणीला २१०० रुपये देण्याचा निर्णय घेतलाय, असे मुख्यमंत्री म्हणाले. त्याशिवाय शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि वर्षाला १५००० रुपये, वृद्धांचे पेन्शन २१०० रुपयांपर्यंत वाढवणार, प्रत्येकाला अन्न आणि निवारा देणार, २५ लाख रोजगार आणि १० लाख तरुणांना १० हजार रुपयांना दरमहा प्रशिक्षण भत्ता देण्याचा निर्णय घेतला असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. महायुतीच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी मतदारांना केले.

## मतदानादिवशी पुणे मार्केट यार्ड राहणार बंद!

पुणे: महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या बुधवारी (दि. २०) मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. राज्यातील प्रत्येक नागरीकाला लोकशाहीच्या या प्रक्रियेत सहभागी होता यावे, यासाठी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डातील मुख्य बाजारासह उपबाजार बंद ठेवण्यात येणार आहे. यामध्ये, मुख्य बाजारातील फळ-भाजीपाला, कांदा-बटाटा विभाग, केळी आणि गुरांचा बाजार, गुळभुसार विभाग, भुईकाटा केंद्र, पेट्रोप पंप, फुल बाजार, पान बाजार तसेच मोशी, पिंपरी, मांजरी, उत्तमनगर व खडकी येथील उपबाजार बंद राहणार आहेत. याची शेतकर्यांनी नोंद घ्यावी, शेतीमाल विक्रीस आणू नये तसेच ग्राहकांनी खरेदीस येऊ नये, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांनी परिपत्रकच्या माध्यमातून केले आहे




# कांद्याच्या वाढत्या दराची मुख्यमंत्र्यांकडून दखल

मुंबई: सर्वसामान्य नागरिकांना कांद्याच्या वाढत्या दराचा फटका बसत असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. मर्यादेबाहेर कांद्याची साठवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी अन्न व नागरी पुरवठा तसेच पणन विभागाला दिले आहेत. मोठ्या आणि लहान व्यापाऱ्यांना त्यांनी किती कांदा साठवणूक करावी ती मर्यादा दिली निश्चित केली आहे. मात्र, सध्या काही व्यापारी बेकायदेशीरपणे कांद्याची साठवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले असून पर्यायाने कांद्याचे दर वाढत आहेत.

अशा कांदा व्यापाऱ्यांवर 'जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५' व 'काळा बाजार प्रतिबंध आणि जीवनावश्यक वस्तूंचा सुरळीत पुरवठा अधिनियम १९८०' अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी पुरवठा विभागाला दिले आहेत. राज्यात नागरिकांना कोठेही बेकायदेशीर कांद्याची साठेबाजी निदर्शनास आल्यास त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील पुरवठा विभागात माहिती द्यावी, असेही मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले आहे. कांद्यासाठी राज्य सरकारने ३५० रुपये प्रतिक्विंटल अनुदान देण्याचा निर्णय घेतला असून अनुदानाचे वाटप सुरू आहे. त्यासाठी या वर्षात ८५१ कोटी ६७ लाख रुपये तरतूद देखील करण्यात आली आहे

# महाराष्ट्राची लूट करणाऱ्याच्या हातात राज्य देणार का?

तभा वृत्तसेवा

कन्नड - दोन उद्योजक आणि दोन मोठे राजकारणी यांनी महाराष्ट्राची लूट सुरू केली आहे. मुंबई अदानीच्या घश्यात घालण्याचे पाप करणाऱ्या आणि महाराष्ट्राची भरभराट करणारे उद्योग गुजरातला पळवून महाराष्ट्राची लूट करणाऱ्या दरोडेखोरांच्या हातात राज्य देऊ नका, असे आवाहन शिवसेना (उबाठा गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार उदयसिंग राजपूत यांच्या प्रचारार्थ कन्नड शहरातील गिरणी मैदान येथे आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते.



या वेळी पुढे बोलतांना ते म्हणाले की, खोके घेऊन धोके देणाऱ्यांना, लोकसभा निवडणुकीत सपाटून मार बसल्यानंतर तुमची आठवण झाली आहे. महिलांना महिन्याला दीड हजार रुपये देताहेत मात्र राज्यातील महिला, मुली सुरक्षित आहेत का? याचे त्यांना काही देणे घेणे नाही. देशाच्या प्रधानमंत्री आणि गृहमंत्र्यांनी देश वाऱ्यावर सोडलाय. केवळ थापा मारून गार करण्याचे काम भाजप करत असल्याने, मी त्यांना लाथ मारली आणि आघडीचे सरकार स्थापन केले. हे सरकार व्यवस्थितपणे काम करत असताना यांचा पोटशूळ उठला आणि यांनी सरकार पाडले. तरीही मला राहिलेल्या अडीच वर्षात जी कामे करायची होती, ती आता पुढील ५ वर्षात करणार. केंद्र सरकारवर टीका करताना ते म्हणाले की, भाजपचे हिंदुत्व हे घरे पटविणारे तर आमचे हिंदुत्व हे गोरगरिबांच्या घरातील चुली पेटविणारे, बेरोजगारांना रोजगार देणारे, शेतकऱ्यांची कर्जमाफी करणारे, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव देणारे आहे. त्यांची सगळी धोरणे ही राज्यातील शेतकऱ्यांच्या मुळावर असलेली आहेत. शेतकऱ्यांचा माल बाजारात येण्याची चाहूल लागताच हे तोच माल आयात करतात मात्र आम्ही सत्तेवर येताच हे चित्र बदलून दाखवू.जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती काहीही झाले तरी कितीही अडचणी आल्या तरी कायम ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्रीजयाच्या नावातच विजय : एकनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**भोकर ,दि. १५ नोव्हेंबर**

उमेदवार श्रीजया चव्हाण यांच्या नावातच विजय असून विधानसभा निवडणुकीत तिचा विजय निश्चित असल्याचा ठाम विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

नांदेड लोकसभा उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे, भोकर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीजीया चव्हाण यांच्या प्रचारार्थ बारड येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार अशोक चव्हाण, खासदार हेमंत पाटील, संतोष पांडागळे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की श्रीजया चव्हाणला कै. शंकरराव चव्हाण, अशोक चव्हाण यांचा राजकीय वारसा लाभलेला आहे. हा वारसा सांभाळण्याचे काम श्रीजया चव्हाणला करायचे आहे, भोकर हा मतदारसंघ चव्हाण कुटुंबीयांचा बालेकिल्ला असून या बालेकिल्ल्यात श्रीजयाचे ब भविष्य उज्वल आहे. लाडक्या बहिणीच्या मदतीने या मतदारसंघात श्रीजया विजय मिळवणारच असा विश्वास व्यक्त करत केंद्रातून निधी खेचून आणण्यासाठी संतुक हंबर्डे यांना लोकसभेत पाठविण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.




केवळ अडीच वर्षाच्या कार्यकाळात महायुती सरकारने अनेक लोकोपयोगी योजना राबवल्या. लाडकी बहीण योजना, युवकांना प्रशिक्षण, शेतकऱ्यांचे कर्ज माफ, शेतकऱ्यांना दरवर्षी १२ हजार रुपये तर आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांचे मानधन १५ हजार रुपये करण्यात आले आहे. विशेष म्हणजे मुलींच्या शिक्षणाचा खर्च देखील सरकार उचलत असून हे घेणारे सरकार नसून देणारे सरकार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

या सभेत खासदार अशोक चव्हाण, खासदार हेमंत पाटील यांची भाषणे झाली.

# जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्ह्याची जाणिव असणारा खासदार हवा : डॉ. संतुक हंबर्डे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ नोव्हेंबर**

शेतकरी, शेतमजूर भाजीपाला उत्पादक, दुध विक्रेत्या कष्टकऱ्याच्या कुटूंबातून मी इथ पर्यंत तुमच्या सेवेसाठी आलो आहे. अता पर्यंतच्या नेत्यांना त्यांच्या कुटूंबाचा राजकिय वारसा होता. ते सतत सत्तेत राहीलेले आहे. त्यामुळे त्यांना सामान्य जनतेचा कळवळा नाही. मी अत्यंत सामान्य कुटूंबातून राजकारणात आलो आहे. आज पर्यंत तुम्ही दिलेला आशिर्वाद आणि पाठबळ यामुळे राजकारणात जनसेवा करता आली, परंतु खऱ्या अर्थाने विकासाची गंगा आपल्या पर्यंत पोहचवता आली नाही. याचे कारण आपण सत्तेतील खासदार नाही. देशात मोदींचे सरकार आहे. त्यामुळे आपल्या जिल्ह्याच्या विकासासाठी आपल्या जिल्ह्याची जाणीव असणारा खासदार मोदी सरकार मध्ये असणे आवश्यक आहे. यासाठी होत असलेल्या लोकसभेच्या पोटनिवडणूकसाठी कमळ या निशानीवरील बटन दाबून मला खासदार होण्यासाठी आशिर्वाद द्या. आपल्या सर्वांच्या विकासासाठी प्रमाणीक प्रयत्न करेल असा विश्वास नांदेड लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी दिला.

सांगवी (बु), सोनखेड, एकदारा, कासरखेडा, पुयणी, मगनपुरा, नवामोंढा, पटेल कॉलनी, हनुमापेठ, सामेश कॉलनी, हनुमानगढ, कॅनल रोड, येवला पिंपळगांव, डि.मार्ट परिसर, आंबेडकरनगर, सावळी, आरळी आदी भागात प्रचार बैठकांमधुने मतदारांशी बोलत होते. सांगवी येथील बैठकीला चैतन्यबापू देशमुख, मोहनसिंह तौर, प्रकाश कदम, श्याम कोकाटे, अभिलेश नाईक, सदाशिव पुरी, माधव कोकाटे, महेश निलावार, कांता पाटील पुय्यड, विश्वनाथ पाटील, संकेत अय्यर आदींची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या अध्यक्ष स्थानी राम अय्यर हे होते.



यावेळी मतदारांशी हितगुंज करतांना लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे म्हणाले भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे खऱ्या अर्थाने सर्वसामान्य कार्यकर्त्यांना निवडणूकांमध्ये उमेदवार होण्याची आणि आपले नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. बहुजनांचे नेतृत्व भाजपा सरकारमुळे उभे राहु शकले यामुळेच माझ्या सारख्या शेतकरी कुटूंबातील व्यक्तीला लोकसभेची उमेदवारी मिळाली आहे. पक्ष श्रेष्ठींनी उमेदवारी देवून त्यांनी त्यांची जाबाबदारी पुर्ण केली आहे. आता नांदेड लोकसभेत कमळ फुलवण्याची जबाबदारी आपल्या सर्व मतदारांची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या देशातील सर्व घटकांच्या विकासासाठी भरपूर दिले आहे. आता आपण त्यांना मतदान रुपाने काही देण्याची जबाबदारी आहे. नांदेड मधुन भाजपाचा खासदार जर लोकसभेत गेला ता लोकसभेतुन पाझरणारा विकास आपल्या भागा पर्यंत पोहवता येईल विकसीत भारतात नांदेडचा विकासही सुसाटपणे होईल. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात अधिक बळकट करण्यासाठी, शेतकऱ्यांसह सर्व घटकांच्या समान विकासासाठी मला खासदार म्हणून सेवा करण्याची मला संधी द्या आणि येत्या २० नोव्हेंबरला कमळ या निशानी वर बटन दाबून भाजपा महायुतीला विजयी करा. असे आवहान डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### पं. जवाहरलाल नेहरु यांचे देशासाठी मोठे योगदान : गुणवंत मिसलवाड



**नांदेड-**आपला भारत देश ब्रिटीशांच्या जोखडात असताना १९१२ मध्ये राष्ट्रपिता म. गांधी यांच्या विचारावर प्रभावित होऊन सरळ राजकारणात उडी घेऊन स्वातंत्र्य संग्राम चळवळीत ९ वेळा जेल भोगून पंडीत जवाहरलाल मोतीलाल नेहरु यांचे भारत देश स्वातंत्र्यासाठी व स्वातंत्र्यानंतर देशासाठी मोठे योगदान होते असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १४ नोव्हेंबर गुरुवार रोजी सकाळी १०:३० वा. आधुनिक भारताचे शिल्पकार, भारतरत्न, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांची १३५ वी जयंती बालदिन (चिल्ड्रन्स डे) म्हणून हर्षोल्हासात साजरी करण्यात आली, यावेळी ते बोलत होते. सर्वप्रथम आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, भारत देश सक्षमीकरणासाठी आपल्या १७ वर्षे पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात नऊ आंतरराष्ट्रीय देशांचा अभ्यास दौरा करुन लोकतंत्र मजबूत करणे, देशाची अर्थव्यवस्था, पंचवार्षिक योजना, कृषी, उद्योगात प्रगती, मोठ्या कारखान्यांसाठी मदत, ३८ कोटी लोकसंख्येच्या काळात आपल्या ७५ वर्षाच्या आयुष्यात संवैधानिकरित्या धर्मनिरपेक्ष त्यांचे कार्य होते, असेही ते शेवटी यावेळी म्हणाले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, आगार लेखाकार सतीश गुंजकर, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, पाळी प्रमुख गिरीश कुलकर्णी, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, गुलाम रब्बानी, सुनीता हुंबे, प्रियंका खरात, वैष्णवी गंदेवार, कृष्णा पवार, सिद्धार्थ जोंधळे, संगीता वाघमारे, संजय मंगनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास रा.प.म. आगारातील कामगार-कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

### लहुजी साळवे जयंती व म.ज्योतीबा फुले यांची पुण्यतिथी निमित्त नुतन कार्यकारणी

**लोहा-**लहुजी साळवे जयंती व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पुण्यतिथी निमींत्त नुतन कार्यकारणी जाहीर शहरातील लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे सास्कृतीक सभागृह येथे पांडुरंग विठ्ठलराव दाढेल मांतग समाज नेते व अण्णा भाऊ साठे पुर्णाकृती पुतळा समीती अध्यक्ष यांच्या अध्येक्षतेखाली बैठकीचे आयोजन करुन नुतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली जयंती मंडळाचे अध्यक्ष गोपाळ लोंढे तर उपध्यक्ष देवीचंद पिसोळे यांनी निवड जाहीर करण्यात आली कार्यकारणीचे सचिव चंद्रकांत धोंगडे, कोष्अध्यक्ष अमोल दाढेल, कार्यअध्यक्ष गणेश दाढेल यांची कार्यकारणी जाहीर केली. यावेळी चांदु भिसे, चांदु पाटोळे, उध्दव कंधारे, संदीप सावळे, गणेश दाढेल, चंद्रकांत धोंगडे, रवी भालेराव, माजी नगरसेव अनिल दाढेल,भारत दाढेल, शाम दाढेल, उमाकात दाढेल, आशीतोष दाढेल, राहुल दाढेल, प्रसाद दाढेल यासह समाज बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार अनिल दाढेल यानी केले.

### गरोदर मातेचे उपचारादरम्यान हृदयविकाराच्या धक्क्याने निधन

**आदमपूर-**मौजे थडीसावळी रहिवासी(सध्या वास्तव्यास गाव आदमपूर), ता.बिलोली येथील महिला संध्या शिवचंदन अनपलवार(३०) या गरोदर मातेचे दि.१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वा. नांदेड शहरातील खाजगी रूग्णालयात उपचारादरम्यान हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्याच दिवशी गुरूवारी दुपारी ३ वा. आदमपूर येथे शोकाकुल अंत्यसंस्कार करण्यात आले. या दुर्देवी दुहेरी मृत्यु पश्चात तालुका परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पती, सासू, सासरे, दीर, जाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्या ग्राम थडीसावळी येथील विद्यमान सरपंच शिवचंदन शंकरराव अनपलवार यांच्या पत्नी होत.



### कलावतीबाई पाटील सोळंके यांचे निधन

**नायगाव-**भोकर तालुक्यातील हाडोळी येथील रहिवासी जेष्ठ महीला कलावतीबाई केशवराव माली पाटील सोळंके वय ८० वर्ष यांचे आज दि. १५ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी सकाळी १२:३० वा. निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तिन मुल, एक मुलगी असा मोठा परिवार आहे. त्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष शंकरराव माली पाटील सोळंके यांच्या आजी होत. स्व. कलावतीबाई पाटील सोळंके यांच्यावर दि. १६ रोजी शनिवारी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत.



# कंधार येथे आज रुपालीताई चाकणकर यांची जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १५ नोव्हेंबर**

लोहा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार माननीय खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली ताई चाकणकर यांची कंधार येथे जाहीर सभा संपन्न होणार आहे.



लोहा मतदारसंघांमध्ये महायुतीचे उमेदवार माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांची जाहीर सभा चे आयोजन कंधार येथील नगरेश्वर मंदिर मंगल कार्यालय कंधार येथे ठीक सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे त्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# आ. मोहन हंबर्डे यांना विकास कामाची पावती मिळण्याची शक्यता




**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १५ नोव्हेंबर**

नांदेड दक्षिणमध्ये मोहनअण्णांच्या विकास कामांची कमाल, प्रचारातही त्यांचीच धमाल, अशी परिस्थिती असून सुरुवातीपासून त्यांनी प्रचारात घेतलेली आघाडी २० तारखेपर्यंत कायम राहणार असल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू आता घसरू लागली आहे. 'विकास कामांची वाढली गती, विरोधकांची हरवली मती' हा नारा जोरकसपणे सुरु आहे.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार आ. मोहनराव हंबर्डे यांच्या प्रचारात विकासाचे मुद्दे असून सामान्य मतदारांसह दलित, मुस्लीम समाजात त्यांची लोकप्रियता प्रचंड वाढली आहे. जातीपातीचे राजकारण सोडून जनसामान्यांना सुविधा देतानाच एक कुटुंबप्रमुख या नात्याने त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. लोकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन त्यांची सेवा करण्यास ते कुठेही कमी पडले नाहीत. त्यामुळे संपूर्ण मतदारसंघातील मतदार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

विरोधकांनी कितीही भूलथापा दिल्या, आमिषे दाखवली तरी त्यांच्या या भूलथापांना आम्ही कदापि बळी पडणार नाही, असा ठाम निर्धार मतदारांनी केला आहे. महायुती सरकारच्या योजना कुचकामी आणि तात्पुरत्या स्वरुपात असून त्या कधीही बंद पडू शकतात, असे मत मतदार व्यक्त करीत आहेत. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जाहीर केलेल्या घोषणांवर मते मिळत नसतात, तर प्रत्यक्ष मतदारसंघात झालेल्या कामावर लोकांचा विश्वास असतो, अशी मतदारांची भावना आहे. आ. मोहनअण्णा हंबर्डे हा आपल्या हक्काचा माणूस आहे, कोणत्याही संकटात धावून येणारे, मदत करणारे आमदार आहेत, त्यामुळे त्यांनाच भरघोस मतांनी विजयी करणार, असे सर्वस्तरातील मतदार बंधु-भगिनींचे ठाम मत झाले आहे. विशेष म्हणजे आ.मोहनअण्णा हंबर्डे यांचे हजारो कार्यकर्ते मतदारांना झालेल्या कामाची माहिती देवून यापुढेही विकास कामे झपाट्याने केली जातील, असे मतदारांना पटवून देत आहेत.

# हाणेगाव येथुन सुभाष साबणे यांना जाहीर पाठींबा...!



**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव ,दि. १५ नोव्हेंबर**

राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार सभांचा धुमधडाका चालु असुन वेगेवेगळ्या पक्षाचे उमेदवार रात्रंदीवस एक करुण पुर्ण ताकत पनाला लावत आहेत तर प्रहार जनशक्ति पक्षाचे प्रमुख बच्चु भाऊ कडु, छत्रपती संभाजी राजे, माजी खासदार राजु शेट्टी, माजी आमदार शेकाप चे शंकर अण्णा धोंडगे यांनी स्थापन केलेल्या परीवर्तन महाशक्ती आघाडीत सुभाषराव साबणे यांनी प्रवेश करुन उमेदवारी दाखल केली आहे आणि तालुक्यात निवडुन येण्यासाठी चांगलाच पोषक वातावरण तयार केला आहे. अशातच हाणेगाव येथील स्थानीक एम आय एम पक्षाचे तालुका उपाध्यक्ष अयुब भाई पठान व नयुम भाई चौधरी आदी कार्यकर्त्यांनी एकमुखी निर्णय घेऊन छोटेखानी सभेत परीवर्तन महाशक्तीचे देगलुर बिलोली विधानसभेचे उमेदवार सुभाषराव साबणे यांना जाहीर पाठींबा घोषीत केला आहे. यावेळीं अयुबखान पठाण यांनी प्रस्तावणेत हाणेगाव विभागातुन बहुमत मिळवुन देण्याची शाश्वती दिली आहे. यावेळी सुभाषराव साबणे यांनी मुस्लीम समाजासाठी शादीखाना बांधुन देण्याची गवाही दिली आहे.यावेळी कृ.उ.बा.समीतीचे माजी उपसभापती विवेक पडकंठवार, नारायण पाटील रमतापुरकर सरपंच रमतापुर, संजय मुलगे सभापती कृ.ऊ.बा.समीती, उमेश पाटील झमकाडे,वीरभद्र अप्पा माळगे, मारोती मोरेवाड, प्रविन इनामदार, ड.धोंडीबा देवकत्ते, दिलीप इनामदार, मारोती तुबरपळीकर, रड्डी मरतोळीकर, पुरुषोत्तम अन्सापुरे आदीजन यावेळी उपस्थीत होते.

# श्री विठ्ठल मंदिर काकड आरतीला दिव्यांची आरास

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १५ नोव्हेंबर**

धर्माबाद टाळ मृदंगाच्या पारमंपारीक वाद्याच्या साह्याने काकडआरती मोठ्या उत्साहात दररोज साजरा करतात. श्री विठ्ठल मंदिरात आश्विन पौर्णिमा ते कार्तिक पौर्णिमा(त्रिपुरा पौर्णिमा) पर्यंत थंडी मध्ये भाविक दररोज सकाळी ६ ते ७-३० वाजे पर्यंत काकड आरती करतात. तसेच आज कार्तिक एकादशीला श्री विठ्ठल मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

यासाठी दुरूदूर सर्व्हिस करणारे आपल्या वडीलांनाच्या, मित्रमंडळींच्या भेटी साठी येऊन पांडुरंगाच्या चरणी नथमस्तक होऊन काकड्याचा आंनद घेतात. पुरुष व महिला भाविक भक्त काकड आरती साठी नित्यनेमाने येतात. गावातील भक्तांची दररोज काकडा व प्रसाद आणून - आरती वेळी सहभागी होऊन आनंद घेतात कार्तिकी एकादशीच्या दिवशी महिलांनी मंदिरात सुंदर रांगोळ्या काढून हजारो दिव्यांची आरास तयार केली होती दीप प्रज्योत करून काकड आरती सुरू केली. तसेच तसेच वैशिष्ट्यपूर्ण श्री पांडुरंगाची रांगोळी काढून विठ्ठलाचे चित्र साकारले सर्वांना आनंद वाटला. ही परंपरा वर्षो-न-वर्षा पासून चालूच आहे. हि परमंपरा ८४ वर्षापासुन सुरू आसून हे कार्या नित्यनियमाने श्री विठ्ठल मंदिराचे पुरोहित सह पत्नी अरूण महाराज ऐनवाले व वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करत असलेला मुलगा अनिरूध्द ऐनवाले पण ईश्वराचे (पांडुरंगाची) भक्ती करतात.आज गावातून विठ्ठलाची सुंदर अशी पालखी काढण्यात आली हे पालखी हनुमान महादेव मंदिर ,राम मंदिर, पानसरे चौक ,नरेंद्र चौक व विठ्ठल मंदिरात जाणार कार्यक्रमासाठी रस्त्या रस्त्यात दुकानापुढे भक्तांनी पूजा करण्यासाठी गर्दी केली व नारळ व प्रसाद वाटून आनंद व्यक्त केला नंतर काल्याचा प्रसाद सर्व भक्तांना देण्यात आला.

गावातील सर्वभक्त पारमपारीक भजन लुप्त होऊनये म्हणुन विठ्ठलाच्या मंदिरात व पालखी बरोबर भोपाळ्या, भजन, अभंग, भावगीत गायले जातात.



हे संगीत मय होण्यासाठी टाळ, मृदंगाच्या साह्याने ईबितवार, गंगाधर कोटुरवार, पोताजी पाटील, परिश्रम घेतात. या साठी माधवराव गंगमवार, देवेंद्र चिद्रावर सावकार, संतोष कोडगिरे, शामजी गुजराथी, कोडगिरे, गोपालजी बियाणी, गादेवार, शंकर गंगमवार, प्रकाश गुजराथी , बालाजी पाटील वारले, माजी नगरसेवक संजय पवार, एडव्होकेट चव्हाण, राठी, ओम प्रकाश गुजराथी, पांडुरंग शंकरराव गंगमवार, कवटीकवार, रामीनवार, संतोष कोडगिरे, बी नारायण, रवी शेट्टी , सखाराम निलावार ब ालाजी पाटील जवळेकर, विष्णुपूरी एक्सप्रेसचे संपादक मनोज बुंदले, पत्रकार महेश जोशी, नितीन उत्तरवार, रामगिरीवार, मोहन रेड्डी, अशोक पाटील लोणीकर, विनायक उत्तरवार, सोमशेटवार, संतोष राठोड, राघवेंद्र उत्तरवार, मुपडे, मुक्कावार, आनंद पाटील जाफलापुरकर महिला भक्तगण दररोज काकड आरतीचा आनंद घेतात. अनुराधा सोमशेटवार, साधना निलावार, उत्तरवार, गोळेगावकर मॅडम, राधा गंगामवार, वैशाली कोंडावार, ललिता मोतेवार, असंख्य महिला भक्त, पुरूष भक्त काकड आरतीसाठी येतात.

# उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांची देगलूर, पाळजला सभा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ नोव्हेंबर**

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री तथा अभिनेते पवन कल्याण नांची उद्या दी. १६ रोजी देगलूर आणि पाळज येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार डॉ. संतुक हंबर्डे, भोकर विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवार ॲड. श्रीजया चव्हाण आणि देगलूर विधानसभेचे उमेदवार आ. जितेश अंतापूरकर यांच्या प्रचारार्थ ही सभा शनिवारी दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. देगलूर शहरातील चिद्रावार मैदान, उदगीर रोड देगलूर येथे होण आहे. त्याचबरोबर शनिवारी दुपारी वाजता दुसरी सभा भोकर तालुक्यातील पाळज येथे होणार आहे. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्यासह महायुतीतील उमेदवार आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सभेला उपस्थि राहण्याचे आवाहन महायुतीतर्फे करण्यात आले आहे.



Format C-7
(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)
Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other Individuals without criminal antecedents could not be selected as candidates.
(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)
**Name of Political Party: Independent**
**Name of the Election: Maharashtra Legislative Assembly-2024**
**Name of State/UT: Maharashtra**
**(1) Name of the Constituency: 85-Bhokar**
**Name of the candidate: Jakir Sagir Shaikh**

| Sr. No. | | | |
|---|---|---|---|
| | | **Criminal antecedents** | 1. FIR No. 320/2021 punishable U/s 501 of IPC with Sec. 67 of IT Act Registered with PS Vazirabad. |
| 1 | a | Nature of Offence | 2. FIR No. 422/2021 punishable U/s 354 A (4), 501 of IPC with Sec. 67 of IT Act Registered with PS Vazirabad. |
| | b | Case No. | 1. S.C.C. No. 717/2022<br>2. R.C.C. No. 409/2022 |
| | c | Name of Court | 1. Hon'ble J.M.F.C. Nanded.<br>2. Hon'ble C.J.M. Nanded. |
| | d | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1. No<br>2. No |
| | e | Date of Conviction, if any | NIL |
| | f | Details of Punishment undergone, if any | NIL |
| | g | Any other information required to be given | Both the cases are still under consideration before Hon'ble Court |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate Jakir Sagir Shaikh is a Social Worker and running member of NP Ardhapur, he had registered various crimes against corruption and saved the huge money of Government due to this work he has been awarded as Maharashtra Bhushan Award |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | Candidate Jakir Sagir Shaikh is contesting this election as independent candidate |

(2) Name of the Constituency: 85-Bhokar
Name of the Candidate: **JAKIR SAGIR SHAIKKKH**....and so on
* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency

**Date: 08/11/2024**
**Place: Bhokar**

**Jakir Sagir Shaikh**
R/o Barkatpura, Ardhapur, Nanded.

# लोकसभा निवडणुकीतील पुनरावृत्तीचे विधानसभेवरही सावट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ नोव्हेंबर**

सध्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात चांगलीच रणधुमाळी पाहावयास भेटत आहे. त्यातच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार संभाराव उर्फ बाबुराव कदम कोहळीकर यांच्या पराभवाची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत होण्याचे सावट निर्माण होत असल्याचे राजकीय विश्लेषकांकडून बोलले जात आहे.

त्यातच भर म्हणजे मित्र पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तर उघड-उघड समाज माध्यमांवर आपली नाराजी व्यक्त करत आहेत.



पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने केलेल्या सर्वेनुसार हिंगोलीची जागा धोक्यात असल्याकारणाने तत्कालीन विद्यमान खासदार यांना डच्चू देत संभाराव उर्फ बाबुराव कदम कोहळीकर यांना उमेदवारी बहाल करण्यात आली. त्यात त्यांचा पराभव होऊन सुद्धा त्याचीच पुनरावृत्तीचे सावट विधानसभाच्या निवडणुकीत होण्याची दाट शक्यता राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तर समाज माध्यमांवरती पक्षाच्या कार्यकर्त्याला मान, सन्मान दिला का, तुम्ही आतापर्यंत काय दिले. हे जाहीर करा असे आव्हान करत आहेत. परंतु तरीही भारतीय जनता पार्टीची शक्ती कमी लेखून चालता येणार नसल्याची ही दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने राजकीय विश्लेषकांकडून बोलले जात आहे.

# नामदार उदय सामंत यांनी घेतली व्यापाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ नोव्हेंबर**

मराठवाड्यातील औद्योगीक क्षेत्राच्या झालेल्या दुरावस्थेला काँग्रेस आघाडीचे सरकार जबाबदार आहे. बेरोजगारांचे थवे निर्माण करणाऱ्या महाआघाडी सरकारने सर्व एम.आय.डी.सींचे वाट लावली होती. परंतु नांदेड शहर व जिल्ह्यातील औद्योगीक जुन्या व नव्या वसाहतीच्या निर्माणासाठी महायुतीचे सरकार प्रमाणीकपणे प्रयत्न करेल. जिल्ह्यात रोजगार निर्मीती होईल या भागातील तरूणांना याच भागात रोजगार मिळेल. यासाठी महायुतीचे सरकार सत्तेत येणे आवश्यक आहे. त्यामुळे येत्या २० नोव्हेंबरला कमळ आणि धनुष्यबाण या निवडणूक निशानी समोरील बटन दाबून नांदेड लोकसभेत आणि विधानसभेत महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले.



नांदेड लोकसभेचे महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे नांदेड उत्तरचे विधानसभेचे उमेदवार आ. बालाजीराव कल्याणकर, नांदेड दक्षिणचे विधानसभेचे उमेदावार आनंदराव बोंढारकर यांच्या प्रचारासाठी आज जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी संघटना, सिए आणि बुद्धीजींची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ना. सावंत बोलत होते. आ.हेमंत पाटील, लोकसभेचे भाजपाचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे विधानसभेचे नांदेड उत्तरचे घेतली उमेदवार आ. बालाजीराव कल्याकर, नांदेड दक्षिणचे उमेदवार आनंदराव बोंढारकर, व्यापारी आघाडीचे प्रेमकुमार फेरवानी, बाळू खोमणे, विजय गंभीरे, सचिन किसवे, गंगाधर बडुरे, प्रल्हाद हिंगोले यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आयोजित बैठकीत बोलतांना उद्योग मंत्री सामंत म्हणाले की, नांदेड जिल्ह्यात रोजगार निर्मीतीच्या अनेक संधी आहेत. यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ येथे आहे, आवश्यक साधन सामग्री उपलब्ध आहे. परंतु त्यासाठीची आवश्यक असणारी ईच्छाशक्ती असणारे नेतृत्व आघाडीकडे नव्हते. या जिल्ह्यात गेली ४०-५० वर्षे काँग्रेस ने सत्ता भोगली त्या काँग्रेसला नांदेडचा औद्योगीक वसाहतीचा विकास करता आला नाही. येवळेच नाही तर आहे ते उद्योग बंद पडले, काही मोडकळीस आले. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील औद्योगीक वसहाती मोडकळीस आल्या होत्या आता या वसाहतींच्या पुन्हा उभारनीची नवी संधी मिळत आहे. त्यामुळे होत असलेल्या विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणूकीत भाजपा महायुतीला विजयी करा असे आवाहन करतांनाच ते म्हणाले डॉ. संतुकराव हंबर्डे हे उच्च शिक्षीत आहेत. मानवी विकासासाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील ते तज्ञ आहेत. त्यामुळे असा जाणकार उमेदवार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील लोकसभेत खासदारा असणे आवश्यक आहे. डॉ. संतुकराव हंबर्डे यांना खासदार म्हणून लोकसभेत पाठवा निश्चितपणे आपल्या जिल्ह्याच्या औद्योगीक आणि शैक्षणीक क्षेत्राला प्रगतीचा नवा मार्ग सापडेल. असा विश्वास ही ना. सावंत यांनी केला. यावेळी आ. हेमंत पाटील यांचे ही मनोगत झाले.

## त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त शनिवारी शेंदुरवाद्यात संगीत दीपोत्सव

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : गेली ५ वर्षे देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या वतीने सिंदूरवदन गणेशाचे प्राचीन मंदिर असलेले पवित्र ठिकाण शेंदूरवादा (ता. गंगापूर) येथे संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी हा सोहळा शनिवार, १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सायं. ६.३० वा. मध्वमुनीश्वर आश्रम, शेंदूरवादा येथे संपन्न होणार आहे.

महागामी गुरूकुलाच्या पार्वती दत्ता यांच्या शिष्या ओडीसी नृत्य सादर करणार असून, ग्वाल्हेर घराण्याचे पं. राम देशपांडे यांचे शिष्य पंकज देशपांडे हे शास्त्रीय गायन सादर करणार आहेत. त्यांना प्रशांत गाजरे (तबला) व शांतीभूषण देशपांडे (संवादिनी) साथ करणार आहेत.

शेंदूरवादा ग्रामस्थ, मध्वमुनीश्वर संस्थान व देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या माध्यमातून संपन्न होणाऱ्या या महोत्सवास रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आले.

## पाथरी येथील श्रीसाई पादुका पालखी शहरात दाखल

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिर्धी : श्रीसाईबाबांच्या पादुका घेवून येणारी पालखी शहरात दाखल झाली असून, ही पालखी शनिवारी, १६ रोजी ज्योतीनगरात दाखल होणार आहे. ही पालखी येथील श्रीविठ्ठल मंदिरात मुक्कामी थांबणार आहे. श्रीसाईबाबांचे जन्मस्थान परभणी जिल्ह्यातील पाथरी येथून दरवर्षी ही पादुका पालखी येत असते. सायंकाळी साडेपाच वाजता येथील दशमेशनगरमधील दशमेश्वर शिवमंदिराजवळ पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे. या पालखीच्या स्वागतासाठी सर्व साईभक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विठ्ठल मंदिर व्यवस्थापन समितीकडून करण्यातआले आहे. श्रीदशमेश्वर शिवमंदिरच्या विश्वस्त व साईभक्तांच्या वतीने पालखीचे स्वागत केल्यानंतर विश्वरूप हॉलमार्गे ज्योतीनगर मुख्य रस्त्याने मिरवणुकीने पालखी श्रीविठ्ठल मंदिर ज्योतीनगर येथे पाहोचणार आहे. मंदिरात भाविकांच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात येणार असून, पादुकांच्या अभिषेकपूजन, हरिपाठ, आरतीनंतर प्रसाद वाटप करण्यात येणार असून, पालखी याच ठिकाणी मुक्कामी राहणार आहे. दुसऱ्या दिवशी पहाटे सहा वाजता पादुका अभिषेकपूजन आरतीनंतर पुढील प्रवासास पालखी रवाना होणार असल्याचे श्रीविठ्ठल मंदिर संस्थान विश्वस्त व विठ्ठल मंदिर व्यवस्थापण समितीच्यावतीने गिरजाराम हळनोर यांनी सांगितले. श्रीसाईबाबांच्या पादुका (पालखी) दरवर्षी शहरातील साईभक्तांसाठी येत असते गुरुवारी, १४ रोजी ही पालखी शहरात आली असून, शहरात काही ठिकाणी पादुकांचे पूजन केले जाते. तसेच काही ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पैठण रोड येथील ईटखेड्यात दीपक फासाटे यांच्या घरी या पादुकांचे पूजन करण्यात आले. दीपक फासाटे यांनी सपत्निक साई बाबांच्या पादुकांचे पूजन-आरती केली.

## श्रीराम नगरातील रहिवाशांचा विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्काराचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १५ नोव्हेंबर**

शहरातील श्रीराम नगरातील रहिवाशांचा दि.(२०) नोव्हेंबर रोजी होत असलेल्या विधानसभेच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला असल्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला. याबाबत सविस्तर वृत्त असे की,लोहा शहरातील मराठ गल्ली व श्रीराम नगर कन्या शाळेच्या समोरील रस्त्यावरील दोन्ही बाजूने करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे नागरिकांना त्रास होत असून थ्री व्हिलर व फोर व्हिलर वाहणं नेण्यासाठी अडचण होत आहे.रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी नगरपरिषदेला दि.१३ आक्टोबर २०२३ रोजी कळविले.तद्नंतर दि.०८ नोव्हेंबर रोजी निवेदन दिले.नगरपालिकेने दि.१९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत जर अतिक्रमण न काढल्यास विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्काराचा इशारा येथील नागरिकांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे. सदरील निवेदनावर श्रीरामनगरातील पन्नास ते साठ नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जनसेवेसाठी शिंदे परिवार सदैव तत्पर राहील : संजय शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. १५ नोव्हेंबर**

आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी मागील पाच वर्षांत लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची दर्जेदार कामे केली, मागणी केली तिथे सी.सी. रस्ते, नाली बांधकाम, दलित वस्तीतील कामे पूर्ण केली. दिलेले आश्वासन पुर्ण करणारे आमदार म्हणून आज त्यांची सर्वत्र ख्याती झाली आहे. कोणताही जातीभेद, भेदभाव न करता त्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन पक्षसंघटन वाढविले, यापुढेही जनसेवेसाठी शिंदे परिवार सदैव तत्पर राहील, आशाबाई शिंदे यांना विजयी करून



महाविकास आघाडी मजबूत करा, असे आवाहन सेवानिवृत्त सहायक पोलिस आयुक्त संजय पाटील शिंदे यांनी ठिकठिकाणी झालेल्या संवाद बैठकीत केले.

लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार सौ.आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांच्या प्रचारार्थ आमदार श्यामसुंदरजी शिंदे यांचे बंधू संजय पा.शिंदे यांनी कंधार तालुक्यातील चौकी शिरूर येथील गावकरी मंडळी यांच्याशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. आतापर्यंत झालेल्या विकासाची पावती म्हणून सौ. आशाबाई शिंदे यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. ते म्हणाले, लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघातील जनतेचे आणि शिंदे परिवाराचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत, प्रत्येकांच्या सुखदुःखात एकमेकांना मदत करण्याची या मतदारसंघाची परंपरा आहे. जनतेच्या आशीर्वादाने मागील निवडणुकीत आ.श्यामसुंदर शिंदे यांना विधानसभेत जाण्याची संधी मिळाली. त्यांनी या संधीचे सोने करून विकासाची गंगा मतदारसंघात आणली. यावेळीही आपले प्रेम, आशीर्वाद शिंदे परिवाराच्या पाठीशी असु द्या, असे आवाहन त्यांनी केले.

## संत नामदेव घुमान सद्भावना यात्रा आज पासून पंजाब हरियाणा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १५ नोव्हेंबर**



पंजाब आणि महाराष्ट्रात बंधुभाव निर्माण करण्यात यशस्वी ठरलेल्या नानक साई फाऊंडेशन ची १० वी संत नामदेव घुमान सद्भावना यात्रा आज दि १५ नोव्हेंबर पासून पंजाब हरियाणा दौऱ्यावर जात आहे.

संत नामदेव महाराज यांचा आशीर्वाद लाभलेल्या घुमान यात्रा टूरच्या संकल्पनेला राज्यातून भरभरून प्रतिसाद मिळतो. यात्रे चे हे १० वे वर्ष असून यात्रेच्या माध्यमातून पंजाब -हरियाणा -हिमाचल प्रदेश मधील धार्मिक ऐतिासिक स्थळांचे दर्शन-इतिहास -संस्कृती सोबत पर्यटनाचे अनोखे कॉम्बिनेशन मराठी माणसांना मनापासून आवडले आहे.. महाराष्ट्रातील मराठी माणसांनी या चळवळीला डोक्यावर घेतले आहे. याच यशामधून प्रेरणा घेत पंजाब -हरियाणा -हिमाचल प्रदेश च्या पवित्र देवभूमीची भेट घडवण्यासाठी ही कौटुंबिक सहल दरवर्षी संत नामदेव महाराज यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून आयोजित केली जाते. १५ ते २५ नोव्हेंबर,२४ या दरम्यान यावर्षीची १० वी घुमान यात्रा आयजित केली आहे.. उद्या शुक्रवारी सकाळी १० वाजता हम सफर एक्सप्रेस ने ही यात्रा हिंगोली अकोला शेगाव मलकापूर मार्गे पंजाब ला रवाना होणार आहे अशी माहिती नानक साई फाऊंडेशन चे प्रमुख पंढरीनाथ बोकारे यांनी दिली आहे. यात्रेच्या स्वागताला उपस्थित राहण्याचे आवाहन नानक साई फाउंडेशनचे उपाध्यक्ष सुभाष बल्लेवार, सरदार रणबीरसिंघ खोखर,तुलसीदास भुसेवार,माधवराव पटणे, सतीश देशमुख,जी. नागय्या,हरिदास भट्टड,विनायक पाथरकर,गंगाधर पांचाळ,डॉ. गजानन देवकर,तुकाराम कोटूरवार,जयप्रकाश नागला,आयुब पठाण, दिलीप अंगुलवार, जनार्दन पिनलवार,बजरंग पुरी ,धनंजय उमरीकर यांनी केले आहे.

## लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा निवडणूक २०२४ मतदान व मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्री बंद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १५ नोव्हेंबर**

लोकसभा पोट निवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यात २० नोंव्हेंबर २०२४ रोजी मतदान होत असून त्याची मतमोजणी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित केलेल्या स्थळी होणार आहे. मतदानाची प्रक्रिया मुक्त व निर्भयपणे व शांततेत पार पाडण्याच्यादृष्टीने व शांतता, सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनुचित प्रकार घडू नये यासाठी लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३५ (सी) महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम १४२ (१) तरतुदीनुसार तसेच निवडणूक आयोगाच्या विविध निर्देशानुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व ठोक व किरकोळ अनुज्ञप्ती मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत.

निवडणूकीच्या आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तुंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी तसेच सार्वजनिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी नांदेड जिल्ह्यात मतदान संपण्यापुर्वी ४८ तास अगोदर ते मतदान संपेपर्यत १८ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ६ वाजेपासून ते २० नोंव्हेबर २०२४ रोजी सांयकाळी ६ वाजेपर्यत किंवा मतदान संपेपर्यत तसेच मतमोजणीच्या दिवशी २३ नोव्हेंबर २०२४ रोजी संपूर्ण दिवस मतमोजणी प्रक्रीया संपेपर्यत संपूर्ण नांदेड जिल्ह्यात अनुज्ञपती बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशाचे उल्लंघन करुन मद्यविक्री करीत असल्याचे आढळून आल्यास संबंधित अनुज्ञप्ती रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, असे आदेशात नमूद केले आहे.

## शहराला उद्योगांचे केंद्र बनवण्यासाठी महायुतीला साथ द्या : अतुल सावे

छत्रपती संभाजीनगर :- विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी आपल्या मतदारसंघात जोरदार प्रचाराला सुरुवात केली. शुक्रवारी गारखेडा परिसरातील वार्ड क्रमांक ९४ गजानन नगर येथे जती महारुद्र हनुमान मंदिरातून पदयात्रेला प्रारंभ करत त्यांनी नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी सावे यांनी उपस्थित नागरिकांना विकासाच्या बाजूने उभे राहण्याचे आवाहन केले. महायुतीच्या सरकारने देशात व राज्यात अनेक विकासकामे केली असून, या विकासाच्या प्रक्रियेत छत्रपती संभाजीनगर शहराला उद्योगांचे महत्त्वाचे केंद्र बनवायचे आहे. येत्या काळात रोजगार निर्मिती आणि शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा निर्धार आहे, त्यासाठी नागरिकांनी महायुतीला मतदान करून खंबीर पाठिंबा देणे आवश्यक आहे, असे सावे यांनी नमूद केले.

त्यांच्या पदयात्रेत नागरिकांनीही उस्फूर्त सहभाग नोंदवला. तसेच, गारखेडा परिसरातील तरुणांनी विकासासाठी महायुतीच्या पाठीशी



खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला. पुढील काळात छत्रपती संभाजीनगरला औद्योगिक क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आश्वासन श्री सावे यांनी दिले.

या प्रसंगी अभिजीत देशमुख, आकाश राऊत, नागेश भालेराव, संतोष काळे पाटील, वामनराव शिंदे, अशोक दामले, पंडित कांदे, ज्ञानेश्वर लुटे, मयूर टरघळे अमोल तांबे,आसाराम वीरकर , बिट्टू गाडेकर, किशोर तिवारी,कैलास राठोड,शाम कुलकर्णी, शाम क्षीरसागर,बाळू वाघमारे, ज्ञानेश्वर टाक, आरती गुटलकर पाटील, छाया शिंदे ,अनिता भोकरे, नितनवरे ताई, आशा खरात, शीतल खरात, अंकिता चौधरी, उज्वला नाईक, ढाकणे ताई, विनायक रसाळ, यांच्या सह मोठ्या प्रमाणावर महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

## गंगापूर खुलताबाद मतदार संघातील तरुणांना रोजगार निर्मिती करून देणार : डॉ सुरेश सोनवणे

तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.१५ नोव्हेंबर

पुढील पाच वर्षात एमआयडीसीतून दोन लाखांपेक्षा जास्त मतदार संघातील तरुणांना रोजगार निर्मिती करून देणार असल्याचे आश्वासन अपक्ष उमेदवार डॉ सुरेश सोनवणे यांनी मतदारांशी संवाद साधताना दिले

तालुक्यात विकास हा दिसत नसून विकासासोबतच रोजगाराची देखील बिकट अवस्था झाली असून असंख्य तरुण बेरोजगार असल्यामुळे व्यसनाधीन होत आहेत, मी अनेक कंपनी मालकांशी बोललो आहे ते तरुणांना नोकऱ्या देण्यास सकारात्मक आहे परंतु आमदारांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी अनेक कंपनी मालकांकडून हप्ते वसूल केले



व दमदाट्या केल्यामुळे अनेक कंपनी मालक हे नाराजगी दर्शवत असल्याचे चित्र मी बघितले आहे मला आपण पुढील पाच वर्ष आपली सेवा करण्याची संधी द्या मी दोन लाखांपेक्षा जास्त मतदार संघातील तरुणांना नोकऱ्या मिळून देतो यावेळी अपक्ष उमेदवार डॉ सोनवणे यांनी सतीश चव्हाण यांच्यावर देखील टीका केली ते म्हणाले की सतीश चव्हाण यांचा चेहरा देखील मतदार संघाला माहिती नसताना अचानक निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी मतदारसंघात फिरून मी विकास करतो अशा भूलथापा देत मतदारांची दिशाभूल करण्याचे काम सुरू केले आहे हीच योग्य वेळ आहे कोणत्याही भुल थाप्पाना बळी न पडता योग्य चेहऱ्याला मतदान करा. हे दोघेही १७ वर्षे आणि पंधरा वर्षात जे करू शकले नाही ते मी पुढील पाच वर्षात करून दाखवेल यांच्या भ्रष्टाचाराचा चिट्ठा माझ्याकडे आहे योग्य वेळ आली की ते मी जनतेसमोर मांडेल असे देखील या वेळेस अपक्ष उमेदवार डॉक्टर सुरेश सोनवणे यांनी सांगितले

## 'श्रद्धाभूमी ते प्रकटभूमी' पायी पालखी सोहळ्याची तयारी सुरू

### २१ डिसेंबरपासून प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : गारखेडा परिसरातील श्रीगजानन महाराज (शेगांव) मंदिर विश्वस्त मंडळाच्यावतीने दरवर्षी काढण्यात येणाऱ्या 'श्रद्धाभूमी ते प्रकटभूमी' पायी पालखी सोहळ्याची तयारी सुरू झाली आहे. यासाठी गारखेडा येथील श्रीगजानन महाराज मंदिरात नोंदणीला सुरुवात झाली आहे. २१ डिसेंबरपासून या पायी पालखी सोहळ्याला सुरुवात होणार आहे. ही पायी पालखी (दिंडी) दहा दिवस मार्गक्रमण करत ३० डिसेंबर रोजी विदर्भपंढरी शेगांव मध्ये दाखल होणार आहे.

सदगुरू श्रीगजानन महाराज यांच्या समाधी शताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने या पायी दिंडी पालखी सोहळयाची सुरुवात करण्यात आली होती. समाधी शताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने सुरू झालेला हा पायी दिंडी पालखी सोहळा आता वार्षिक झाला आहे. मंदिराच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा दिंडी संचालक डॉ. प्रवीण वक्ते म्हणाले, दहा दिवसांच्या पालखी सोहळ्याचे यंदाचे १६ वे वर्ष आहे. विदर्भ मराठवाड्यातील विविध भजनीमंडळे व भक्तांसह २१ ते ५० वयोगटातील पुरुष भक्तांना यंदा सहभागी करून घेण्यावर भर राहणार आहे.

मंदिरात करा नोंदणी

श्रद्धाभूमी ते प्रकटभूमी या पायी पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी गारखेडा परिसरातील श्रीगजानन महाराज मंदिर येथे नोंदणीला सुरुवात झाली आहे. वारकऱ्यांची संख्या मर्यादित राहणारअसल्याने इच्छुक भक्तांनी मंदिरात नाव नोंदणी करावी, असे आवाहन विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा दिंडीचे संचालक डॉ. प्रवीण वक्ते यांनी केले आहे.

## भाजपकडून डी.बी.पाटील यांच्याप्रमाणे किनवट विधानसभेत सलग दुसऱ्यांदा निवडून येण्याचा कारनामा केराम करतील का?

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १५ नोव्हेंबर**

किनवट विधानसभेत १९९० च्या विधानसभा निवडणुकीत जाधव सुभाष लिंबाजी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (सिपीआय) या एकवेळचा अपवाद वगळता १९६२ पासून ६७,७२,७८ ते १९८५ या तब्बल सहा विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे वर्चस्व होते.तर २००४, २००९ व २०१४ या सलग तीन निवडणुकीत तत्कालीन राष्ट्रवादीचा हा मजबूत गड बनला होता. विशेष म्हणजे,१९९५ व १९९९ या दोन निवडणुकीत भाजपाचे डी.बी. पाटील यांनी हा गड आपल्या ताब्यात घेतला होता. ज्याप्रमाणे भाजपाचे डी.बी.पाटील यांनी या मतदारसंघात सलग दोनदा आमदारकीची माळ आपल्या गळ्यात घालून इतिहास रचला होता. त्या इतिहासाची पुनरावृत्ती सलग दुसऱ्यांदा निवडून येत महायुतीच्या भाजपाचे उमेदवार आमदार भीमराव रामजी केराम हे करतील का? यावर कडाक्याच्या थंडीत गरमागरम चर्चेचे राजकारण तापू लागले आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराचा ज्वर वाढू लागला आहे. दोन आघाड्या आणि सहा प्रमुख पक्षांबरोबरच ही निवडणूक तिरंगी, चौरंगी किंवा बहुरंगी करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. प्रत्येकाकडून निवडणूक जिंकण्याचा आणि सत्तेत येण्याचा दावा केला जातोय. राजकीय घडामोडींचे आडाखे बांधले जात आहेत.महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने एकीकडे भारतीय जनता पक्ष, शिवसेना (एकनाथ शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष हे तीन सत्ताधारी पक्ष महायुतीमध्ये आहेत. तर दुसरीकडे काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे तीन प्रमुख पक्ष विरोधातील महाविकास आघाडीमध्ये आहेत. यांच्याशिवाय महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी व इतर अपक्षांकडूनही निवडणुकीत नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला जात आहे. अवघ्या २८८ जागांसाठी काही हजार उमेदवार रिंगणात उतरले आहेत! त्याच पार्श्वभूमीवर ०८३-किनवट विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षाच्या नेत्या-कार्यकर्त्यांची विजयासाठीची धडपड सुरु आहे. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यातील सत्तासंघर्ष वेगाने वाढलेला आहे.



किनवट विधानसभा मतदारसंघ नांदेड जिल्ह्याच्या ८३ व्या क्रमांकावर आहे आणि इथली राजकारणाची लढाई नेहमीच चुरशीची राहिलेली आहे. बीजेपीचे भीमराव केराम हे सध्या या मतदारसंघातील आमदार आहेत. २०१९ मध्ये त्यांनी या मतदारसंघातून विजय मिळवला होता. त्याआधी, या मतदारसंघात ३ पंचवार्षिक कालावधीसाठी तत्कालीन एनसीपीचे प्रदीप हेमसिंग जाधव यांचे वर्चस्व होते. प्रदीप जाधव यांनी २००४, २००९ आणि २०१४ मध्ये या मतदारसंघात विजय मिळवला होता.

मात्र त्यानंतर देशात पसरलेल्या नरेंद्र मोदी लाटेत २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे भीमराव केराम यांनी प्रदीप नाईक यांचे चौथ्यांदा विजयी होण्याचे स्वप्न धुळीस मिळवत दणदणीत विजय मिळवला होता.प्रदीप जाधव नाईक यांनी आपला हा राष्ट्रवादीचा तीन वर्षांपासूनचा अभेद्य बालेकिल्ला अजेय ठेवण्यासाठी केराम यांना जोरदार टक्कर दिली होती. दोन्ही उमेदवारांनी विजय मिळवण्यासाठी आपली सगळी राजकीय शक्ती एकवटत पणाला लावली होती.

परंतू,या मतदारसंघातील जनता त्यावेळी अखेर भीमराव केराम यांच्या बाजूने उभी राहिली आणि त्यांना ८९,६२८ एवढी भरघोस मते देत विजयी केले. तर प्रदीप जाधव यांना ७६,३५६ मते मिळाली. यावरून, दोन्ही उमेदवारांमध्ये १३,२७२ मते अधिक मिळवून भीमराव केराम हे विजयी झाले होते.तर तीसऱ्या क्रमांकावर वंचीत बहुजन आघाडीचे हेमराज उईके यांना ११,७६४ मते मिळाली होती. तर विशेष म्हणजे उभे असलेल्या एकूण १५ उमेदवारांपैकी नाही तर चक्क नोटाला चौथ्या क्रमांकाची १,०४१ इतकी मते मिळाली होती. किनवट विधानसभा मतदारसंघांमधील जातीय समीकरणे खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. येथे सुमारे २५% आदिवासी समुदायाचे मतदार आहेत. याशिवाय, १०% दलित मतदार आहेत. मुस्लिम समुदायाचे मतदार ९% इतके आहेत. या सर्व जातीधर्माच्या समुदायांच्या आघाडीवर निवडणूक जिंकणे महत्वाचे ठरते. शहरी आणि ग्रामीण क्षेत्रातील मतदारांची तुलना केली तर, ८८% मतदार ग्रामीण भागातील आहेत, तर फक्त १२% शहरी भागातील मतदार आहेत. हे समीकरण देखील उमेदवारांच्या रणनीती ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, ६0हजारांच्या जवळपास ही आदिवासी व तीतकीच किंबहुना थोड्या जास्त प्रमाणात बंजारा समाजातील मतदारांची संख्या आहे. जी या मतदारसंघात आदिवासी कि, बंजारा आमदार याची निश्चिती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे आजपर्यंत झालेल्या सर्व निवडणुकीच्या निकालावरून लक्षात येते.

## अग्रलेख...

# बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांबद्दल एवढा पुळका कशासाठी?

काँग्रेस, ममतांची तृणमूल काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी देशाच्या ऐक्याचा विचार न करता कायम तुष्टीकरणाचेच राजकारण केले. आजही त्यांची ती सवय कायम आहे. सत्ताप्राप्तीसाठी देश गहाण ठेवायलाही ही मंडळी मागेपुढे पाहणार नाहीत, हे आजवरच्या त्यांच्या वर्तनावरून स्पष्ट होते. आज देशात बांगलादेशी आणि रोहिंग्या या घुसखोरी करून बेकायदेशीरपणे शिरलेल्या मुस्लिमांची वाढलेली प्रचंड संख्या आणि त्यांनी घातलेला धुडगूस लक्षात घेता देशाच्या एकात्मतेला आणि अखंडतेला धोका निर्माण झाला आहे. अवैधरीत्या घुसलेल्या रोहिंग्यांना आणि बांगलादेशींना हुडकून काढत देशाबाहेर काढण्याच्या मोदी सरकारच्या प्रयत्नांमध्ये कायम अडथळे आणण्याचे पाप ममता बॅनर्जी यांनी आणि काँग्रेस व इतर विरोधकांनी केले आहे. घुसखोरीला आळा घातला नाही आणि बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या रोहिंग्यांना हाकलले नाही तर भविष्यात परिस्थिती हाताबाहेर जाईल, हे लक्षात घेतले पाहिजे. विधानसभा निवडणूक होत आहे. मतदान करण्यापूर्वी मतदारांनी या बाबीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. राष्ट्रहित साध्य करणाऱ्या पक्षाला आणि उमेदवारालाच मत दिले पाहिजे. आपल्या देशातील कथित उदारमतवादी मंडळींना आणि स्थापनेपासून अल्पसंख्यकांचे तुष्टीकरण करत आलेल्या काँग्रेसी नेत्यांना रोहिंग्या मुसलमानांचा फारच पुळका येतो. देशातील गरीब मुसलमानांबद्दल जराही कळवळा नसलेली ही मंडळी रोहिंग्यांना आश्रय मिळावा म्हणून सरकारच्या विरोधात बाह्या सरसावून पुढे येत असतात. या मंडळींना रोहिंग्यांचा एवढाच पुळका असेल, त्यांच्यावर अन्याय होत आहे असे वाटत असेल, त्यांच्या मानवाधिकारांची बूज राखली जायला हवी असे वाटत असेल, तर खुशाल या मंडळींनी स्वतःच्या घरी रोहिंग्यांना आश्रय द्यायला हवा. सरकारनेही या कामात अडथळा आणू नये. काँग्रेसी नेत्यांची वाचाळ फौज रोहिंग्यांना आश्रय देण्यासाठी सरकारविरोधात काहीबाही बोलत असतात. ममता बॅनर्जी तर केंद्र सरकारला दम भरत असतात. यांना रोहिंग्यांची एवढीच काळजी वाटत असेल तर त्यांनी आधी किमान चार रोहिंग्या मुसलमानांना स्वतःच्या घरी आश्रय द्यावा. स्वतःच्या बंगल्यात चार रोहिंग्यांना आश्रय द्यावा, त्यांच्या उपजीविकेची व्यवस्था करावी. रोहिंग्या मुसलमानांची बाजू घेत तुष्टीकरणाचे राजकारण करण्याऐवजी काँग्रेसने देशातील गरीब मुस्लिम बांधवांच्या भविष्याचा विचार करावा. पण, तसे काँग्रेस कधी करणार नाही. कारण, काँग्रेसला मुस्लिमांची फक्त मते हवी आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशात दीर्घ काळ काँग्रेसचीच राजवट राहिली आहे. प्रत्येक निवडणुकीत मुस्लिमांची एकगठ्ठा मते कशी मिळतील, याचाच विचार काँग्रेसने सातत्याने केला. मुस्लिम लोक शिकले पाहिजेत, त्यांना रोजगार मिळाला पाहिजे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे यासाठी काँग्रेसने कधीच ठोस पावले उचलली नाहीत. त्यामुळे आज देशातल्या मुसलमानांची जी वाईट अवस्था झाली आहे, त्याला फक्त काँग्रेस पक्षच जबाबदार आहे. रोहिंग्यांना सरकारने आश्रय द्यावा, त्यांना सगळ्या नागरी सुविधा पुरवाव्यात, असा डोकं फिरल्यासारखा आग्रह करताना या मंडळींची जीभ जड कशी पडत नाही? कारण देशहित दुर्लक्षित करून फालतू गोष्टींना प्राधान्य देण्याची यांची जुनीच परंपरा आहे. गेल्या काही वर्षांपासून रोहिंग्यांचा प्रश्न कळीचा मुद्दा बनला आहे. स्वतःला शोषित-पीडित वर्गाच्या समस्या सोडविणारा मसीहा समजणारा स्वयंघोषित उदारमतवादी वर्ग रोहिंग्यांना आश्रय द्यावा म्हणून सरकारकडे आग्रही भूमिका मांडत असतो. भारतातील सव्वाशे कोटी जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करून केला जात असलेला हा आग्रह म्हणजे दुराग्रहच होय. म्यानमारमध्ये धुमाकूळ घातल्याने ज्यांना देशाबाहेर हाकलण्यात आले, त्या घातक रोहिंग्यांना भारतात आश्रय देण्याचा स्वयंघोषित पुरोगामी आणि उदारमतवादी मंडळींचा आग्रह म्हणजे सव्वाशे कोटी देशवासीयांप्रती असंवेदनशीलताच म्हटली पाहिजे. रोहिंग्ये हे देशविघातक कृत्यांमध्ये सामील होते, म्यानमारमध्ये त्यांनी शेकडो हिंदूंची कत्तल करून त्यांना ठार मारले, हे वास्तव माहिती असतानाही ही ढोंगी उदारमतवादी, छद्म मानवतावादी मंडळी देश अतिरेक्यांच्या हाती सोपवायला निघाली आहेत की काय, अशी शंका कधी कधी वाटते. रोहिंग्यांची लढाई स्वतःच्या खांद्यावर घेऊन ही मंडळी आपल्याच सरकारविरुद्ध लढताना दिसते, तेव्हा वाईट वाटते. ज्या रोहिंग्यांच्या समर्थनार्थ ही मंडळी आपल्याच सरकारविरुद्ध लढाई लढते, त्या रोहिंग्यांपैकी अनेकांचे पाकिस्तानी अतिरेक्यांशी संबंध आहेत, हे माहिती असतानाही ही मंडळी त्यांना आश्रय द्यावा असा आग्रह करीत आहेत, याचा अर्थ त्यांना देशाच्या सुरक्षेशी काहीही देणेघेणे नाही, असाच काढला जावा. सुरक्षेशी संबंधित मुद्दे दुर्लक्षित करून आपल्या साधन-संसाधनांचा हिस्सा रोहिंग्यांसाठी देण्याची तयारी ठेवावी, असे आवाहन ही मंडळी निर्लज्जपणे देशवासीयांना करते, तेव्हा चीड येते. केंद्र सरकार म्हणते त्याप्रमाणे रोहिंग्ये मुसलमान हे अवैध प्रवासी नसून ते शरणार्थी आहेत आणि शरणार्थींना परत पाठविण्याचा सरकारला अधिकार नाही, असा युक्तिवादही या मंडळींकडून केला जातो. शरणार्थींच्या बाबतीत जे आंतरराष्ट्रीय करार झाले आहेत, त्या करारातील तरतुदींनुसार रोहिंग्यांना आश्रय देणे ही सरकारची जबाबदारी असल्याचेही या मंडळींनी अनेकदा म्हटले आहे. वास्तविक, या मंडळींचा युक्तिवाद अतिशय चुकीचा आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचाही चुकीचा दाखला या मंडळींनी अनेकदा दिला. वास्तविक, रोहिंग्या हे शरणार्थी नाहीतच. गेल्या अनेक वर्षांत बांगलादेशी मुसलमान अवैधरीत्या भारतात घुसून देशाच्या विविध भागांत बेकायदेशीरपणे राहात आहेत, तसेच हे रोहिंग्ये भारतात घुसले आहेत आणि म्हणूनच त्यांना हाकलण्याची सरकारची भूमिका योग्य आहे. शिवाय, शरणार्थींना आश्रय देण्यासंबंधी १९५१ साली जो करार करण्यात आला होता, त्यावर भारताने अजूनही स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे या कायद्यानुसार शरणार्थींना आश्रय देणे भारतावर बंधनकारकही नाही. शरणार्थींच्या संदर्भातील १९६७ च्या प्रोटोकॉलवरही भारताने स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे १९५१ च्या करारावर स्वाक्षरी करणाऱ्या देशांवरच शरणार्थींना परत न पाठविण्याचे बंधन आहे. ही बाब लक्षात न घेता स्वयंघोषित उदारमतवादी मंडळी अकलेचे तारे तोडत देशहित दुर्लक्षित करून सव्वाशे कोटी जनतेच्या आशा-आकांक्षांवर पाणी फेरण्यासाठीच या देशात जन्माला आल्यागत वागत आहेत. अकलेचे तारे तोडण्याच्या बाबतीत या स्वयंघोषित मंडळींनी कळसच गाठला आहे. रोहिंग्यांच्या मूलभूत अधिकारांचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला आहे. भारत हे एक गणराज्य आहे. भारताने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना लागू केली. त्यात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा आणि कर्तव्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. मूलभूत अधिकार हे भारताच्या नागरिकांना आहेत; रोहिंग्यांना ते कसे लागू होतील? प्रश्नच नाही. पण, रोहिंग्यांना भारतात आश्रय देत त्यांचा मसीहा होण्याच्या प्रयत्नात असलेली ही मंडळी आंधळी झाली आहेत. या लोकांना एवढीच खाज आहे, तर त्यांनी आधी रोहिंग्यांना स्वतःच्या घरी आश्रय द्यावा, स्वतःच्या संपत्तीमधील ठरावीक वाटा त्यांना द्यावा आणि त्यांचे यथायोग्य पुनर्वसन केल्यानंतर भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज करावा. पण, ही सगळी मंडळी ढोंगी आहेत, स्वार्थी आहेत, यांच्या भावभावनाही नकली आहेत, त्यांना रोहिंग्येच काय, मानव जातीबद्दलही प्रेम-जिव्हाळा असेल असे अजिबात वाटत नाही. या देशाचा नागरिक असलेल्या प्रत्येकाला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे, देशात कुठेही प्रवास करण्याचे आणि वास्तव्याचेही स्वातंत्र्य आहे. पण, हे स्वातंत्र्य फक्त नागरिकांना आहे; अन्य कोणालाही नाही. त्यामुळे हा मुद्दा पुढे करून उदारमतवादी मंडळी आणि काँग्रेसवाल्यांनी देशातील जनतेची दिशाभूल करू नये आणि रोहिंग्यांनाही फालतू आशा दाखवू नये. आपले संविधान अगदी स्पष्ट आहे. त्यातील तरतुदीही स्पष्ट आहेत. असे असतानाही जर कुणी रोहिंग्यांच्या मूलभूत अधिकारांच्या बाता मारत असेल तर त्याला जनतेनेच उघड पाडले पाहिजे. मतदानाची तारीख जवळ आली आहे. विवेकाचा वापर करून, देशहित डोळ्यांपुढे ठेवत मतदान केले तर सर्व समस्या निकाली निघतील, यात शंका नाही.

## जीवन जिज्ञासा

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

# महाभारत ते भारत (८)

भारतभूमी ही धर्मभूमी आहे. धर्म हा तिचा प्राण आहे. अनादिकाळापासून ही धर्मपरंपरा गंगेसारखी अव्याहतपणे अप्रतिहत गतीने या देशात, समाजात वाहत आली आहे. कालमानाप्रमाणे हा धर्म प्रवाह कधी कमी, कधी जास्त वेगाने वाहत आला असेल; पण तो नष्ट मात्र झाला नाही. त्याला नष्ट, भ्रष्ट करण्याचे अथक प्रयत्न जगातील अनेक पाशवी आक्रमणकारी शक्तींनी करून पाहिले, पण ते यशस्वी झाले नाही. या उलट तो प्रयत्न करणारे परास्त झाले; संपले, पण भारताचा हा सनातन धर्म मात्र अद्याप कायमच आहे. त्याला नष्ट करण्याच्या अखंड प्रयत्नांची पराकाष्ठेची प्रतिक्रिया म्हणून सद्यःस्थितीत त्याला जागृती येत असल्याची सुचिन्हे दिसू लागली आहेत. कुंभकर्णासारखा निद्रिस्त असलेला हा समाजपुरुष जागृत होऊ लागल्याची लक्षणे दिसू लागली आहेत. १८९३ सालच्या जागतिक धर्म परिषदेच्या भव्य व्यासपीठावरून नव्या युगाचे प्रेषित स्वामी विवेकानंदांनी 'मी हिंदू असल्याचा मला अभिमान आहे' ही घोषित केलेली उद्घोषणा 'गर्व से कहो हम हिंदू है, सनातन धर्म की जय' या रूपाने हळूहळू संपूर्ण भारतात प्रतिध्वनित होऊ लागली आहे. या जागृतीच्या प्रक्रियेने खऱ्या अर्थाने मूळ जर धरले तर त्यातूनच आधुनिक काळातील 'महाभारत' घडल्याशिवाय राहणार नाही. कारण, मागील काही लेखांत पाहिल्याप्रमाणे कोणत्याही युगातील फाळणीचा परिणाम हा शेवटी कुरुक्षेत्रावरील महायुद्धात म्हणजे संघर्षातच परिणीत होत आला आहे. त्यामुळेच आज भारतातील अंतर्गत परिस्थितीचा निरपेक्षपणे वस्तुस्थितीला धरून विचार केला तर भारत हा अंतर्गत यादवीच्या, गृहयुद्धाच्या उंबरठ्यावर उभा होतो आहे का? याचा विचार करण्याची, चिंतन करण्याची खरी वेळ भरताचे वंशज असलेल्या हिंदूंवर, हिंदू समाजावर आली आहे. कारण हा लढा 'धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या' आणि 'युधिष्ठिरी मनोवृत्तीच्या' आजच्या परिभाषेत आडपडदा न ठेवता सांगायचे झाले तर हिंदू आणि मुस्लिम मनोवृत्तीमध्ये असलेला, दोन भिन्न मानसिकतेमधील असलेला लढा आहे. दोन



मोपल्यांचे बंड

तलवारी जशा एका म्यानामध्ये राहू शकत नाही त्याप्रमाणे या दोन भिन्न मनोवृत्ती गुण्यागोविंदाने, सोज्वळपणाने, पूर्णतः एकरूपतेने नांदूच शकत नाही. निसर्गाच्या, प्रकृतिधर्माच्या विरुद्ध ते आहे. महाभारतात याचे शत्रू-मित्र संबंधात विवेचन करताना असे म्हटले आहे की, 'भक्ष्य आणि भक्षक' हे नाते प्रकृतिसिद्धच आहे. तो त्यांचा स्वभाव आहे. वृत्ती आहे. त्याप्रमाणे क्रियान्वयन, कर्माचे आचरण होत असते. मांजर उंदराला खाणारच, सरडा मुंग्यांना खाणारच, मुंगूस सापाला मारणारच, वाघ-सिंह कोवळ्या हरीण-शावकांवर ताव मारणारच त्या नियमानुसार प्रकृती नियमानुसार असुरी संपदा आणि दैवी संपदा यांचा संघर्ष हा सनातन संघर्ष आहे. त्यामुळे दुष्ट, क्रूर, पीडादायक, दीर्घ द्वेषी, सापाप्रमाणे डूक धरून दंश करण्यासाठी टपून बसलेल्या आपल्या स्त्रिया, धनसंपदा, समृद्धीची अभिलाषा धरून वेळेची वाट पाहणाऱ्या आणि अनुकूल संधी प्राप्त झाल्याबरोबर ते हडप करणाऱ्या कन्यांचे, स्त्रियांचे अपहरण करून त्यांच्यावर बलात्कार करणाऱ्या अशा शत्रूचे समूळ निर्दालन करणे हेच तुझे आद्य कर्तव्य आहे. (महाभारत-कणिक नीती)

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनापासून 'हिंदू आणि मुस्लिमांचे' म्हणजे परस्परांविरुद्ध निसर्गतःच असलेल्या मानसिकतेचे एकत्रिकरण करण्याचा, अनैसर्गिक प्रयत्न भारतातील महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी काँग्रेस या पक्षाद्वारे करण्याचा प्रयत्न केला. त्याच्यासाठी खिलाफत चळवळीची आफत कारण नसताना ओढवून घेतली. त्याने ना अलिबंधू संतुष्ट झाले, ना जिहादी मनोवृत्तीमुळे हिंदूंना शत्रू म्हणजे 'काफर' समजणारा मुस्लिम समाज संतुष्ट झाला. बंगालपासून ते केरळमधील मोपल्यांचे बंडापर्यंत आसुरी संपदेला शोभेसे अत्याचार, बलात्कार, कत्लेआम करून सहस्रावधी हिंदूंचे शिरकाण त्यांनी केले. त्यांच्या या अत्याचारी, बलात्कारी कृतीला महात्मा गांधींनी 'माझे धर्मप्रेमी, धर्मवीर मोपला बंधू' या कौतुकाने पुरस्कृत केले. येथेच हे थांबले नाही तर या मृगतृष्णेच्या मागे भरतवंशीय आणि त्यांचे नेते धावत राहिले. 'भक्ष्य आणि भक्षक' हा निसर्गसिद्ध असलेला अहिनकुलवत न्याय जो महाभारतात सहस्रावधी वर्षांच्या आधी सांगून ठेवला आहे. त्याच्याकडे आम्ही दुर्लक्ष केले. त्याची कटू फळं आज आम्ही भोगत आहोत. महाभारतातील या निसर्गसिद्ध, प्रकृतिसिद्ध न्यायाला अनुसरून एका महान देशभक्ताने, भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या संपूर्ण जीवनाचा होम करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी द्विराष्ट्र सिद्धांतावर आधारित देशाच्या फाळणीकडे काँग्रेसची होणारी वाटचाल व स्वीकार्यतेची मानसिकता लक्षात घेऊन एक निर्वाणीचा इशारा म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंना एका पत्रात लिहिले होते की, (१९३८) हा हिंदू आणि मुस्लिम अशा प्रकारचा संघर्षच नाहीये तर हा निसर्गतःच भिन्न असलेल्या दोन तत्त्वज्ञानांचा, दोन मनोवृत्तींचा संघर्ष आहे. या दोन्ही एकत्रित नांदूच शकत नाही. यावर एकच उपाय आहे. 'आयदर 'अखंड पाकिस्तान' ऑर 'अखंड हिंदुस्तान.' मुस्लिमांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे म्हणणे ऐकले आहे, असे वाटते. कारण ते 'गजवा-ए-हिंदुस्तान,' औरंगजेबाचे हिंदुस्तानला 'दारूल इस्लाम' करण्याचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्णत्वाला नेण्यासाठी कंबर कसून उभे राहिले आहेत.

'द्रष्ट्या' असलेल्या सावरकरांनी काय करायचे?

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**संजय रामगिरवार**

# खर्च मर्यादा!

क्रांतिभूमी चिमूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ऐतिहासिक सभा मंगळवारी पार पडली. याआधी कधीच देशाचे पंतप्रधान चिमुरात निवडणूक प्रचारासाठी आले नव्हते. या अर्थाने आणि प्रचंड मोठा जनसागर या सभेला लोटला याही अर्थाने ही सभा अभूतपूर्व ठरली. सभा सुरू होण्यापूर्वीचा एक गमतीशीर प्रसंग आहे. ज्या दारातून अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, युतीचे मोठे नेते आणि पूर्व विदर्भातील युतीचे उमेदवार मंचावर जात होते, तेथे कडेकोट सुरक्षा व्यवस्था होती. ज्यांच्याकडे सभेच्या व्यासपीठावर जाण्याचे अधिकृत ओळखपत्र होते, त्याच व्यक्तीला सुरक्षा अधिकारी जाऊ देत होते. काही कारणास्तव अनेकांचे ओळखपत्र तयार नव्हते. त्यामुळे चिमूरला सभेसाठी येऊनही मोठ्या नेत्यांना आणि काही उमेदवारांनासुद्धा व्यासपीठापर्यंत पोहोचता आले नाही. ओळखपत्राशिवाय आल्यापावली परत जाणाऱ्यांत माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांचाही समावेश होता. ओळखपत्र नाही म्हणून अहिर यांनी आपली गाडी दारातूनच वळवून घेतली आणि ते चंद्रपूरकडे रवाना झाले. तेथे उपस्थित काही पत्रकारांशी ते बोललेसुद्धा नाहीत. पण खरी गंमत पुढे आहे.

राजुरा विधानसभा मतदार संघातील युतीचे उमेदवार देवराव भोंगळे यांचेही ओळखपत्र तयार नव्हते. त्यामुळे त्यांनाही सुरक्षा व्यवस्थेने आत जाऊ दिले नाही. तणतण करीत ते बाहेर पडले. बाहेर त्यांच्या ओळखीचे काही पत्रकार उभे होते. त्यांनी भोंगळेंना विचारले, ''काय झाले भाऊ?'' त्यावर ते लगेच उत्तरले, ''मला मंचावर जाऊ देत नाही. पण चला बरेच झाले, माझे आठ लाख रुपये वाचले!'' त्यानंतर थोड्याच वेळात त्याच दारासमोर रेंगाळत असलेले



भंडारा जिल्ह्यातील सेनेचे उमेदवार नरेंद्र भोंडेकर आत जातच नव्हते. त्यांच्याकडे बाकायदा ओळखपत्र होते; तरीही ते मंचावर जायला तयार नव्हते. त्यांच्याच एका ओळखीच्या व्यक्तीने त्यांना विचारले, ''उमेदवार साहेब, आपण मंचावर का जात नाही?'' तर तेही बोलले, ''भाऊ, निवडणुकीचा खर्च खूप झाला आहे. आता हे आठ लाख त्यात जोडले गेले तर मी प्रचार कसा करू जी!''

या दोन्ही प्रसंगातून उमेदवारांनी अधिकृत खर्चाची कशी धास्ती घेतली आहे, हे कळते. एका उमेदवाराला खर्चाची जास्तीत जास्त मर्यादा ही ४० लाख रुपये आहे. याच मर्यादेत त्याने आपला निवडणूक खर्च पूर्ण करावा, अशी आदर्श आचारसंहिता आहे. खरे तर, यापेक्षा कितीतरी जास्त खर्च होतो, हे उघड गुपित आहे. पण सर्व खर्च मर्यादेत बसवूनच सादर केला जातो. संबंधित यंत्रणा देयक तेवढे बघते. जास्तीचा खर्च आपल्या अधिकृत खर्चात दिसू नये म्हणून उमेदवारांनी आणखी एक युक्ती शोधली आहे. कोणतीही जाहीर सभा, बैठका आयोजित केल्यानंतर सभेला आलेल्या मतदारांसाठी भोजनाची व्यवस्था करणे उमेदवाराचे कर्तव्य मानले जाते. पण एवढ्या लोकांच्या जेवणाचा खर्च केल्यास थाळीच्या शासकीय दरानुसार मोठा खर्च उमेदवाराच्या खर्च मर्यादेत जोडला जाऊ शकतो, या भीतीने आता सभा किंवा बैठक एखाद्या देवस्थानाजवळ घेतली जाते. सभा आटोपली की घोषणा केली जाते... 'सर्वांच्या प्रसादाची व्यवस्था अमुक देवस्थानाकडून केली गेली आहे, त्याचा लाभ घ्यावा!' खरे तर, ही व्यवस्था कुणी केली आहे हे जवळजवळ उघड असते; पण ते यंत्रणेला सिद्ध करता येत नाही आणि अशा काही गोष्टी चालूनही जातात!

खरे तर, पूर्वीसारखी निवडणूक आता राहिलेली नाही. कच्चा चिवडा आणि घुटभर चहावर कार्यकर्ते साध्या गाड्यांमध्ये बसून प्रचाराला निघायचे. आता एसी गाडी आणि हॉटेलात सुरुची भोज घेतल्याशिवाय कार्यकर्ते प्रचारच करीत नाहीत. सभेला गर्दी जमवायची म्हणजे गावात गाड्या पाठवाव्या लागतात. प्रचार-प्रसाराचा खर्च, जेवणावळी आणि अन्य काही अनधिकृत खर्चही असतोच आणि त्यामुळे निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेनुसार आखून दिलेली ४० लाखांची मर्यादा केव्हाच ओलांडली जाते. पण खर्च मर्यादेत सादर केला जातो आणि सारे काही निभावलेही जाते. खर्चाचेच काय घेऊन बसलो आपण, आजकाल निवडणुकीत साऱ्याच बाबतीत मर्यादेचे उ□ल्लंघन होत नाही का? उमेदवारांच्या आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही कुठे मर्यादेत राहिल्या आहेत. त्याही मर्यादेपलीकडे गेल्या आहेत... असो.

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# प्रत्येक हिंदूने लढलेच पाहिजे मतांचे हे धर्मयुद्ध!

विधानसभा निवडणुकीला आता फक्त पाच दिवस उरले आहेत. २० नोव्हेंबरला मतदान आहे. २३ नोव्हेंबरला निकाल आहे. दर पाच वर्षांनी निवडणूक येते आणि जाते. मात्र, या वेळची निवडणूक त्यातली नाही. ही निवडणूक राज्याची असली, तरी देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ प्रचार सभा करीत आहेत. 'बटेंगे तो कटेंगे' असा असा नारा देत योगी यांनी हिंदू समाजाला सावधानतेचा इशारा दिला. 'एक है तो सेफ है' असे मोदी म्हणाले. या दोन्ही नाऱ्यांची जोरदार चर्चा आहे. निवडणूक आहे म्हणून काहीतरी घोषणा दिली पाहिजे म्हणून या नेत्यांनी हे नारे दिले नाहीत. त्यामागे दूरदृष्टी आहे. हिंदू समाजापुढे काय भयंकर संकट वाढून ठेवलंय, ते लक्षात आणून देणारे हे नारे आहेत. लोकसभा निवडणुकीत आपले तोंड पोळले. ज्या पद्धतीने धार्मिक ध्रुवीकरण करून मतं मागितली गेली त्याचा तडाखा भाजपाला बसला. महाराष्ट्रात तर मोठा खड्डा पडला. त्यामुळे मोदी 'चारसो पार' पोहोचू शकले नाहीत. मित्रपक्षांची मदत घेऊन मोदींना सरकार बनवावे लागले. धुळे या लोकसभा मतदारसंघाचे उदाहरण हिंदूंचे डोळे उघडणारे ठरावे. या मतदारसंघातील सहा जागांपैकी पाच जागी भाजपाचे उमेदवार निवडून आले. धुळ्यात डॉ. सुभाष भामरे आघाडीवर होते. तरीही पराभूत झाले. पाच जागांवरची भाजपाची आघाडी केवळ एका मालेगाव मध्य मतदारसंघातून काँग्रेसच्या मुस्लिम उमेदवाराने कापून काढली. एवढेच नव्हे, तर चार हजारांनी तो विजयीही झाला. मुस्लिम फॅक्टर इतक्या घट्टपणे गठ्ठा मतदान करतो, लोकसभेची जागा जिंकू शकतो, हे महाराष्ट्राने पाहिले. मुस्लिम भागात सर्वच जागी अशा पद्धतीने एकगठ्ठा मतदान झाले आहे. हिंदूंची मतं मात्र वाटल्या गेली. त्यामुळे महाविकास आघाडीला ४८ पैकी ३० जागा मिळू शकल्या. मोदी अनेक कायद्यांमध्ये सुधारणा आणताहेत. घटनेचे ३७० वे कलम रद्द झाले. आता वक्फ कायद्यात सुधारणा करणारे महत्त्वाचे विधेयक त्यांनी आणले आहे. गेल्या ७० वर्षांत आपल्या देशात हिंदुविरोधी राजकारण झालं. मोदी साफसफाई करीत आहेत. सध्या आपल्या देशात हिंदू ८० टक्के आहेत. पण हिंदुविरोधी राजकारण चालत राहिले तर एक दिवस भारतातच हिंदू उपरा होईल, अल्पसंख्यक होईल. हा धोका मोदींनी ओळखला आणि त्या दिशेने त्यांच्या हालचाली सुरू आहेत. हा राजकारणाचा विषय नाही. हिंदुत्व टिकले, इथल्या धर्म-परंपरा टिकल्या तर हिंदू टिकेल. शेजारच्या बांगलादेशात काय सुरू आहे, हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत. तिथल्या पंतप्रधानाला पळून भारतात यावे लागते, जे पळू शकत नाही त्या तिथल्या हिंदूंवर अत्याचार सुरू आहेत. भारतात हे होऊ द्यायचे नसेल, हिंदू म्हणून पुढच्या पिढ्यांना जगू द्यायचे असेल तर हिंदूंनी सावध झाले पाहिजे. या विधानसभा निवडणुकीत हिंदूंना ही संधी आहे. हिंदू हिताच्या गोष्टी करेल त्यालाच मतदान झाले पाहिजे. मुस्लिमांचे १०० टक्के मतदान होते. मग हिंदूंचे १०० टक्के मतदान का होऊ शकत नाही? मतदानाशी



आपल्याला काही देणेघेणे नाही; आपला काय फायदा? ही मानसिकता आता तरी हिंदूंनी सोडली पाहिजे. प्रत्येक हिंदूने मतदानाला गेलेच पाहिजे.

आताच्या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाआघाडी अशी टक्कर आहे. काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंची शिल्लक सेना या तीन पक्षांनी मिळून महाआघाडी बनवली आहे. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात खूप उलथापालथ झाली. भाजपासोबत युती करून उद्धव ठाकरे विधानसभा लढले. मात्र, निकालानंतर शरद पवारांकडे जाऊन बसले. अडीच वर्षांचे मुख्यमंत्रिपद भोगले. अखेर त्यांच्याच ४० आमदारांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बंड करून सरकार पाडले. भाजपाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात सरकार बनवले. गेल्या वर्षी या महायुतीत अजित पवारही सामील झाले. आपले काका म्हणजे शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष फोडून अजितदादांनी खळबळ उडवली. लोकसभा निवडणुकीत मात्र अजितदादा ताकद दाखवू शकले नाहीत. त्यांची पत्नी बारामतीत पराभूत झाली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीचे गणित वेगळे असते. यावेळी रणांगणात उमेदवारांची भाऊगर्दी आहे. आघाडी आणि महायुती यांचेही बंडखोर आहेत. राज ठाकरे स्वबळावर लढताहेत. वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पक्ष... खूप सारे मैदानात आहेत. मोठ्या प्रमाणावर मतविभाजन होणार आहे. ओबीसींमधून मराठा आरक्षण मिळाले पाहिजे हा मुद्दा मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार पेटवला. जरांगे पाटलांनी सुरुवातीला चांगला माहोल बनवला होता; मात्र शेवटच्या दिवशी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. 'पाडायचं त्याला पाडा' आणि 'आणायचं त्याला आणा' अशी भूमिका सध्या त्यांनी घेतली आहे. मात्र, वारंवार मारलेल्या कोलांटउड्यांमुळे त्यांनी स्वतःचा 'अण्णा हजारे' करून घेतला. मराठवाड्यापुरती जरांगे पाटील धूम करू शकतात, असा त्यांच्या समर्थकांचा दावा आहे. त्यामुळे कोणाचे सरकार येणार? कोणाला बहुमत मिळेल? याची जोरदार चर्चा आहे. '५० ते ६० आमदार निवडून आणता येतील' असे शिल्लक राष्ट्रवादीचे सुप्रीमो शरद पवार यांनी एक मुलाखतीत म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांचा स्ट्राईक रेट तगडा होता. तेच ५०-६० जागांवर थांबले; याचा अर्थ काँग्रेस आणि ठाकरे सेना २५-२५ जागांच्या आत निपटतील. म्हणजे महाआघाडी १०० जागांच्या आत गुंडाळली जाईल. बहुमतासाठी १४५ आमदार हवेत. शरद पवार माणसं फोडण्यात वस्ताद आहेत. थोडे लागले तर पवार पुतण्यालाही फोडून आणू शकतात. हा जर-तरचा प्रश्न झाला. मुळात शरद पवारांनाच बहुमताची खात्री नाही. बहुमताची थोडीही खात्री असती तर पवारांनी आपला आकडा वाढवून सांगितला असता. यावेळी त्यांनी उभे केलेले बहुसंख्य उमेदवार इकडून तिकडून उधारीवर आणलेले आहेत. उद्धव ठाकरे यांचा करिष्मा संपला आहे. त्यांच्याबद्दल सहानुभूती तर अजिबात नाही. त्यामुळे उद्धव यांची चिडचिड वाढली आहे. वणीमध्ये निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या बॅग तपासल्या. त्यावर त्यांनी खूप आरडाओरड केली. रोज सकाळी संजय राऊत यांचा भोंगा वाजवून उद्धव यांनी स्वतःचे नुकसान करून घेतले. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी होते तसले वातावरण आज नाही. त्या काळात विरोधकांनी खूप खोटा प्रचार केला. त्या खोट्या प्रचाराला लोक भुलले. यावेळी भाजपाच्या विरोधात ठोस असा मुद्दाच विरोधकांकडे नाही. राहुल गांधींनी नागपुरात 'लाल डायरी' दाखवून स्वतःची फजिती करून घेतली. नाना पटोले, विजय वडेट्टीवार आणि यशोमती ठाकूर या तिघांनाही मुख्यमंत्री व्हायचंय. 'एक अनार और सौ बीमार' अशी परिस्थिती आहे. ज्याच्या जास्त जागा येतील त्याचा मुख्यमंत्री, असे सूत्र ठरले आहे. त्यामुळे महाआघाडीमध्ये एकमेकांचे उमेदवार कसे कमी निवडून येतील, याची चढाओढ लागलेली दिसते. याच्या नेमके चित्र महायुतीत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी प्रचाराची धुरा व्यवस्थित सांभाळली. मित्रपक्षांमध्ये कुठलाही वाद झाला नाही, हे फडणवीस यांच्या नेतृत्वाचे विशेष म्हणावे लागेल. तुम्ही लिहून ठेवा, महायुती किमान १८० जागा जिंकेल. हरयाणाच्या निकालामुळे महायुतीत उत्साहाचे वातावरण आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा विजयी झाल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील हिंदूंचे आभार मानले. यातूनही चांगला संदेश गेला आहे.


९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### आम्ही हे तरी करू शकतो ना?

आम्ही मध्यम वर्ग, आमचा मध्यम मार्ग. आम्ही कोणाच्या अध्यात-मध्यात नाही. आपली नोकरी, काम, व्यवसाय शक्य तेवढ्या इमानदारीने करतो, टॅक्स निमूट नियमित भरतो, शासन-प्रशासनाला त्रास होईल, असे वागत नाही, नियम पाळतो.




आम्ही हजारोंच्या संख्येने रस्ते अडवू शकत नाही, दगडफेक आम्हाला येत नाही, जाळपोळ दंगा करणे... आम्ही स्वप्नात पण विचार करत नाही. नियम कायदे पाळतो. मतदान जमेल तर करतो, नाही तर नोटा दाबतो, पण.... पण... असे वागणे आताच्या परिस्थितीत मूर्खपणाचे ठरते आहे, कळते आहे का? त्यांना नावे ठेवतो, शिव्या पण देतो (मनातल्या मनात), टीव्हीवर डिबेट ऐकतो, पेपर वाचतो, पण बस, मग आपल्या कामाला 'मला काय त्याचे' हे आमचे आवडते पालुपद आहे. अफगाणिस्तान, पाकिस्तान, काश्मीर, बंगाल, कर्नाटकमध्ये काय होते ते आम्ही वाचतो आणि विसरतो. कारण ते आमच्या दूर आहे ना. आता जर हेच संकट आपल्या उंब्र्यावर आले असेल तरी आम्ही काहीच करणार नाही का? नाही नाही याचा विरोध करायला हातात संविधान शस्त्रे घ्यायची गरज नाहीच, पण संविधानाने दिलेले एक शस्त्र आहे आपल्याकडे मतास्त्र. मग लक्षात ठेवा, २० नोव्हेंबरला मतदान करा आणि इतरांचेही मतदान करवून घ्या. मतदान त्यालाच करा जो आमचे व आमच्या महाराष्ट्राचे रक्षण करेल; त्याची भरभराट करेल. शत-प्रतिशत मतदान, राष्ट्र हितात मतदान.

**रवी वाघमारे**/नागपूर

●● ●●

### पाकिस्तानमध्ये क्रिकेट नकोच

'पाकिस्तानने भारतासोबत क्रिकेट खेळणे बंद करावे : रशीद लतीफ' ही बातमी वाचली. पाकिस्तानच्या भूमीवर क्रिकेट खेळण्यास बीसीसीआयने स्पष्ट नकार दिला हे योग्यच आहे. पाकिस्तानबरोबर संबंध सुधारण्यासाठी आजवर भारताने 'राजनीती एक तरफ और कला कल्चर दुसरी तरफ' या विचाराने इतकी दशके बरेच प्रयत्न केले. पण भारताच्या या प्रयत्नांना पाकिस्तानने नेहमीच दहशतवादाने, निष्पाप नागरिकांचे



बळी घेऊन आणि आमच्या जवानांवर भ्याड हल्ले करून प्रत्युत्तर दिले. भारताच्या या चांगूलपणाला पाकिस्तानने सातत्याने विश्वासघाताने प्रतिसाद दिला, हे वास्तव आहे. भारतात अशांतता, अराजकता, हिंसाचार आणि दहशतवाद पसरवण्यासाठी काहीही करण्याचे पाकिस्तानने बाकी ठेवलेले नाही. तेव्हा पाकिस्तानवर विश्वास ठेवणे शहाणपणाचे ठरणार नाही. दुसरे महत्त्वाचे म्हणजे आयसीसीमध्ये भारताच्या विरोधात जाण्याची हिंमत सध्या तरी नाही; कारण आयसीसीच्या आर्थिक उत्पन्नामध्ये ८० टक्के वाटा एकट्या बीसीसीआयचा आहे. जर भारताने आंतरराष्ट्रीय क्रिकेटवर बहिष्कार घातला आणि आयसीसीचे उत्पन्न घटले तर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाला हातात कटोरा घेऊन दारोदारी फिरावे लागेल, अशी स्पष्टोक्ती पाकिस्तानचा सुप्रसिद्ध खेळाडू रमीझ राजाने केले होते. तिसरा मुद्दा म्हणजे पाकिस्तानी सिलेब्रिटी, बुद्धिजीवी, विचारवंत, तेथील विरोधी पक्षनेते आणि सर्वच खेळाडूंनी पाकिस्तान सरकारवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद बंद करण्यासाठी कधीच कोणतेही प्रयत्न केले नाहीत. उलट 'कला आणि कल्चर'च्या माध्यमातून पाकिस्तानी दहशतवाद पसरवण्याला त्यांनी एक प्रकारे मूकसंमतीच दिली आहे. उलट पाकिस्तानला सर्वच क्षेत्रात, जागतिक पातळीवर वाळीत टाकण्याचे प्रयत्न भारताने केले पाहिजेत; त्याशिवाय पाकिस्तानचे दहशतवादी डोके ठिकाणावर येणार नाही. तेव्हा पाकिस्तानने या स्पर्धेचे यजमानपद सोडायला नकार दिला आणि स्पर्धा रद्द करण्याची वेळ आली तरी बेहत्तर; पण पाकिस्तानात जाऊन भारतीय क्रिकेट संघाने आणि बीसीसीआयने आपल्या हुतात्मा जवानांचा आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निरपराध नागरिकांशी प्रतारणा करू नये. नागरिक हे कधीच सहन करणार नाहीत, याचीही नोंद घ्यावी.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### प्रवाशांनी सहकार्य करावे

काटोल येथील बसस्टॉपवर गेल्या अनेक दिवसांपासून सिमेंटीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे सर्व बसेस या बसस्टॉपच्या मागच्या बाजूस उभ्या करण्यात येत आहेत. या ठिकाणांवरूनच वरुडकडे तसेच अवतीभवतीच्या खेडोपाडी बसेस जातात. पण बसस्टॉपच्या या मागच्या बाजूस बस उभ्या करण्याकरिता पुरेशी सोय नसल्यामुळे आणि त्यातल्या त्यात शाळांचे विद्यार्थी आणि प्रवाशांची गर्दी खूप होत असल्यामुळे तारांबळ उडते तसेच बसचालकालाही बस या जागी लावणे कठीण होत आहे. अशावेळी प्रवाशांनीही योग्य काळजी घेऊन काटोल बसस्टॉपच्या प्रगतीचे कार्य होईपर्यंत बसचालक-वाहकांना सहकार्य करून नको असलेली गर्दी टाळली पाहिजे.

**संचिता वानखेडे**/काटोल, जि. नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे. की. एन. काटकर मॅडम) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ३४१/२०२४

अर्जदार : १. श्री. सुंदरराव पि.काळु सपकाळ वय-६० धंदा- शेती रा. वडोद ता. कन्नड जि. औरंगाबाद २. श्री. महारू पि. सुंदरराव सपकाळ वय-३८ धंदा- घरकाम रा. वडोद ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरुध्दः-

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ व २ यांनी या मा. न्यायालयात अॅड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ ची पत्नी व अर्जदार क. २ ची आई मयत नामे शांताबाई भ्र. सुंदरराव सपकाळ यांचा मृत्यु दि. २०/१०/२०२४ रोजी मौजे वडोद ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ व २ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत शांताबाई भ्र. सुंदरराव सपकाळयांचे मरणोपरांत लाभ मिळणेसाठी व इतर शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे वारस कारवाई करण्यासाठी हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ व २ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयत शांताबाई भ्र. सुंदरराव सपकाळ यांचे मरणोपरांत लाभ मिळणेसाठी व इतर शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे मयत शांताबाई भ्र. सुंदरराव सपकाळ यांचे वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही. करीता आज दि. १३/११/२०२४

रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३०३/२०२४

पुढील तारीख ३०/११/२०२४.

अर्जदार :- १. छायाबाई श्र. भास्कर दापके वय - ५७ वर्षे, धंदा- शेती, रा.माळीवाडा, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. गोपाल पिता. भास्कर दापके वय - २१ वर्षे, धंदा- शेती, रा. माळीवाडा, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. कृष्णा पिता भास्कर दापके वय - १८ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. माळीवाडा, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. वैष्णवी पिता भास्कर दापके दय - १९ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. माळीवाडा, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद (छ. संभाजीनगर)

अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन अँक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील अॅड. डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, मयत गोपीचंद पिता कचरु दापके हे माळीवाडा कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद येथील रहीवाशी होते. ते दिनांक २१.०६.१९८५ रोजी राहत्या घरी मयत झाले असुन अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत गोपीचंद पिता कचरु दापके यांचे वारस असुन हया व्यतीरीक्त गोपीचंद पिता कचरु दापके यांना इतर कोणीही वारस नाही. मयत गोपीचंद पिता कचरु दापके यांची पत्नी नामे मिनाबाई हिने दुसरे लग्न केल्यामुळे तिला वारसांच्या यादीत समाविष्ट केले नाही. अर्जदार १ ते ४ यांना मयत गोपीचंद पिता कचरु दापके यांचे मृत्यु पश्चात शासकिय कार्याल्य, नगरपालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कन्नड, गाव नगर व शहर भुमापन कार्यालय महानगरपालिका, तलाठी कार्यालय, महसुल दप्तरी गट विकास अधिकारी कार्याल्य, व ईतर शासकिय व निमशायकिय कार्यालयामध्ये आवह्यक त्या कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याकारणाने अर्जदार क्रं.१ ते ४ हे मयताचे वारस असल्या बाबतचे कायदेशिर वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ चे सासरे व अर्जदार क्रं.२ ते ४ यांचे आजोबा आहे. सदर मयतास अर्जदार १ ते ४ हे वारस असुन वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.१२.०८.२०२४ रोजी मौजे कन्नंड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/११/२०२४.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे. व्ही. डी. पाटील साहेब) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ३३३/२०२४

अर्जदार : १. श्रीमती. सुनिता भ्र.ज्ञानेश्वर भारूडे वय-२८ वर्षे, धंदा- घरकाम, अर्जदार क. १ स्वतःसाठी व क. २ व ३ तर्फे अ.पा.क. २. कु.गौरी पि.ज्ञानेश्वर भारूडे वय १३ वर्षे, धंदा-शिक्षण, ३. चि. रूद्र पि.ज्ञानेश्वर भारूडे, वय १० वर्षे, धंदा-शिक्षण, ४.श्री. रामभाउ पि.गंगाराम भारूडे, वय ७० वर्षे, धंदा-शेती, ५. सौ. लताबाई भ्र.रामभाउ भारूडे, वय ६३ वर्षे, धंदा-घरकाम, सर्व रा- टाकळी (अं.) ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या मा. न्यायालयात अॅड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती अर्जदार क. २ ते ३ यांचे वडील व अर्जदार क. ४ व ५ यांचा मुलगा मयत नामे ज्ञानेश्वर पि. रामभाउ भारूडे यांचा मृत्यु दि. १५/०५/२०२१ रोजी मौजे टाकळी (अं.) ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते ५ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत ज्ञानेश्वर पि. रामभाउ भारूडे यांचे मरणोपरांत लाभ मिळणेसाठी तसेच दरमहा फॅमिली पेन्शन मिळणेसाठी व इतर शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार क. १ सुनिता भ्र.ज्ञानेश्वर भारूडे हिचे नांवे मयताची पत्नी म्हणुन तिला दरमहा फॅमिली पेन्शन मिळणेसाठी हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ५ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयत ज्ञानेश्वर पि.रामभाउ भारूडे यांचे मरणोपरांत लाभ मिळणेसाठी तसेच दरमहा फॅमिली पेन्शन मिळणेसाठी व इतर शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे मयत ज्ञानेश्वर पि. रामभाउ भारूडे यांचे वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार क. १ सुनिता भ्र. ज्ञानेश्वर भारूडे हिचे नांवे मयताची पत्नी म्हणुन तिला दरमहा फॅमिली पेन्शन मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ०७/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 476/2024

अर्जदार : १. विमल सुभाष रणयेवले, रा.धामोरी खुर्द, ता.गंगापुर जि. औरंगाबाद २. पुष्पा दिपक राजगुरू, रा.९९/१०९, दुसरा मजला, नगर गुरु गोविंदसिंग मार्ग, बीएमसी पाईप लाईन समोर, मुलुंड कॉलनी, मुंबई उपनगर ३. संतोष सुभाष रणयेवले, रा.धामोरी खुर्द, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ४. कविता सोमनाथ पगारे, रा.शिवुर, ता.वैजापुर जि. औरंगाबाद ५. सविता वाल्मिक बागुल, रा. सुरेगाव रोड, देवठाण, नाशिक ६. उषा रविंद्र गायकवाड, रा. भिंगी बोरसर, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ७. रविराज सुभाष रणयेवले, रा.धामोरी खुर्द, ता. गंगापुर जि.औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ अॅड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पती आणि अर्जदार नं. २ ते ७ यांचे पिता नामे सुभाष मुरलीधर रणयेवले सुभाष मुरलीधर यांचा दि.०५/०५/२०२१ रोजी मौजे अनंतपुर-लासुर स्टेशन ता. गंगापुर जि.औरंगाबाद येथे मृत्यु पावले आहे. मयत सुभाष मुरलीधर रणयेवले यांना अर्जदार नं. १ ते ७ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत सुभाष मुरलीधर रणयेवले यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी कुले चमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १४/११/२०२४ रोजी दिले.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-५६४**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**दिनांक १८/०९/२०२४**

अर्जदार ०:- शेख अनवेज शेख अनवर रा. गोरीपुरा बंगला कन्नड ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर विरूध्द

गैरअर्जदार ०:- नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :-जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ०२-०७-१९८९ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ०२-०७-१९८९ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ०२-०७-१९८९ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १३-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०२-०७-१९८९ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १८/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

# विशेष निरीक्षक मिश्रा यांनी घेतला निवडणूक पूर्वतयारीचा आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि.१५(जिमाका)- भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ करिता महाराष्ट्र राज्यासाठी नियुक्त केलेले विशेष निरीक्षक (सामान्य) राम मोहन मिश्रा यांनी आज जिल्ह्यातील निवडणूक पूर्वतयारीचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या बैठकीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, निवडणूक निरीक्षक बिद्यानंद सिंग (१०४-सिल्लोड, १०५- कन्नड), तलत परवेज(१०६-फुलंब्री,१०७-औरंगाबाद मध्य), श्रीमती कोर्रा लक्ष्मी (१०८-औरंगाबाद पश्चिम, १०९-औरंगाबाद पूर्व), उज्ज्वलकुमार सिंग (११०-पैठण, १११- गंगापूर, ११२ वैजापूर), निरीक्षक(पोलीस) राजपालसिंग (भा.पो. से.),उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूकीच्या अनुषंगाने होत असलेल्या तयारीची माहिती दिली. मतदारसंघनिहाय मतदान केंद्र, मतदार यादी, मतदार चिठ्ठी वाटप, निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मतदान केंद्रावर द्यावयाच्या व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था उपाययोजना, मतदार जनजागृतीसाठी राबविलेले उपक्रम याबाबत माहिती देण्यात आली. श्री. मिश्रा यांनी सांगितले की, जसजसा निवडणूकीचा दिवस जवळ येईल त्यानुसार आता नियुक्त केलेल्या विविध सर्व्हेक्षण पथकांमार्फत तपासण्या सुरु ठेवा. आचारसंहिता पालनाबाबत अधिक दक्षता घ्यावी. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदाराला मतदान केंद्रांवर मतदान करणे सहज सुलभ व्हावे यावर लक्ष ठेवण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करावा. मतदार जनजागृतीवर भर द्यावा अशा सुचना केल्या.

# विशेष खर्च निरीक्षक बालकृष्णन यांनी घेतला आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि.१५(जिमाका)- भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक २०२४ करीता महाराष्ट्रासाठी नियुक्त विशेष खर्च निरीक्षक महाराष्ट्र राज्य बी.आर. बालकृष्णन यांनी आज जिल्ह्यातील यंत्रणांचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जिल्ह्यासाठी नियुक्त निरीक्षक(खर्च) कोटापट्टी वाम्शी क्रिष्णा व सोभान सुत्रधार उपस्थित होते.

बैठकीत बी.आर. बलकृष्णन यांनी निर्देश दिले की, मतदानाच्या दिवसा आधी तीन दिवसांत आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवावे. त्यासाठी विविध पातळ्यांवर निरीक्षण ठेवावे. स्थिर पथकांची ठिकाणे बदलत रहावी. जेणेकरुन अशाप्रकारे अवैध वाहतुक करणारे पाहणी स्थळे लक्षात घेऊन पर्यायी मार्ग अवलंबण्याची शक्यता गृहीत धरुन आपले ठिकाणे बदलत रहावे. शेवटच्या ७२ तासांत गस्त वाढवा. भरारी पथकांसोबत राज्य राखीव दलाचे जवान देण्यात यावे, या तीन दिवसांत राज्य उत्पादन शुल्क, फिरती पथके इ. नी गस्त वाढवावी. अशा सुचना देण्यात आल्या. यासोबत संलग्न असलेल्या जालना, बुलडाणा, बीड या जिल्ह्यांचाही आढावा घेतला.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 102-Badnapur | Narayan Tilakchand Kuche | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble District Judge-1 And Addl. Sessions Judge, Jalna. SC No. 262/2023 Pending. | U/s. 143, 149, 188, 447, of IPC, u/s. 135 Maharastra Police Act, u/s.11 Maharashtra State Statue Defacement Act . | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 102 - Badnapur**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 111 - Gangapur | Prashant Bansilal Bumb | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble Judicial Magistrate First Class Court, Gangapur. RCC No. 64/2022 Pending. | U/s. 420, 406, 467, 468, 469, 471, 472, 474, 34, 120Bof IPC. | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Hon'ble Chief Judicial Magistrate, Aurangabad. CC No. 4351/2024 Pending. | U/s. 135 Maharastra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 111 -Gangapur**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 83 - Kinwat | BHIMRAO RAMJI KERAM | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble JMFC Court, Yewatmal. CC No. 4456/2017 Pending. | U/s. 341, 143, 188, of IPC, u/s. 135 Maharastra Police Act. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 83-Kinwat**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विदेश

**फिरोज बख्त अहमद**

# अबुधाबीमध्ये मानवतेचे मंदिर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वर्षी १४ फेब्रुवारी रोजी बीएपीएस स्वामी नारायण भव्य मंदिराचे उद्घाटन केले होते. स्वामी नारायण मंदिर हे मानवतेचे मंदिर ठरले असून आज आठ महिन्यानंतर याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. दुबईत गेल्या ४५ वर्षांपासून वास्तव्य करणारे हिंदी तज्ज्ञ आणि भाषातज्ज्ञ साहित्य चतुर्वेदी म्हणाले की, अबुधाबीचे हे मंदिर व्हॅटिकनच्या सेंट बॅसिलिका चर्चपेक्षाही अधिक भव्य आहे! अर्थात सौंदर्याच्या संदर्भात श्रद्धास्थानांची एकमेकांशी तुलना करणे योग्य नसले तरी या विषयात निश्चितच तथ्य आहे, असे वाटते. 'हे मानवतेचे मंदिर आहे' असे अबुधाबीमधील या हिंदू मंदिराचे समन्वयक डॉ. मुस्तफा सासा म्हणाले.

### इस्लामी विश्वातील वैदिक मंदिर

एका इस्लामिक देशात स्वामी नारायण मंदिर बांधण्यात आले. हा चमत्कार कसा काय घडला याचे अनेकांना आश्चर्य वाटते! गेल्या काही वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अरब देशांशी भारताचे संबंध अतिशय दृढ केले. या प्रगाढ संबंधांचाच सकारात्मक परिणाम असा झाला की कतारने फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या भारतीय नौदलाच्या माजी अधिकाऱ्यांना सुखरूप भारतात परत आणण्यात आले. भारतीय हवाई दलाचे फायटर पायलट विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांचीही मोदी सरकारने पाकिस्तानातून अशीच सुखरूप सुटका केली होती, याची आठवण वाचकांना असेलच. वस्तुस्थिती ही आहे की मोदींचे वसुधैव कुटुंबकम आणि यूएईचे राजे शेख मुहम्मद जायद-बिन-अल-नाहयान यांच्या 'लकुम दीनोकुम वेल यदीन' या सूत्राने आंतरधर्मीय सद्भावना, समता, समरसता आणि समता यांचा चमत्कार घडवला आहे.


खरे तर, पंतप्रधान मोदी आणि अल-नाहयान आतापर्यंत सात वेळा भेटले आहेत आणि भारत व अरब देश, विशेषतः यूएईचे राजकीय, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक संबंध आहेत आणि येथे जवळपास ४० लाख भारतीय नोकरी, व्यवसायानिमित्त राहतात, हे दोघांनाही चांगले माहीत आहे. तसेच यूएईच्या विकासात भारतीयांचे मोठे योगदान आहे, हे देखील अल-नाहयान पूर्णपणे जाणून आहेत.

### मंदिरातून आर्थिक लाभ

या दोन्ही नेत्यांना हेही माहीत आहे की, कोणतीही धार्मिक व्यक्ती आपले आराध्य व श्रद्धास्थानांविषयी मनापासून समर्पित असेल तर कोणत्याही सरकारला यातून पर्यटन व्यवसायही मिळतो. राजस्थान सरकारला हजरत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या भक्तांकडून जसा लाभ मिळतो तसाच बीएपीएस स्वामी नारायण मंदिराच्या उद्घाटनामुळे अबुधाबीलाही प्रचंड आर्थिक फायदा होईल. हे मंदिर केवळ यूएईमध्ये समृद्धीच आणणार नाही, तर इस्लामचा संपूर्ण विश्व एक कुटुंब आहे हा संदेशही हे मंदिर पसरवेल.

संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी २०१७ मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून भारताला भेट दिली होती. २०१९ मध्ये अल नाहयान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रतिष्ठित 'ऑर्डर ऑफ जायद' पुरस्कार देऊन सन्मानित केल्यावर भारत आणि यूएई यांच्यातील संबंध अधिकच प्रगाढ झाले. दोन्ही नेत्यांनी अनेकदा प्रोटोकॉल मोडून एकमेकांचे स्वागत केले आहे, यावरून भारत आणि यूएई यांच्यातील संबंध किती प्रगाढ, किती बळकट आहेत, हे लक्षात येईल. एवढेच नव्हे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेहमीच यूएईचे राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन जायद अल नाहयान यांना 'बंधू' म्हणून संबोधतात.

दुबई-अबुधाबी शेख जायद महामार्गावरील अल रहबा जवळ अबू मुरिखा येथील बीएपीएस हिंदू मंदिर जवळपास २७ एकर भूमीवर बांधण्यात आले आहे. २०१९ पासूनच या मंदिराचे बांधकाम सुरू झाले होते. पंतप्रधान नरेंद मोदींनी आपल्या २०१५ च्या यूएई दौऱ्यात राष्ट्रपती अल नाहयान यांच्याजवळ यूएईत मंदिर बांधण्याची इच्छा व्यक्त केली होती. अल नाहयान यांनी मोदींच्या इच्छेला तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत 'तुम्ही जी भूमी निवडाल तेथेच मंदिर बांधू' असे नि:संदिग्ध शब्दात सांगितले. संयुक्त अरब अमिरातमध्ये आणखी तीन हिंदू मंदिरे आहेत, जी दुबईमध्ये आहेत. या मंदिरांनाही जगभरातून लाखो भाविक भेट देतात. संयुक्त अरब अमिरातीची राजधानी अबुधाबी येथील पहिल्या दगडी हिंदू मंदिराच्या मोदींच्या हस्ते उद्घाटनाची तयारी अनेक वर्षांपासून सुरू होती. १०० हून अधिक भारतीय शाळकरी मुलांनी मंदिर परिसर सजविण्यात व दगडांना रंग देण्यात योगदान दिले होते.



> १९६२ पूर्वी, यूएई केवळ खजूर, मोती आणि मासे यांच्या व्यापारापुरतेच मर्यादित होते. पण, यूएईमध्ये खनिज तेलाचे साठे आढळताच संपूर्ण दृष्यच पालटले. यूएईने तेल व्यवसायाच्या माध्यमातून विकासाची अनोखी गाथा लिहिली, ज्याने मोठमोठ्या देशांना मागे टाकले. १९९० च्या दशकात आखाती देशांमध्ये यूएई एक आर्थिक शक्तिस्थान म्हणून उदयास आले. १९७० पर्यंत भारत आणि यूएई मधील द्विपक्षीय व्यापार १८० मिलियन डॉलर्स होता, जो २०२१-२२ मध्ये ७३ बिलियन डॉलर्स पर्यंत पोहोचला आहे. २०२२ मध्ये भारत आणि यूएई दरम्यान व्यापक आर्थिक भागीदारी करारावर (सीईपीए) स्वाक्षऱ्या झाल्या. दोन्ही देशांनी पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार ११५ बिलियन डॉलर्सपर्यंत वाढवण्याचा संकल्प केला आहे.

अबुधाबी येथील मंदिराकडे दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये मैलाचा दगड म्हणून पाहिले जात आहे. भारत आणि यूएईमधील संबंध हजारो वर्षे जुने आहेत. मसाले, दागिने, सुगंधी द्रव्ये (परफ्यूम) आणि कापडाच्या व्यापारापासून सुरू झालेले हे संबंध आता ऊर्जा, मुत्सद्देगिरी आणि धोरणात्मक संबंधांपर्यंत पोहोचले आहेत. भारत-यूएई भागीदारी २१ व्या शतकातील एक निश्चित युती म्हणून उदयास आली आहे. पंतप्रधान मोदी प्रथमच सत्तेत आल्यानंतर म्हणजे २०१४ नंतर भारत आणि यूएई यांच्यातील संबंधांना गती मिळू लागली. २०१५ मध्ये, पंतप्रधान मोदींनी संयुक्त अरब अमिरातीचा ऐतिहासिक दौरा देखील केला, ज्याने राजनैतिक संबंधांमध्ये नवीन युगाची सुरुवात केली. यानंतर भेटी, करार आणि प्रशंसा यांची मालिका सुरू झाली, ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिकच प्रगाढ, सुदृढ झाले आहेत.

१९६२ पूर्वी, यूएई केवळ खजूर, मोती आणि मासे यांच्या व्यापारापुरतेच मर्यादित होते. पण, यूएईमध्ये खनिज तेलाचे साठे आढळताच संपूर्ण दृष्यच पालटले. यूएईने तेल व्यवसायाच्या माध्यमातून विकासाची अनोखी गाथा लिहिली, ज्याने मोठमोठ्या देशांना मागे टाकले. १९९० च्या दशकात आखाती देशांमध्ये यूएई एक आर्थिक शक्तिस्थान म्हणून उदयास आले. १९७० पर्यंत भारत आणि यूएई मधील द्विपक्षीय व्यापार १८० मिलियन डॉलर्स होता, जो २०२१-२२ मध्ये ७३ बिलियन डॉलर्स पर्यंत पोहोचला आहे. २०२२ मध्ये भारत आणि यूएई दरम्यान व्यापक आर्थिक भागीदारी करारावर (सीईपीए) स्वाक्षऱ्या झाल्या. दोन्ही देशांनी पुढील पाच वर्षांत द्विपक्षीय व्यापार ११५ बिलियन डॉलर्सपर्यंत वाढवण्याचा संकल्प केला आहे.

या मंदिराच्या उद्घाटनामुळे सर्वत्र सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. अबुधाबीचे हे मंदिर मानवतेचे मंदिर ठरले आहे.

**(लेखक माजी कुलपती आणि भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वंशज आहेत.)**


## शिक्षण

# प्राचीन तक्षशिला विद्यापीठ

प्राचीन काळी भारत अनेक क्षेत्रात प्रगत होता. शिक्षणक्षेत्रही त्याला अपवाद नाही. त्यातील एक जगप्रसिद्ध नाव म्हणजे 'तक्षशिला'. तक्षशिला हे प्राचीन भारतातील एक प्रसिद्ध विद्यापीठ आहे. तक्षशिला ही नगरी प्राचीन गांधार देशाची राजधानी होती. पूर्वी भारतात असलेले हे ठिकाण सध्या पाकिस्तानात रावळपिंडीपासून वायव्येस सुमारे ३५ किमी. अंतरावर आधुनिक सराईकल या रेल्वे स्थानकाजवळ आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाचे प्रमुख संचालक सर जॉन मार्शल यांनी या भागात उत्खनन केले. तक्षशिला नगरी व विद्यापीठ यांचे उल्लेख रामायण, महाभारत आणि जातकांत आढळतात. काही ग्रीक व चिनी परदेशी प्रवाशांनीही आपल्या प्रवासवृत्तांतात या विद्यापीठाचा उल्लेख केला आहे.

कैकेयीपुत्र भरताने तक्षशिला नगर वसविले व त्याला तक्ष या आपल्या मुलाचे नाव दिले, असे मानले जाते. इ. स. पूर्व आठव्या शतकापासून इ. स. चौथ्या शतकापर्यंत सु. १,२०० वर्षे हे विद्यापीठ अस्तित्वात होते. या कालखंडात त्या प्रदेशावर ग्रीक, इराणी, मौर्य, कुशाण वगैरे अनेक राज्यकर्त्यांच्या राजकारणाचा, संस्कृतींचा आणि भाषांचा प्रभाव पडला व त्याचा परिणाम विद्यापीठातील भाषा आणि अभ्यासक्रम यांवरही झाला. इ. स. पाचव्या शतकात हूणांनी तक्षशिलेचा पूर्ण विध्वंस केला व तेव्हापासून हे विद्यापीठ बंद पडले.

तक्षशिला विद्यापीठाची रचना ही आधुनिक विद्यापीठांप्रमाणे नव्हती. तेथे अनेक विद्यार्थी उच्च अध्ययनाकरिता भारतातील कोनाकोपऱ्यांतून व आशिया□यूरोपमधील देशांतूनही येत. प्रत्येक शिक्षक म्हणजे एक स्वतंत्र संस्थाच असे. त्याला त्याचे प्रौढ विद्यार्थी मदत करीत. एका शिक्षकाच्या हाताखाली सु. ५०० विद्यार्थी असत, असा उल्लेख जातकांत आहे.



विद्यार्थ्यांच्या भोजन-निवासाची सोय विद्यापीठाच्या वसतिगृहात असे. सधन वर्गातील विद्यार्थी संपूर्ण शिक्षणाकरिता सामान्यतः एक हजार सुवर्णनाणी शुल्क म्हणून देत. निर्धन विद्यार्थी गुरुगृही राहून नेमलेली कामे दिवसा करीत आणि रात्री अध्ययन करीत. काही विद्यार्थी अध्ययन पूर्ण झाल्यानंतर पैसे मिळवून गुरुदक्षिणा देत.

प्रवेशपरीक्षेनंतर १६□१७ वर्षे वयाचे विद्यार्थी घेतले जात. शिक्षणाचा कालावधी सामान्यपणे ७□८ वर्षांचा इ. स. पू. सहाव्या शतकात या ठिकाणी बनारस, राजगृह, मिथीला, उज्जयिनी इ. नगरांतून व कुरू, कोसल इ. राज्यांतून विद्यार्थी येत. कोसलचा प्रसेनजीत राजा व जीवक राजपुत्र यांनी येथेच शिक्षण घेतले. पाणिनी व कौटिल्य यांनीही येथेच विद्यार्जन केले, असे मानले जाते. अध्यापकांच्या श्रेणीत धौम्य ऋषी, आयुर्वेदाचार्य जीवक उल्लेख येतात.

तक्षशिलेत फक्त उच्च शिक्षणाची व्यवस्था होती. सखोल अभ्यासावर भर दिला जाई. वैद्यक, धनुर्विद्या, वेदत्रयी, व्याकरण, तत्त्वज्ञान, वास्तुशास्त्र इ. प्रमुख विषय शिकविले जात. याशिवाय शल्यक्रिया, युद्धतंत्र, ज्योतिष, कृषिविज्ञान, फलज्योतिष, वाणिज्य, सांख्यिकी, विज्ञान, लेखाशास्त्र, संगीत, नृत्य, चित्रकला असे विषयही शिकविले जात. विद्यापीठात विद्यार्थ्यांना धर्मजातिकुलनिरपेक्ष प्रवेश असे. हजार□बाराशे वर्षांच्या कालखंडात ज्या राजवटींनी तक्षशिलेवर आधिराज्य केले, त्यांचा तेथील अभ्यासक्रमावर व भाषेवरही कमीअधिक परिणाम झाला. इराणी व ग्रीक संस्कृतींचे अनेक इतर विषय व संकल्पना शिक्षणक्रमात समाविष्ट झाल्या. ब्राम्ही लिपीऐवजी खरोष्ठी लिपीचा वापर अधिक होऊ लागला. हजार□बाराशे वर्षे अव्याहत शिक्षणकार्य करीत असलेले हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एकमेव प्राचीन विद्यापीठ होते.

## आरोग्य

# कोरफडीचे असंख्य फायदे

आयुर्वेदात कोरफड या वनस्पतीला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. या लेखाच्या माध्यमातून आपण त्याचे फायदे जाणून घेणार आहोत.



### छातीत जळजळ करण्यापासून आराम

गॅस्ट्रोएसोफेजियल रिफ्लक्स डिसीज (जीईआरडी) हा एक पचनविषयक विकार आहे ज्यामुळे अनेकदा छातीत जळजळ होते. जेवणाच्या वेळी १ ते ३ औंस कोरफड जेलचे सेवन केल्याने या विकाराची तीव्रता कमी होऊ शकते, असे आढळून आले आहे. तसेच कोरफड हे इतर पचन-संबंधित समस्या देखील कमी करू शकते. वनस्पतीची कमी 'टॉक्सिसिटी' छातीत जळजळ रोखण्यासाठी एक सुरक्षित आणि सौम्य उपाय ठरते.

### भाज्यांना सुरक्षित ठेवते

केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केलेल्या २०१४ च्या अभ्यासात कोरफड जेलमुळे भाज्यांवरील अनेक प्रकारच्या हानिकारक जिवाणूंची वाढ यशस्वी रीत्या रोखली जाते. तसेच हा प्रयोग सफरचंदावरही करण्यात आला. त्यावेळी देखील असेच परिणाम आढळून आले. याचा अर्थ असा की कोरफड जेल फळे आणि भाज्या ताजे राखण्यास मदत करू शकते आणि धोकादायक रसायनांची गरज दूर करू शकते.

### तोंड स्वच्छ करण्यास सुरक्षित पर्याय

२०१४ च्या संशोधनानुसार, संशोधकांना आढळले की कोरफडीचा अर्क रासायनिक-आधारित तोंड स्वच्छ करण्यासाठी (माऊथवॉश) सुरक्षित आणि प्रभावी पर्याय आहे. वनस्पतीचे नैसर्गिक घटक, ज्यामध्ये व्हिटॅमिन सीचा निरोगी डोस समाविष्ट आहे, प्लेक अवरोधित करू शकतात. तुम्हाला रक्तस्राव होत असेल किंवा हिरड्या सुजल्या असतील तर ते देखील आराम देऊ शकते.

### रक्तातील साखर कमी करते

दररोज दोन चमचे कोरफडीचा रस प्राशन केल्याने टाईप- २ मधुमेह असलेल्या लोकांमध्ये रक्तातील साखरेची पातळी कमी होऊ शकते. त्यामुळे मधुमेहावरील उपचारांमध्ये कोरफड अतिशय प्रभावी असल्याचे आढळून आले आहे. परंतु मधुमेह असलेले लोक, जे ग्लुकोज-कमी करणारी औषधे घेतात, त्यांनी कोरफडीचे सेवन करताना सावधगिरी बाळगली पाहिजे. मधुमेहावरील औषधांसह रस कदाचित तुमच्या ग्लुकोजची संख्या धोकादायक पातळीपर्यंत कमी करू शकतो.

### नैसर्गिक रेचक म्हणून फायदेशीर

कोरफड हे एक नैसर्गिक रेचक मानले जाते. फार कमी अभ्यासांनी पचनास मदत करण्यासाठी रसाळ पदार्थाच्या फायद्याचा शोध घेतला आहे व त्याचा परिणाम संमिश्र प्रमाणात दिसत आहेत. शास्त्रज्ञांच्या एका चमूने उंदरांवर अभ्यास केला असता त्यांना असे आढळले की कोरफड वनस्पतीपासून बनवलेले जेल बद्धकोष्ठता दूर करण्यास सक्षम ठरते. बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी कोरफड वनस्पती वापरली जाऊ शकते, असे काही वैद्यकीय व्यावसायिकांनी सुचविले आहे. मात्र, यासाठी ०.०४ ते ०.१७ ग्रॅम वाळलेल्या रसाचा डोस पुरेसा आहे. जर तुम्हाला कोलायटिस किंवा मूळव्याध असेल तर तुम्ही कोरफडीचे सेवन करू नये. यामुळे ओटीपोटात त्रास होऊ शकतो आणि अतिसार होऊ शकतो. इतर औषधे घेत असाल तर कोरफडचे सेवन करू नये. त्यामुळे तुमच्या शरीराची औषधे शोषण्याची क्षमता कमी होऊ शकते.

### त्वचा स्वच्छ ठेवण्यास उपयोगी

तुमची त्वचा स्वच्छ आणि हायड्रेट ठेवण्यासाठी तुम्ही कोरफडीचा वापर करू शकता. कारण ही वनस्पती कोरड्या, अस्थिर हवामानात वाढते. प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्यासाठी, झाडाची पाने पाणी साठवतात. हे पाणी-दाट पाने, कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स नावाच्या विशेष वनस्पती संयुगेसह एकत्रित केल्याने ते चेहऱ्याला प्रभावी मॉईश्चरायझर आणि वेदना कमी करणारे बनवतात.

### भरपूर पोषक घटक

कोरफड वनस्पतीमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त आहे, त्यामुळे निर्जलीकरण टाळण्यासाठी किंवा त्यावर उपचार करण्याचा हा एक आदर्श मार्ग आहे. हायड्रेटेड राहिल्याने तुमच्या शरीराला डिटॉक्स होण्यास मदत होते ज्यामुळे तुमच्या शरीरातील अशुद्ध द्रव्ये साफ करता येतात आणि बाहेर काढता येतात. कोरफड ज्यूसमध्ये भरपूर पोषक घटक असतात जे तुमच्या शरीरातील अवयवांची कार्यक्षमता वाढवतात.

### यकृतावर प्रभावी

जेव्हा 'डिटॉक्सिंग'चा प्रश्न येतो तेव्हा यकृताचे निरोगी कार्य महत्त्वाचे असते. कोरफडीचा रस हा तुमचे यकृत निरोगी ठेवण्याचा उत्तम मार्ग आहे. याचे कारण असे की जेव्हा शरीर पुरेसे पोषण आणि हायड्रेटेड असते तेव्हा यकृत उत्तम प्रकारे कार्य करते. कोरफडीचा रस यकृतासाठी आदर्श आहे. कारण ते हायड्रेटिंग आणि फायटोन्यूट्रिएंट्सने समृद्ध आहे.

## जीवनशैली

**महकसिंह**

# दररोज चक्रासन करण्याचे बहुमूल्य फायदे

**चक्रासन** हे योगाच्या प्राचीन आसनांपैकी एक प्रमुख आसन आहे. हे आसन करताना शरीराचा आकार चाकासारखा होतो, म्हणून त्याला चक्रासन म्हणतात. चक्रासन हे शरीराला केवळ लवचिक आणि मजबूतच बनवत नाही तर आपली प्रतिकारशक्ती वाढवण्यास आणि दृष्टी सुधारण्यास देखील मदत करते. चला जाणून घेऊया, चक्रासन करण्याचे फायदे-



चक्रासन हे प्राचीन आसनांपैकी एक प्रमुख आसन आहे. हे आसन करताना शरीराचा आकार चाकासारखा होतो, म्हणून त्याला चक्रासन म्हणतात

### रोग प्रतिकारशक्ती वाढते

चक्रासन रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते. असे केल्याने शरीरातील रक्ताभिसरण (ब्लड सर्क्युलेशन) सुधारते आणि शरीराच्या विविध भागांना ऑक्सिजनचा योग्य पुरवठा होतो. रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी चक्रासन कसे उपयुक्त आहे ते पाहूया.

### रक्त परिसंचरण सुधारणे

चक्रासन केल्याने शरीरातील रक्ताभिसरण वाढते, त्यामुळे शरीराच्या सर्व अवयवांना पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन आणि पोषक तत्त्व मिळतात.

श्वसनप्रणाली मजबूत करते

चक्रासनामुळे श्वास घेण्याची क्षमता वाढते. यामुळे श्वसनप्रणाली मजबूत होते, जी रोग प्रतिकारशक्ती मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

टॉक्सिन्स काढून टाकण्यास मदत होते

चक्रासन पचन आणि रक्त परिसंचरण सुधारून शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते, जेव्हा शरीरातील विषारी घटक कमी होतात तेव्हा रोगप्रतिकारक शक्ती सुधारते आणि शरीराला सहजपणे आजार जडत नाही.

### डोळ्यांसाठी देखील फायदेशीर

चक्रासन केवळ शरीरासाठीच नाही तर डोळ्यांच्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर मानले जाते. या आसनामुळे दृष्टी सुधारते आणि डोळ्यांशी संबंधित समस्या दूर होतात.

### डोळ्याच्या स्नायूंना आराम

चक्रासनामुळे डोळ्यांभोवतालचे स्नायू मजबूत होतात आणि ताणले जातात. यामुळे डोळ्यांचा थकवा दूर होतो आणि त्यांना आराम मिळतो.

### डोळ्यांना रक्त प्रवाह वाढवा

यामुळे डोक्याच्या रक्त प्रवाह वाढतो, अधिक ऑक्सिजन आणि पोषक द्रव्ये डोळ्यांपर्यंत पोहोचतात. यामुळे दृष्टी सुधारते आणि डोळ्यांच्या आजारांचा धोका कमी होतो.

### डोळ्यांचा थकवा कमी होतो

स्क्रीनवर जास्त वेळ काम केल्यास दोन्ही डोळ्यांवर ताण येतो. चक्रासनामुळे डोळ्यांचा थकवा कमी होतो आणि त्यांना ताजेपणा मिळतो.

# पराक्रमी व लोकहितदक्ष राणी रुद्रांबा

रुद्रांबा ही (कार्यकाळ : १२६२ ते १२९५) आंध्र प्रदेशातील काकतीय वंशातील एक पराक्रमी व लोकहितदक्ष राणी होती. गणपतिदेवांच्या (वडिलांच्या) मृत्यूनंतर ती १२६२ मध्ये वारंगळच्या गादीवर आली. इतिहासात ही रुद्रादेवी, रुद्रांबा, रुद्रमहादेवी, रुद्रमांबा, रुद्रदेव, रुद्राम्मा इत्यादी विविध नावांनी प्रसिद्ध आहे.

रुद्रांबा देवी विषयीची माहिती शिलालेख, तत्कालीन वाङ्मय आणि जागतिक पर्यटक मार्को पोलोचे प्रवासवृत्त यातून मिळते. गणपतिदेव (११९९-१२६२) यास पुत्र नसल्यामुळे त्याने आपले राज्य मुलीकडेच सोपविले. त्याच्या अखेरच्या दिवसांत तीच प्रत्यक्षात सर्व राज्यकारभार पाहात होती. तिचा विवाह चालुक्यवंशीय सरदार वीरभद्रेश्वर याच्याबरोबर झाला होता. तिने पतीच्या मृत्यूनंतर धरणीकोट येथे राज्य केल्याचे उल्लेख सापडतात; परंतु तिचे बरेचसे आयुष्य माहेरीच गेले व गणपतिदेवानंतर सर्व राज्याची तिच्याच हाती आली.



रुद्रांबा गादीवर आली त्या वेळी राज्यात अस्थिरता होती. कलिंग राजांनी वेंगी भागात धुमाकूळ घातला होता. दक्षिणेत कडप्पा-कर्नूल भागात जन्निगदेव, त्रिपुरांतकदेव, अन्नयदेव वगैरे सरदारांनी बंड पुकारले. मदुराईचा पांड्य राजा जटावर्मन याने नोलोरवर स्वारी केली. कांचीचे पल्लव गुंटूर जिल्ह्यात धामधूम करू लागले व शेजारचा यादव राजा महादेव याने तिच्या प्रदेशावर स्वारी करून तिचा पराभव केला. अशा या प्रतिकूल परिस्थितीतही रुद्रांबा डगमगली नाही. आपल्या सरदारांच्या मदतीने तिने परकीय व स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त केला. यादवांच्या बरोबर तह केला व अनेक वर्षे शांततेने राज्य केले.ती स्वत: अत्यंत कर्तव्यदक्ष व हुशार होती. पुरुषी वेश घालून, 'रुद्रदेव' या नावाने ती राज्यातून फिरे. तिचा कारभार चोख होता व प्रजा सुखी होती. त्या काळात काकतीयांचे राज्य समृद्ध आणि भरभराटीत होते, असे मार्को पोलो आपल्या प्रवासवर्णनात म्हणतो.

# खुलताबाद शहरला चोवीस तास पाणीपुरवठा करणार : डॉ.सुरेश सोनवणे



**खुलताबाद येथील गुलमंडी परिसरातील डॉ सोनवणे यांच्या संपर्क कार्यालयापासून ते भद्रा मारुती मंदिरापर्यंत यावेळी पायी काढून मतदारांच्या भेटीगाठी घेत डॉ सोनावणे यांनी नागरिकांच्या समस्या समजून घेतल्या यावेळी रॅलीला महिला पुरुष यासह तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित असल्याचे चित्र बघायला मिळाले.**

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी शहराच्या विकासाची अवस्था ही दयनीय असून पाण्याचा प्रश्न गंभीर आहे तरी देखील प्रशांत बंब हे मतदारांची दिशाभूल करत असून तालुक्यात विकास केल्याचा गाजावाजा करत असल्याचे मतदारांशी संवाद साधताना अपक्ष उमेदवारी डॉ सुरेश सोनवणे यांनी सांगितले.

गंगापूर खुलताबाद तालुक्यातील ग्रामीण भागाची दुर्दशा तर आहेच परंतु शहरात देखील विकास नावालाच केला असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे पंधरा वर्षे आमदार असून देखील विकास कामे करता आले नाहीत त्यामुळे आता निवडणुकीच्या तोंडावर मोठे मोठे आश्वासन दिले जात आहेत या निवडणुकीत प्रस्थापितांच्या विरुद्ध भूमिपुत्राची लढाई आहे आणि ती मी नक्की जिंकेल व मागील पंधरा वर्षात रखडलेली सर्व विकास कामे पुढील पाच वर्षात मार्गी लावण्याचा माझा प्रथम मानस आहे. आज जेव्हा मी गावोगावी फिरतो तेव्हा तरुण वयोवृद्ध महिला यांचा उस्फुर्त प्रतिसाद यावेळी मला मिळत आहे याचे फक्त एकच कारण आहे कारण की सामान्य जनता या प्रस्थापित राजकारण्यांना कंटाळली असून यावेळी बदल हा अटल आहे माझा मतदारांवर पूर्ण विश्वास असून यावेळी पाना या बटना समोरील चिन्ह दाबून मला विजयी करा व पुढील पाच वर्षासाठी तुमची सेवा करण्याची संधी द्या असे आवाहन अपक्ष उमेदवार डॉ सुरेश सोनवणे यांनी खुलताबाद येथील गुलमंडी परिसरात आयोजित केलेल्या संवाद दौऱ्या दरम्यान केले.

## यूपीव्हीसी एजबँड: फर्निचर उद्योगाला नवसंजीवनी

मुंबई- रेहाऊ रौकंटेक्स हा ब्रँड इंटेरिअर डिझायनर्स, आर्किटेक्ट आणि घरात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये फारच लोकप्रिय ठरला आहे. यातील अनोख्या वैशिष्ट्यांमुळे फर्निचर आणि घरांचे डिझाइन अधिक छान दिसते आणि कामे वेगाने होतात. जगभरात मागील ५० वर्षांपासून या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या रेहाऊच्या रौकंटेक्सने कायमच कंपनीच्या नाविन्यता, विश्वास आणि विश्वसनीयता या तत्वांना जपले आहे. इतर स्पर्धकांच्या तुलनेत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करत या उत्पादनाने विविध वैशिष्ट्ये देऊ केली आहेत. फर्निचरवर उमटणारे ओरखडे, विविध बाह्य कारणांचा परिणाम आणि झीज यापासून संरक्षण देण्याच्या अप्रतिम क्षमतेमुळे फर्निचरच्या कडांना अधिक टिकाऊपणा लाभतो. इतकेच नाही, यातील अँटीफंगल, अँटीबॅक्टेरिअल आणि बिनविषारी गुणधर्मांमुळे बाजारपेठेतील इतर पर्यायांच्या तुलनेत हे उत्पादन विशेष ठरते.

## प्रकाशात रंग बदलणाऱ्या फ्रेम्ससोबत अपेक्षेपलिकडचा अनुभव घ्या

मुंबई - रे-बॅनने १९३७ पासून अद्भूत पद्धतीने नवनव्या रचनांमधून कालातीत डिझाइन्स आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ साधत आयवेअरची निर्मिती केली आहे. आजही रे-बॅनएँ चेंजच्या सादरीकरणातून ही नाविन्यतेची परंपरा राखली गेली. ट्रान्झिशन ने सज्ज ही प्रकाशानुसार बदलणारी फ्रेम आहे. रे-बॅन चेंजमध्ये प्रकाशाच्या स्थितीनुसार स्टाइलमध्ये ठळक बदल करण्याची क्षमता आहे. यूव्ही प्रकाशाच्या सानिध्यात आल्याने या फ्रेम्स आपला कलर टोन बदलतात. त्यामुळे तुम्ही बंद खोलीतून बाहेर पडल्यानंतर रंग बदलून तुम्हाला खास लुक मिळतो. तुमच्यसोबतच पुढे पुढे जाताना रे-बॅनएँ चेंजने ओरिजनल वेफेरर आणि तशीच समकालीन स्टाइल असलेल्या वेफेररएँ ओव्हल या स्टाइल्समध्ये क्रांतीकारी बदल केले आहेत. यात विविध अनोख्या पॅटर्न्सच्या रंगात सन आणि ऑप्टिकल स्टाइल्स उपलब्ध आहेत.

## एसबीआय लाइफने वॉस्का फाउंडेशनसह साजरा केला बालदिन

मुंबई : अर्थपूर्ण पद्धतीने बालदिन साजरा करताना भारतातील एक विश्वसनीय जीवन विमा कंपनी असलेल्या एसबीआय लाइफ इन्शुरन्सने 'लिप्पी की दुनिया' हा एक प्रेरणादायी डिजिटल व्हिडिओ सादर केला आहे. त्यात तरुणाईची स्वप्ने आणि शिक्षणाची परिवर्तनकारी शक्ती यांचे महत्त्व दाखवले आहे. ओडिशातील केओंजहर येथील वुमन्स ऑर्गनायझेशन फॉर सोशल-कल्चरल अवेअरनेस (वॉस्का) या स्वयंसेवी संस्थेसोबतच्या सहकार्याने, कंपनी तरुणांना सक्षम करण्यासाठी त्यांचे शिक्षण आणि क्षमता वाढवण्यासाठी वचनबद्ध आहे.

# जनतेचा मिळत असलेला प्रतिसाद पाहता विजयावर शिक्कामोर्तब : अब्दुल सत्तार

कधी नव्हे इतके प्रेम मला जनतेने दिले

सिल्लोड प्रतिनिधी-मला कधी नव्हे इतका प्रेम मतदारसंघामध्ये मिळत आहे. असा कोणताही गाव नाही जिथे मतदार नव्वद टक्के माझ्या पाठीशी उभे राहिले आहे.जनतेचा मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद व पाठबळ यामुळे आजच माझ्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्याचा विश्वास अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला.

अंभई येथे अब्दुल सत्तार यांच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित सर्वांशी अब्दुल सत्तार यांनी संवाद साधला.

पुढे बोलतांना अब्दुल सत्तार म्हणाले सिल्लोड सोयगाव विधानसभा मतदार संघाचा लोकप्रतिनिधी म्हणून काम करत असताना मागील पंधरा वर्षांमध्ये मतदार संघामध्ये रस्ते, वीज, पाणी या मूलभूत गरजा सोबतच पायाभूत सोयी सुविधा आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना लाभार्थ्यांपर्यंत प्रामाणिकपणे पोचविण्याचे काम मी केले आहे.

गेल्या पंधरा वर्षात संजय गांधी, श्रावणबाळ योजने अंतर्गत मतदार संघात हजारो लाभार्थ्यांना लाभ मिळवुन दिला, कामगार कल्याण मंडळा अंतर्गत ६० हजारापेक्षा अधिक कामगाराच्या नोंदी करून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून दिला, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत मतदारसंघातील लाखो माता भगिनींना प्रत्यक्ष लाभ मिळवून दिला त्यासोबतच प्रधानमंत्री उज्वला गॅस योजना,पंतप्रधान आवास योजनांची प्रभावी अमंलबजाणी मतदारसंघामध्ये केली आहे.

आगामी काळात आपल्याला सिल्लोड सोयगाव तालुक्याचा अधिक प्रमाणात व वेगवान गतीने विकास करावयाचा असून त्यासाठी मला तुम्हा सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता आहे. निवडणुका आल्या की मतदान मागायला फिरणाऱ्यांना पाच वर्ष जनता मतदारांची आठवण कधीच येत नाही असे बोलत मी सातत्याने जनतेला सेवा देण्यासाठी तत्परतेने वागत कर्तव्य जबाबदारी पार पाडतो. या सेवा आपल्याला पुन्हा तत्परतेने देण्यासाठी माझ्या धनुष्यबानी या निशाणी समोरील बटन दाबून आपण मला चौथ्यांदा विधानसभेत पाठवा असे आवाहन शिवसेना उमेदवार अब्दुल सत्तार यांनी अंभई येथील प्रचार सभेत बोलताना केले.

शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाताई पवार, जिपचे माजी सभापती प्रा.गोविंदराव भोजने, शिवसेना वैद्यकीय आघाडीचे डॉ.मच्छिंद्र पाखरे, माजी सरपंच दत्तानाना भवर, माजी नगराध्यक्ष पांडुरंग दुधे, अंकुश पा.गाढवे, संचालक दामोधर गव्हाणे यांनी आपल्या भाषणातून अब्दुल सत्तार यांना विजयी करण्याच्या आवाहन केले.

या प्रचार सभेला डॉ.फिरोज खान, माजी सरपंच पंकज जैस्वाल, संचालक सयाजी वाघ, कैलास वाघ आदी प्रमुखांसह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्त्यांसह नानेगाव येथील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# आम आदमी पार्टी म.वि.आ.उमेदवार विलास बापू औताडे यांच्या पाठीशी: ज्ञानेश्वर बोरसे



सिल्लोड/फुलंब्री प्रतिनिधी : संपूर्ण महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वातावरण गरम झालेले आहे. तिकीट न मिळाल्यामुळे अनेक पक्षातील नेते कार्यकर्ते नाराज होऊन अपक्ष उमेदवारी पत्कारून आपापले नशीब आजमावत आमदार होण्याचे स्वप्न पाहण्याच्या तयारीत होते

परंतु पक्षातील वरिष्ठांच्या विनवण्या व त्याचप्रमाणे पक्षांतर्गत कार्यवाही टाळण्यासाठी अनेकांनी आपले अर्ज वापस घेऊन पक्षाने तिकीट दिलेल्या उमेदवाराचा पाठीशी राहण्याचा ठाम निर्धार केला असल्याचे दिसून आले.

अशाच पद्धतीने निवडणूक लढण्यासाठी आम आदमी पार्टीच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनीही अर्ज दाखल केले होते परंतु आम आदमी पार्टी महाराष्ट्रात निवडणूक लढणार नसल्याचे व तसेच आम आदमी पार्टीचा महाविकास आघाडीला पार्टीचा पाठिंबा राहणार असल्याचे मा.धनंजय शिंदे यांनी एका व्हिडिओद्वारे पार्टी कार्यकर्ते व पदाधिकारी यांना आव्हान केले असता दाखल केलेले उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आलेले दिसून आले. आम आदमी पार्टीने महाराष्ट्र विधानसभा २०२४ साठी कुठलीही जागा अथवा जागा वाटपाच्या वाटाघाटीत हिस्सा न घेता इंडिया अलायन्स (महाविकास आघाडीला)बिनशर्त पाठिंबा देणार असे निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याच्या तोंडावरच जाहीर केले होते,याबाबत आम आदमी पार्टी फुलंब्री तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बोरसे यांच्याशी आमच्या प्रतिनिधीने संपर्क साधून आम आदमी पार्टी महाविकास आघाडीच्या पाठीशी का आणि कशासाठी उभी आहेत याबाबत विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की आम आदमी पार्टीला कुठल्याही सत्तेची अथवा प्रतिष्ठेची हवस नसल्याने पार्टीने निवडणूक लढलीच पाहिजे असा विचार पार्टीतील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी कधीही अंगीकारला नाही,परंतु देशात जो सत्तेचा दुरुपयोग सुरू आहे त्यामुळे देशातील धन,शक्ती आणि भविष्य ज्या पद्धतीने असविधानिक मार्गाने हिरावून घेण्याचा प्रयत्न होत आहे व त्याचप्रमाणे कुठल्याही जाती धर्माचा अनादर होणार नाही भारत देश हा विविध जाती,धर्म व पंतांनी निर्माण झालेला असल्याने प्रत्येक जातीतील व्यक्तीला आदर मिळायला हवा हे संविधानाचे मुख्य उद्दिष्ट असताना प्रस्थापिपिताकडून त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहेत,आशा असविधानिक शक्तिला थांबविण्यासाठी आम आदमी पार्टीचा वतीने महाविकास आघाडीला पाठिंबा देऊन आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी आम्ही सक्रिय झालेलो आहे.आम आदमी पार्टीचा सत्ता मिळवणे हा उद्देश नसून सत्ता मिळवून देणे हा विचार महाराष्ट्रात आम आदमी पार्टीने अंगीकारला आहे लोक कल्याणकारी योजना राबवून लोकांचा उद्धार कसा होईल यासाठी पार्टी व पार्टीतील कार्यकर्ते यांनी महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या बाजूने मूठ बांधलेली आहे.निवडणुकीच्या तोंडावर अथवा हंगामी योजना आणून रेवडी संस्कृतीचा गाडा हाकलण्याचे काम आम आदमी पार्टी कधीच करत नाही.

मोफत पाणी,मोफत वीज,मोफत आरोग्यसेवा,मोफत शिक्षण आणि मोफत महिलांना प्रवास अशा लोककल्याणकारी योजना राबविण्यावर पार्टीचा जोर असून महाविकास आघाडी सत्तेत आल्यास त्यांच्याकडून तशा योजना आम्ही राबवून घेण्याचा प्रयत्न करणार असल्याने फुलंब्री विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार मा. विलास बापू औताडे यांच्या पाठीशी आम आदमी पार्टी पूर्ण ताकतीने उभी असल्याचे आप फुलंब्री तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बोरसे यांनी सांगितले. अशा पद्धतीने महाराष्ट्रात सुरू असलेल्या निवडणुकीत आम आदमी पार्टीने आपली भूमिका स्पष्ट केलेली असून आम आदमी पार्टीच्या या भूमिकेचा महाविकास आघाडीला किती फायदा होणार हे आता २३ नोव्हेंबरला समजेल.

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे. व्ही. एन. काटकर मॅडम) क. स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क.३३२/२०२४

अर्जदार : १. श्रीमती. निर्मलाबाई भ्र. त्रंबक काथार वय-६० धंदा घरकाम रा.-वाकद ता. कन्नड जि. औरंगाबाद २. श्री.अर्चना भ्र.आंबादास काथार वय-३८ धंदा घरकाम रा. नेवपुर ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. श्री.अमोल पि.त्रिंबक काथार वय-३५ धंदा- मजुरी रा.-वाकद ता. कन्नड जि. औरंगाबाद ४. श्री. सचिन पि.त्रिंबक काथार वय-३० धंदा- मजुरी रा. वाकद ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील मयत नामे त्रंबक पि.विश्वनाथ काथार यांचा मृत्यु दि. १२/०८/२०२४ रोजी मौजे वाकद ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत त्रंबक पि.विश्वनाथ काथार यांचे मरणोपरांत लाभ मिळणेसाठी व इतर शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे वारस कारवाई करण्यासाठी हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ४ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयत त्रंबक पि.विश्वनाथ काथार यांचे मरणोपरांत लाभ मिळणेसाठी व इतर शासकीय, निमशासकीय कार्यालय यांचेकडे मयत त्रंबक पि. विश्वनाथ काथार यांचे वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ०७/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क.लिपीक | सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायाला कन्नड)

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-५६२ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक१८/०९/२०२४**

अर्जदार ०:- शेख अफजल शेख अनवर रा. गोरीपुरा बंगला कन्नड ता. कन्नड जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतःच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ३०-०९-१९८५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ३०-०९-१९८५ रोजी कन्नड ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतःचा जन्म दिनांक ३०-०९-१९८५ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १३-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ३०-०९-१९८५ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक १८/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/ मिआर-६६४ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २७/०९/२०२४**

अर्जदार : शरीफ जमील मुल्ला रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगीच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक २२-१०-२००६ रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक २२-१०-२००६ रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक २२-१०-२००६ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २७-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २२-१०-२००६ रोजी पिशोर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २७/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**

**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 95- Jintur | Meghna Deepak Sakore Bordikar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1980/2019 Before | U/s. 188 of IPC | Nil | Nil | Nil |
| 2. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1283/2022 | U/s. 188, 269, 270 ofIPC | Nil | Nil | Nil |
| 3. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 730/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC and other | Nil | Nil | Nil |
| 4. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 339/2021 | U/s. 188, 269, 270 ofIPC. | Nil | Nil | Nil |
| 5. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 713/2021 | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 6. | | | Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani. S.C.C. No. 1220/2020 | U/s. 188, 269, 270 ofIPC | Nil | Nil | Nil |
| 7. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 309/2022 | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 8. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 656/2019 | U/s. 336, 287 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 9. | | | Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani S.C.C. No. 106/2022 | U/s. 341, 269 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 10. | | | Hon'ble J.M.F.C Patoda Dist. Beed-1 S.C.C. No. 185/2022 | U/s. 188, 269 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 11. | | | Cri. No. 77/2021 Pending | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |
| 12. | | | Cri. No. 335/2021 Pending | U/s. 188, 269, 270 of IPC. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : 95- Jintur**

Signature of office bearer of the Political Party

Name and designation...

**Chandrashekhar Bawankule, President**

**Bharatiya Janata Party, Maharashtra**

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**
अज्ञात वाहनाने धडक दिल्याने पादचाऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना ३ नोव्हेंबर रोजी उमरगा चौरस्ता ते लातूर जाणाऱ्या रोडवर घडली. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील जेवरी येथील रहिवाशी सुधाकर माणिक सुरवसे (वय ४३) हे ३ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते २.३० वाजण्याच्या सुमारास बिरूदेव मंदिराजवळ उमरगा चौरस्ता ते लातूर जाणाऱ्या रोडवरून पायी जात होते. दरम्यान, अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवून सुधाकर सुरवसे यांना धडक दिली. या अपघातात सुधाकर सुरवसे मयत झाले. याप्रकरणी नवनाथ सिताराम सुरवसे (वय ३०, रा. जेवरी ता. निलंगा जि. लातूर) यांनी १३ नोव्हेंबर रोजी उमरगा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून भान्यासं कलम १०६ (१), २८१, १२५ (ए), १२५ (ब) सह कलम १३४ (अ) (ब), १८४ मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### इटकळ येथे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे पथसंचलन

**इटकळ, दि.१५ नोव्हेंबर -**
महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणूकीचे वारे जोरदारपणे वाहत आहे पोलीस प्रशासनही निवडणुकी दरम्यान कुठलाच अनुचित प्रकार घडू नये यासाठी २४ तास जागरूक आहेत. नळदुर्ग पोलीस स्टेशन अंतर्गत औट पोस्ट इटकळ पोलिसांच्या वतीने शुक्रवार दि.१५ ऑक्टोबर रोजी संपूर्ण गावातून पोलीस प्रशासन व बी.एस.एफ. फोर्सच्या कमांडो यांनी संयुक्त रूट मार्च (पथसंचलन ) केले. तुळजापुर विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इटकळ येथे मतदान शांततेत व्हावे यासाठी पोलिस प्रशासनाने पथ संचलन केले. या रूट मार्च पथसंचलनात बी.एस.एफ.ची कमांडो टीम, इटकळ औट पोस्टचे बिट अंमलदार पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीपान कोळी, गाव कामगार पोलीस पाटील विनोद सलगरे हे उपस्थित होते.

### 'फुलेप्रेमी समाजरत्न' पुरस्कारासाठी माया मुळे यांची निवड

**कळंब, दि.१५ नोव्हेंबर -**
आंतरराष्ट्रीय अभियानच्या काव्य जागर यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय फुले प्रेमी समाजरत्न पुरस्कारासाठी लेखिका



माया मुळे यांची निवड करण्यात आली. २ ते ५ जानेवारी महिन्यात एस.एम. जोशी सभागृह पुणे येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फ ेस्टिव्हलमध्ये पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल. कवी विजय वडवेराव आयोजित आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियानात तसेच ज्योतिबा आणि माय सावित्री यांच्या विचारांचा वसा घेऊन या चळवळीत कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. माया मुळे या विद्याभवन हायस्कूल कळंबच्या विद्यार्थिनी आहेत. फर्ग्युसन महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून त्यांनी शिक्षण घेतले आहे. त्यांच्या काहूर या कविता संग्रहाला विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



### क्रांतिवीर लहुजी साळवे यांची जयंती उत्साहात साजरी

**तेर, दि.१५ नोव्हेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे क्रांतिवीर लहुजी साळवे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संभाजी कांबळे, कानिफनाथ देवकुळे, बिभीषण लोमटे, परशुराम कांबळे, जोशीला लोमटे, राहुल गायकवाड यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दत्ता कांबळे यांनी केले. यावेळी लतिका पेठे, बळीराम शिंदे, विलास रसाळ, युवराज रसाळ, प्रज्योत रसाळ, संतोष वाघमारे, अमोल कसबे, सुनिल गायकवाड, दत्ता कांबळे, पांडुरंग शिंदे, विनोद कांबळे, अमोल रसाळ, खंडू रसाळ आदी उपस्थित होते.

### एसटी चालकाला मारहाण

**तुळजापूर, दि.१५ नोव्हेंबर -**
सांगवी मार्डी ब्रीजवर एसटी चालकाला मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना घडली आहे. ऋषिकेश शाहू वाडकर (रा. सिद्धेश्वर वडगाव, जि. धाराशिव) यांनी एसटी चालक बालाजी हरिश्चंद्र बनकर (वय ४५, रा. आशिव) यांना मारहाण करून बस जाळण्याची धमकी दिली. बनकर हे १४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता बस चालवत असताना वाडकर यांनी त्यांच्या मोटरसायकलने अचानक बससमोर कट मारला. यावरून झालेल्या वादात वाडकर यांनी बनकर यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महायुतीचे सरकार देना बँक आहे; लेना बँक नाही : डॉ. श्रीकांत शिंदे

**लोहारा-उमरगा तालुक्यावर विशेष लक्ष... विरोधकांना लाडकी बहीण योजनेचे महत्व काय समजणार; फक्त 'माझं कुटुंब आणि माझी जबाबदारी' एवढचं त्यांना माहित...**



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ नोव्हेंबर -**
ज्ञानराज चौगुले हे मुख्यमंत्री यांचे ओपनिंग बॅट्समन आहेत. चौकार मारण्यासाठी ज्ञानराज चौगुले यांच्या मागे उभे राहा. चौगुले निवडून आल्यानंतर हा मतदारसंघावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष लक्ष असणार आहे. त्यामुळे मतदारसंघाच्या विकासाची चिंता करू नको. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महायुती सरकार देना बँक आहे. लेना बँक नाही. आपण चौथ्यांदा ज्ञानराज चौगुले यांना निवडून द्या. त्यांचे मुख्यमंत्र्यासारखं संघर्षपूर्ण जीवन राहिला आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे युवा नेते खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. महायुतीचे उमेदवार ज्ञानराज चौगुले यांच्या प्रचारार्थ लोहारा येथे लोहारा हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित सभेत बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर यावेळी व्यासपीठावर खा. रविंद्र गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, माजी सभापती जितेंद्र शिंदे, जि.प. माजी सभापती अभय चालुक्य, भाजपा नेते राहुल पाटील, मराठवाडा युवा सेना निरीक्षक किरण गायकवाड, आरपीआय मराठवाडा सचिव हरीष डावरे, शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन पनूरे, शिवसेना तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष शिवशंकर हत्तरगे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष सुनिल साळुंके, आरपीआय तालुकाध्यक्ष दिगंबर कांबळे,मुस्लिम समाज धर्मगुरू अबुलसाहेब कादरी, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष माधव पवार, शिक्षण संस्थाचालक लोहारा सुरेश वाघ, जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस लोहारा हाजी बाबा शेख, नगराध्यक्ष वैशाली अभिमन खराडे, उपनगराध्यक्ष आयुब शेख यांचे प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. श्रीकांत शिंदे पुढे म्हणाले की, लोहारा तालुका छोटा जरी असला तरी आवाज मोठा आहे. मराठवाड्याच्या हक्काचे २१ टीएमसी पाणी साठी ५७२ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपलब्ध करून दिला आहे. मतदार संघात नऊ आरोग्य उपकेंद्रांना मंजुरी, लोहारा शहरात महात्मा बसेश्वर मंदिराला एक कोटीचा निधी आ. ज्ञानराज चौगुले यांच्या प्रयत्नातून उपलब्ध करून दिला आहे.

मुख्यमंत्र्यांनी लाडकी बहीण योजना आणली मात्र योजनेची टिंगल करणाऱ्यांना फक्त 'माझं कुटुंब आणि माझी जबाबदारी' एवढच माहीत आहे. त्यांना या १५०० रूपयाचे महत्व काय समजेल? असा सवाल त्यांनी केला.

यावेळी मराठवाडा निरीक्षक युती सेना अॅड. आकांक्षा चौगुले, महिला तालुकाप्रमुख उमरगा संध्या शिंदे, उषा गायकवाड, ज्योती चौगुले, सारिका बंगले, श्रीदेवी स्वामी, गटनेत्या सारिका बंगले, नगरसेविका कमल भरारे, आरती कोरे, आरती गिरी, संगीता पाटील, सुमन रोडगे, शमाबी शेख, शामल माळी, आरिफ खानापुर, विजयकुमार ढगे, जालिंदर कोकणे, अविनाश माळी, दिपक मुळे आदींसह महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडणूक प्रक्रियेत हलगर्जीपणा; नोडल अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**
तुळजापूर विधानसभा निवडणुकीच्या कामात लेखाधिकारी कुरणे यांनी आरओची परवानगी न घेता कार्यालय सोडले. त्यामुळे निवडणूक आयोगाला रिपोर्ट पाठवण्यात तब्बल रात्री १ वाजेपर्यंत उशीर झाला. निवडणूक प्रक्रियेत ही गंभीर त्रुटी मानली जाते. याशिवाय, निवडणूक खर्चासंदर्भात उमेदवारांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी टाळाटाळ केली आणि योग्य माहिती देण्यास असमर्थ ठरले.

अधिक गंभीर म्हणजे, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांशी उद्धट वर्तन केल्याचा आरोपही त्यांच्यावर ठेवण्यात आला. कुरणे यांच्यावर १९५१ च्या कलम १३४ आणि भारतीय न्याय संहिताच्या कलम २२३ नुसार तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

शिस्तभंगाच्या या प्रकारानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कुरणे यांना तत्काळ निलंबित केले आहे. त्यांच्या जागी वाळूजकर यांची खर्च नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या घटनेनंतर निवडणूक प्रक्रियेत आधीच नोटीस मिळालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

निवडणूक कामकाजात शिस्त आणि पारदर्शकता राखण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी यापूर्वीही इशारे दिले होते.

मात्र, या प्रकारामुळे संबंधितांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## कारच्या धडकेत लुना चालकाचा मृत्यू; कार चालक फरार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**
भरधाव कारच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवून लुना चालकास धडक दिली. या अपघातात लुना चालक गंभीर जखमी होऊन मयत झाला. हा अपघात भूम तालुक्यातील बुरूडवाडी पाटीजवळ घडला.

यावाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, भूम तालुक्यातील मात्रेवाडी येथील विक्रम भानुदास माने (वय ४७) हे १२ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास उळूप फाटा येथून आपली लुना दुचाकीवरून (एमएच २५ एक्यू २०४१) जात होते. दरम्यान भूम ते पाथरूड जाणाऱ्या रोडवरील बुरूडवाडी पाटीजवळ माने यांची दुचाकी आली. यावेळी भरधाव वेगातील स्विफ्ट कारच्या (एमएच ०१ बीबी ७५६३) विनोद मिश्रीलाल कतारी (वय ४४ रा. संजय



गांधीनगर, कतार वस्ती ता. संगमनेर जि. अहिल्यानगर) चालकाने त्यांच्या ताब्यातील कार निष्काळजीपणे चालवून विक्रम माने यांच्या लुना मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात विक्रम माने गंभीर जखमी होवून मयत झाले. अपघातानंतर विनोद कतारी हा कार चालक अपघाताची माहिती पोलिसांना न देता किंवा जखमीस उपचारासाठी दाखल न करता अपघात स्थळावरून पसार झाला.

याप्रकरणी आण्णासाहेब विक्रम माने (वय २६, रा. मात्रेवाडी ता. भूम) यांनी १३ नोव्हेंबर रोजी भूम पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून विनोद मिश्रीलाल कतारी याच्या विरूद्ध भान्यासं कलम १०६ (१), २८१ सह १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीचे स्थीर सरकार हवे : खा.डॉ. भागवत कराड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**
देशातील काही राज्यात काँग्रेसप्रणित सरकार होते. केवळ योजनांच्या घोषणा केल्या आणि प्रत्यक्षात जनता आणि राज्याच्या विकासासाठी काहीही न केल्याने जिथे जिथे काँग्रेसची सत्ता होती, तिथे भाजपाचे सरकार आले. २०१४ पासून भाजपाशासित स्थिर सरकारमुळे मोठ्या गतीने विकास झाला. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासासाठी देखील महायुतीचेच स्थिर सरकार हवे, त्याशिवाय विकासाला चालना मिळणार नाही, असे मत माजी केंद्रीय अर्थराज्य मंत्री खासदार डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केले.

माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड यांनी शुक्रवारी प्रतिष्ठान भवन येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य अॅड. मिलिंद पाटील, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, अॅड. खंडेराव चौरे यांची उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलताना माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार डॉ. कराड म्हणाले की, २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात स्थिर सरकार होते. त्यावेळी कृषी, सिंचन, वीज, उद्योग, गुंतवणूक, रोजगार आदी क्षेत्रांच्या विकासासाठी भरघोस निधी देवून गतिमान महाराष्ट्रासाठी कामे करण्यात आली.

जलयुक्त शिवारमुळे शेतशिवारात पाणी आले. नंतरच्या काळात जनतेने भाजप आणि शिवसेनेला कौल दिला होता. परंतु खर्चीसाठी उध्दव ठाकरे यांनी आपल्या हिंदूत्वाची व्याख्या बदलून काँग्रेस, राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली आणि महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले. अडीच वर्षाच्या काळात केवळ जनहिताच्या आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या योजनांना त्यांनी स्थगिती दिली. त्यानंतर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे महायुती सरकार आले.

अडीच वर्षापेक्षा कमी काळात त्यांनी पुन्हा प्रगतशील महाराष्ट्र घडविण्यासाठी कामे केली. शेतकर्यांना एक रूपयात पीकविमा, जलयुक्त शिवार ३.०, लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्य योजना, उद्योजक निर्माण करण्यासाठी केंद्राच्या नवनवीन योजनांची अंमलबजावणी करून महाराष्ट्राचा विकास करून दाखविला.

अजून अनेक विकासकामे आणि प्रकल्प मार्गी लागणे बाकी आहे, त्यासाठी राज्यात स्थिर सरकार असणे आवश्यक आहे.

जनतेने या बाबीचा विचार करून महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत येण्यासाठी आपले आशीर्वाद महायुतीला द्यावे, असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड यांनी केले.

## सान्वी मल्टी सर्व्हिसेसचा शहराच्या स्वच्छतेचा ठेका रद्द

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ नोव्हेंबर -**
स्पर्धक ठेकेदाराने केलेल्या तक्रारीनंतर नळदुर्ग शहर स्वच्छतेचा ठेका अखेर रद्द करण्यात आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ठेका मिळविल्याची तक्रार करण्यात आली होती.

नळदुर्ग शहर स्वच्छतेचा ठेका लातुर येथील सान्वी मल्टी सर्व्हिसेस यांना दि.६ जुलै पासुन देण्यात आला होता. याबाबतची निविदा प्रक्रिया ऑनलाईन झाली आहे. ठेकेदाराकडुन नगरपालिकेकडील सात घंटा गाड्या व एका ट्रॅक्टरच्या माध्यमातुन शहरातील घनकचरा व्यवस्थापनांतर्गत रस्ते, गटारी व नाले साफसफाई करुन कोरडा व ओला कचरा उचलुन डम्पिंग ग्राउंडवर टाकणे अपेक्षित आहे.

त्यामुळे नगरपालिकेने दि.८ नोव्हेंबर पासुन सान्वी मल्टी सर्व्हिसेसला दिलेला शहर स्वच्छतेचा ठेका रद्द केला आहे.

## शिंदे, फडणवीस सरकारची भ्रष्ट सरकार म्हणून नोंद : खा. ओम राजेनिंबाळकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**
महाराष्ट्र राज्यात झालेल्या आजवरच्या सरकारमधील सर्वाधिक भ्रष्ट सरकार म्हणून या शिंदे व फडणवीस सरकारची नोंद झाली आहे, अशी टीका खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केली आहे. ते कसबे तडवळा येथे आयोजित सभेत बोलत होते. यावेळी उमेदवार कैलास पाटील उपस्थित होते.

खासदार राजेनिंबाळकर म्हणाले की, या सरकारने भ्रष्टाचार कुठे आणि किती करावा याची परिसिमाच पार केली. छत्रपतीच्या नावावर मोदींनी मते मागितली आणि त्याच युगपुरुषाच्या पुतळ्यामध्ये यांनी भ्रष्टाचार केला, एवढं दुर्लक्ष केलं की हा पुतळा कोसळला. हा फक्त पुतळा कोसळला नाही तर या राज्यातील जनतेच्या विश्वास गळून पडला.

याचं जराही दुःख खेद या सरकारला वाटल नाही. पण या जनतेला वाटलेलं दुःख ते मतपेटीतून व्यक्त करतील असा विश्वास खासदार ओमराजे यांनी बोलून दाखविला. पुढे ते म्हणाले, मोदी हे फक्त गुजरातचे पंतप्रधान असल्यासारखं वागत आहेत, आपल्या राज्यावर ते विशेष प्रेम करतात कारण या राज्यात आलेले मोठे प्रकल्प त्यांनी गुजरातला वळवले. त्यावर मुख्यमंत्री म्हणाले यापेक्षा मोठा प्रकल्प राज्यात येणार आहे. पण हाती काय मिळालं तर भला मोठा काशी भोपळा असा टोमणा खासदार ओमराजे यांनी सरकारला मारला. यावेळी आमदार कैलास पाटील यांनीही केंद्र व राज्य सरकारने महाराष्ट्रावर कसा अन्याय केला याचा पाढा वाचला.

या गावामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे येऊन गेले होते ती जागा हे भव्य स्मारक म्हणून घोषित झाले. पण त्यासंदर्भात असलेली फाईल एक वर्षापासून मुख्यमंत्री यांच्याकडे पडून आहे. दिवसाला वीस हजार सह्या करणाऱ्या मुख्यमंत्री येथे सही करताना कशाची वाट पाहत होते. ही फाईल अदानी अंबानीची नव्हती म्हणून सही केली नसेल असाही टोला आमदार पाटील यांनी लगावला.

## अवैधरित्या घरात साठा करून ठेवलेला ३ लाखांचा गुटखा जप्त



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ नोव्हेंबर -**
महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटखा विक्री करणाऱ्या अवैधरित्या साठवणूक केलेल्या घरावर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी घरातून ३ लाख ६५ हजार रूपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी एकाविरूद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धाराशिव जिल्ह्यातील अवैध धंदे करणाऱ्या इसमावर कार-वाई करण्यासाठी पोलिसांचे पथक पेट्रोलिंग करत असताना नळदुर्ग येथील जिल्हा रूग्णालय परिसरात आले होते.

यावेळी पथकास गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, नळदुर्ग येथील महंमदपनाह गल्लीत एक इसम त्याच्या राहत्या घरात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटखा विक्री करण्यासाठी साठवणूक केली आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने नमुद ठिकाणी १ वाजता छापा टाकला. यावेळी सदर

ठिकाणी एक इसम मिळून आला. पथकाने त्यास नाव, गाव विचारले असता त्याने मोसीन फयुमोद्दीन जमादार (वय ३८, रा. महंमदनाह गल्ली, नळदुर्ग ता. तुळजापूर) असे सांगितले.

यानंतर पथकाने घराची तपासणी केली असता त्या ठिकाणी विमल पान मसाला ३४२ पुढे, रत्ना तंबाखु ५७ पुढे, वि-१ चे ३४४ पुढे, हिरवा गोवा ७४ पुढे, पान बहारचे ८७ पुढे, एस पी ९९९ तंबाखू ४० पुढे, रत्नाछाप तंबाखू पत्रा डब्बा १० नग, रजीगंधा पान मसालाचे २१ डब्बे, आएमडी पान मसालाचे २ बॉक्स, एम तंबाखू गोल्ड २ बॉक्स, टोब्याको बाबा ब्लॅक तंबाखू पॉकीट १७३ असा एकूण ३ लाख ६५ हजार ३६० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर मुद्देमाल पोलिसांनी जप्त करून मोसीन फयुमोद्दीन जमादार यास ताब्यात घेवून नळदुर्ग ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ऑल इंडिया उलमा बोर्डाचा सात उमेदवारांना पाठिंबा

### राष्ट्रीय महासचिव अंजर अन्वर खान यांची पत्रकार परिषदेत माहिती

छत्रपती संभाजीनगर: महाराष्ट्र मध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया उलमा बोर्ड तर्फे महाराष्ट्रातील सात जणांना पाठिंबा देण्यात आला आहे, अशी माहिती ऑल इंडिया उलमा बोर्डचे राष्ट्रीय महासचिव अंजर अन्वर खान यांनी पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत शुक्रवारी (ता. १५) दिली. ते म्हणाले की, ऑल इंडिया उलमा बोर्ड (रजिस्टर) तर्फे मोहम्मद युसूफ पंजानी (कारंजा, वाशिम), सय्यद इम्तियाज जलील (औरंगाबाद - पूर्व), चंद्रशेखर घुले पाटील (शेवगाव, अहमदनगर), बाबाजानी दुर्राणी (पाथरी, परभणी), जावेद कुरेशी (औरंगाबाद-मध्य) आणि वारिस पठाण (भिवंडी) यांना पाठिंबा देण्यात आला आहे. ही पहिली यादी असून यापुढेही दुसरी यादी जाहीर करण्यात येईल. ही नावे उलमा बोर्ड संस्थेच्या माध्यमातून जाहीर करण्यात येत असून प्रत्येक संस्थेला आपल्या आवडीचा उमेदवाराला पाठिंबा देण्याचा अधिकार आहे. त्याप्रमाणे आम्ही या सात उमेदवारांना विधानसभेत जाहीर पाठिंबा देत आहोत, असेही ते म्हणाले.



## फूटपाथ वर थाटली दुकाने; अपघाताची शक्यता







वाळूज महानगर (प्रतिनिधी): ए एस क्लब परिसरात दोन्ही बाजूच्या फुटपाथवर अवैध रित्या कब्जा करून काही खेळणी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांनी दुकाने थाटली असून पुर्ण फुटपाथ वर कब्जा करुन दुकाने थाटली आहेत यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण करत आहेत याकडे मात्र पोलिसांचे दुर्लक्ष असून याठिकाणी एखादा गंभीर अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

छत्रपती संभाजीनगरहून वाळूजला रोजगारासाठी येणाऱ्या कामगारांची संख्या अधिक असून, मुंबई-पुणे सारखी वर्दळ या मार्गावर नेहमी पाहायला मिळते. या मार्गावर ए एस क्लब व साऊथ सिटी बसथांबा दरम्यान कित्येक दिवसांपासून काही खेळणी विक्रेत्यांनी दोन्ही बाजुला असलेल्या फुटपाथवर अवैध रित्या कब्जा केला असून, दुकानासह राहूटी टाकून वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे र्रि मार्गावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनाचे ब्रेक निकामी झाल्यास किंवा अपघात झाल्यास या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जीवित हानी होऊ शकते म्हणून या विक्रेत्यांवर कारवाई करुन हटविण्यात यावेत असे अनेक कामगारांकडून मागणी होत आहे. याकडे संबंधित पोलिस ठाणे व वाहतूक शाखेचे दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस या मार्गावर अवैध विक्रेत्यांची संख्या वाढत आहे.

## गंगापूर विधानसभा मतदारसंघात गृह मतदानाला सुरुवात



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१५ नोव्हेंबर : गंगापूर विधानसभा मतदारसंघात गृह मतदानाला सुरुवात झाली असून गंगापूर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी डॉ सुचिता शिंदे यांनी एकूण १३ पथकांची नियुक्ती केली आहे. विधानसभा २०२४मध्ये ८५ वर्षावरील जेष्ठ नागरिक मतदार व ४०% अपंगत्व असलेले दिव्यांग व्यक्ती यांना गृह मतदान त्यांच्या संमतीने करण्याचा पर्याय देण्यात आला असून सदर गृह मतदानाला आज रोजी प्रत्येक्ष सुरुवात करण्यात आली दि १५ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२४ पर्यंत सदर प्रक्रिया पार पडणार आहे. यात तालुक्यातील ३८१ मतदार यांचे गृह मतदान घेण्यात येणार असून, आज नांदेडा तालुका गंगापूर येथे गृह मतदानाला मा निवडणूक निरीक्षक श्री उज्वलकुमार सिंह यांनी भेट दिली.

## बिबट्याच्या हल्ल्यामध्ये प्रणाली मुळे हिच्या मृत्यूनंतर वन विभाग सतर्क ७४ जळगाव परिसरा मध्ये लावले दोन पिंजरे

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १५ नोव्हेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील घटना बिडकीन १३ नोव्हेंबर रोजी ७४ जळगाव परिसरामध्ये बिबट्याच्या हल्ल्यात प्रणाली मुळे ही दहा वर्षीय मुलगी मरण पावल्याने वनविभाग खडबडून जागा झाला व आज ७४ जळगाव परिसरामध्ये दोन पिंजरे लावण्यात आले तर प्रणालीच्या पालकांना २५ लाख रुपयांची मदत वनविभागाकडून मिळणार असून प्रथम दहा लाख रुपये मंगळवार पर्यंत देण्यात येणार आहे बिडकीन पोलीसातर्फे सहायक फौजदार सोमनाथ तांगडे यांनी पंचनामा केला यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके उपस्थित होते मृतदेहाची उत्तरीय तपासणी झाल्यानंतर वनविभागाने प्रणालीचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी पालकांच्या स्वाधीन केला प्रणालीच्या मृत्यू



नंतर वनविभाग सतर्क झाला संभाजीनगरचे उपवनसंरक्षक सूर्यकांत मनकावर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक प्रदीप शंखपाळ ,पैठण तालुका प्रभारी वनपरिक्षेत्राधिकारी साहेबराव तांबे, वनपाल अलका राठोड, निर्मला बहुरे, वनरक्षक प्रभू चोरमारे, प्रशांत निकाळजे, राजीव जाधव, प्रकाश सूर्यवंशी, शेख अमिना, कृष्णा राजगे, अविनाश राठोड आदी वनविभागाचे कर्मचारी व बिडकीन पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे घटनास्थळाकडे रवाना झाले त्या ठिकाणी दोन टीम करण्यात आल्या व त्यांनी बिबट्याचा शोध घेतला मात्र या भागामध्ये दाट झाडी व उसाचे पीक यामुळे बिबट्या मिळून आला नाही त्यानंतर वनविभागाने घटनास्थळाजवळ व ग्रामस्थांनी बिबट्याचा रस्ता दाखवलेल्या अशा दोन ठिकाणी पिंजरे लावले पिंजऱ्यामध्ये बकऱ्याची पिले ठेवण्यात आली अशी माहिती प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी साहेबराव तांबे यांनी दिली या परिसरामध्ये बिबट्याचा वावर असल्याने शेतामध्ये कोणीही एकट्याने जाऊ नये तसेच शेतामध्ये काम करत असताना ब्लूटूथ स्पीकरवर गाणी किंवा हसण्याचे आवाज चालू ठेवावेत जेणेकरून बिबट्या त्या भागात असल्यास दूर निघून जाईल व जीवितहानी होणार नाही तसेच शेतात जाताना सगळ्यांनी सावधगिरीने जावे असे आवाहन वनविभागातर्फे करण्यात आले आहे,आज सकाळी तोंडोळी परिसरामध्ये एका बकरीवर बिबट्याने हल्ला करून बकरी चा फडशा पाडला त्या ठिकाणीही वन्य विभागाची टीम गेली मात्र गवतामुळे बिबट्याचा माघ दिसला नाही,७४जळगाव येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दहा वर्षीय बालिका ठार झाल्याने या परिसरासह लोहगाव बिडकीन या जवळ असलेल्या सर्कलमध्येही शेतकरी वर्ग व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून भल्या पहाटे फिरायला जाणाऱ्या मंडळींनी आता उजेडल्यानंतरच फिरायला जाण्याची ठरवले.

## गांजा विक्री प्रकरणी तिघांवर कारवाई; एक फरार



तभा वृत्तसेवा

पैठण दि १५ :- पैठण शहरातील हॉटेल पार्कवे समोरील गल्लीत तसेच पालखी ओटा परिसरात अमली पदार्थ गांजा विक्री होत असल्याचा गोपनीय खबरीवर पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने केलेल्या कारवाईत तिघांकडून पोलिसांना जवळपास साडेतीन किलो गांजा जप्त केला असून आरोपींविरुद्ध कलम २० ब अ एन डी पी एस अँक्ट १९८५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील गागाभट्ट चौक समोरील आरोपी फरार झाला आहे.

पैठण शहरात अमली पदार्थ गांजा विक्री होत असून याला अनेक जण बळी पडत असल्याची गोपनीय खबर पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरकुल,नागरगोजे,सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरे,पोलीस हेड कॉन्स्टेबल चेडे, दांडगे, ठोकळ, ढाकणे, चव्हाण, दिलवाले वैद यांच्या पथकाने साधे वेशधारण करून हॉटेल पार्कवे समोरील गल्लीत तसेच गागाभट्ट चौकात धाड टाकली असता वरील दोन्ही ठिकाणाहून पोलिसांना साडेतीन किलो गांजा मिळाला आहे. यासाठी आरोपी प्रकाश शिंदे,राधाबाई प्रकाश शिंदे यांना ताब्यात घेतले आहे. तर गागाभट्ट चौका समोरील सागर पोपळघट हा आरोपी फरार झाला आहे. आरोपींवर एन डी पी एस १९८५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाथमंदिर परिसरात ही गांजा विक्री होत असल्याची चर्चा यावेळी सुरू होती.

## स्थिर सर्व्हेक्षण पथकाची कारवाई; १९ किलो सोने व ३७ किलो चांदी जप्त

छत्रपती संभाजीनगर, दि.१५(जिमाका)- आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्थिर सर्व्हेक्षण पथकाने १०४- सिल्लोड मतदार संघात निल्लोड फाटा येथे १९ किलो सोने व ३७ किलो चांदी जप्त करण्यात आली. एका खाजगी वाहनातून ही वाहतुक होत होती. जप्त केलेल्या ऐवजाची किंमत अंदाजे १९ कोटी रुपयांची आहे,असे आचारसंहिता कक्षाचे सहायक नोडल अधिकारी राजेंद्र देसले यांनी कळविले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी जिल्हाधिकारी कार्यालयात आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामार्फत आचारसंहिता अंमलबजावणीसाठी स्थिर सर्व्हेक्षण पथके नियुक्त करण्यात आली आहेत. गुरुवारी (दि.१४) रोजी १०४ सिल्लोड मतदार संघात छत्रपती संभाजीनगर ते जळगाव महामार्गावर निल्लोड फाटा येथे जळगावकडे जात असलेल्या एमएच १२ व्हीटी ८६२९ या वाहनाची तपासणी केली असता त्यात १९ किलो सोने व ३७ किलो चांदीची वाहतुक होत असल्याचे आढळून आले. हा ऐवज जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत १९ कोटी रुपये आहे. हा ऐवज व वाहन सिटी पोलीस स्टेशन सिल्लोड यांना सुपूर्द करण्यात आला असून पुढील कारवाई वस्तू व सेवा कर विभागामार्फत करण्यात येत आहे,असे सहाय्यक नोडल अधिकारी राजेंद्र देसले यांनी कळविले आहे.

## महा विकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांनी उस्मानपुरा येथील गुरुद्वाराच्या पायरीवर टेकला माथा

### लंगरचा घेतला अस्वाद

छत्रपती संभाजीनगर: महा विकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांनी आज दि. १५ नोव्हेंबर रोजी गुरु नानक यांची जयंती असल्यामुळे उस्मानपुरा भागातील गुरुद्वाराच्या पायरीवर माथा टेकला. यावेळी त्यांच्या सोबत शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) चे जिल्हा प्रमुख त्रिंबक तुपे, शहर प्रमुख हरीभाऊ हिवाळे आदिंची उपस्थिती होती. या वेळी राजू शिंदे गुरू चरणी लीन होऊन विजयासाठी साकडे घातले. राजू शिंदे यांनी येथील लंगरचा लाभ घेतला.



सिंधी कॉलनीतील गुरू नानक जयंती कार्यक्रमाला उपस्थिती

सिंधी कॉलनीतील अमर शहीद संत कवरराम सभागृहात गुरू नानक यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी राजू शिंदे यांनी भेट देऊन गुरूंचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्रिंबक तुपे, राजू कलवाणी, किरण शेठ, आदिंसह समाज बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख त्रिंबक तुपे म्हणाले, की पश्चिम मतदार संघ एन १ वॉर्ड सारखे बनवायचे आहे. येत्या २० तारखेला मतदान आहे. राजू शिंदे हा सर्वोत्तम कार्यकर्ता आहे. त्यांचेच नाव पुढे येत आहे. राजू शिंदे विधान सभेवर गेल्यानंतर ते युवकांच्या रोजगाराच्या समस्या सोडवतील, अशी अपेक्षा व्यक्त करून मशालीच्या चिन्हावर मतदान करून आपला प्रतिनिधी विधानसभेत पाठवा, असे आवाहन केले. यावेळी राजू शिंदे म्हणाले, की सर्वांचा आशिर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. येणाऱ्या २० तारखेला मशाल चिन्हावर मतदान करून मला निवडूण द्यावे. आपल्या समस्या सोडवन्यासाठी मी प्रयत्न करणारच. सुखदुःखात उभा राहणारा एक सामान्य कार्यकर्ता आहे. कधीही आवाज द्या, आपल्या हाकेला ओ देणारा माणूस आहे. आपल्या

## शंभुत्व प्रतिष्ठाणच्या वतीने भगवद गीताचे वाटप



वाळूज महानगर (प्रतिनिधी) येथील शंभुत्व बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे बजाजनगरातील जागृत हनुमान मंदिरात श्रीमद भगवत गीताचे वाटप करून मीमद भगवत गीला चे वाटप करण्यात आले. तसेच बाबासाई एड्सग्रस्त मुला -मुली चे बालगृह येथे अन्नदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सरपंच सुनिल काळे , बप्पा दळवी उपस्थित होते . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम काळे , गोकूळ आव्हाड , अक्षय उबाळे , मुकेश मंगरूळे , बप्पा चौधरी , उद्धव पवार , किरण वर्णे आदींनी परिश्रम घेतले.

### बँगलोरच्या डॉक्टरांनी केला होता दावा : रुग्णाला जगात कुठेही नेलं तरी रुग्ण वाचु शकणार नाही...!

## डॉ. आय.जी.पटेल यांच्या कॅन्सर सेलथेरपीने रुग्ण झाली बरी....!

### कॅन्सरयोध्यांचे नाव : आश्विनी भोसले (रा. बँगलोर, कर्नाटक)

छत्रपती संभाजीनगर : डॉ. आय.जी. पटेल फांऊडेशन तर्फे कॅन्सर म्हणजे अंत नव्हे ही मोहीम राबवली जाते आणि याच माध्यमातुन कॅन्सर मधुन बऱ्या झालेल्या रुग्णाचे अनुभव समाजासमोर आणले जातात. समाजातील कॅन्सरग्रस्त रुग्णांना कॅन्सर हा अंत नव्हे हा दिलासा बहाल केला आहे... म्हणुनच आजवर डॉ. आय.जी. पटेल यांच्या कॅन्सर सेलथेरपी उपचाराने हजाराहुन अधिक रुग्णांनी कॅन्सरवर विजय प्राप्त केला आहे.. आणि दिवसेंदिवस याचा आकडा वाढत देखील आहे. यातच नुकतीच एक रुग्ण जिने कॅन्सरचा पराभव केला आहे.... जिला बँगलोर येथील डॉक्टरांनी जगाच्या कोणत्याच ठीकाणी तुमचा आजार बरा होवु शकत नाही कुठेही नेलं तरी ती रुग्ण वाचु शकत नाही असा दावा केला होता... अशा घाबरलेल्या अवस्थेत रुग्णांच्या नातेवाईकांनी तिला तात्काळ रातोरात अॅम्बुलन्स ने बेंगलोर वरुन छ. संभाजीनगरात डॉ. आय. जी. पटेल फांऊडेशन यांच्या सत्यविष्णु रुग्णालयात दाखल केले.... अतितात्काळ रुग्णाचा उपचार डॉ. आय. पटेल यांनी सुरु केला... रुग्ण अॅडमिट झाली तेव्हा त्याच्या छातीचे ठोके अतिशय कमी होते. रुग्णाला ऑक्सिजन घेता येत नव्हता... अशा स्थितीत रुग्णाला १२ दिवसात तब्बल १० लिटर ऑक्सीजनवर अॅडमिट ठेवले.... शिवाय रुग्णाचा कॅन्सर संपुर्ण शरीरभर पसरलेला होता, त्यात तिच्या छातीत पाणीदेखील झाले होते त्यामुळे जवळपास ३ ते ४ वेळा पाणी काढले रुग्णामध्ये खुप विकनेस होता. फोर्थ स्टेजच्या पलीकडे रुग्णाचा कॅन्सर वाढला होता. तरी देखील आपण तिला त्या स्थितीतुन बाहेर काढले. नुकताच रुग्णाचा पेटस्कॅन केला असता त्याचे संपुर्ण रिपोर्टस् नॉर्मल आले आहे. फक्त एक ५ ते १० टक्क्यापर्यंत काही ठीकाणी काही आजार आढळुन आले आहे. परंतु रुग्ण आता चालतो फिरतो, जेवण करतो त्याला ऑक्सिजनची गरज नाही, एक नॉर्मल जीवन जगत आहे. याशिवायच डॉ. आय. जी. पटेल फांऊडेशनने कॅन्सर रुग्णांना दिलासा विविध योजनांच्या माध्यमातुन दिलासा देत सत्यविष्णु रुग्णालय व सिल्व्हरलाईन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजना व महात्मा फुले जनआरोग्य योजना आणुन कॅन्सर रुग्णांना व नातेवाईकांना आर्थिक सहाय्य दिले आहे.

### एकनाथी भागवत राष्ट्रीय ग्रंथाला झाले ४५१ वर्षे पूर्ण

## पैठण येथे एकनाथी भागवत जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

पैठण दि १५ :- दक्षिण काशीतील श्रीक्षेत्र पैठण येथील भुमीपुत्र संत एकनाथ महाराजांनी धर्माचार्यांच्या आग्रहामुळे कार्शी क्षेत्री श्रीमत भागवताच्या एकास्कंधावर प्राकृत मधून भगवान श्रीकृष्णाने उद्धवाला जो उपदेश केला त्या संदर्भातील जवळपास १८हजार ओव्यांचा अतिउत्तम ग्रंथ शालिवाहन शके १४९५ म्हणजेच इ.स.१५७३ मध्ये लिहुन पुर्ण केला.ग्रंथ काशीकरांना खुपच आवडला.धर्मचार्यांनी एकनाथ महाराजांचा जयजयकार करून आनंद उत्सव साजरा करुन धर्म न्यायपीठाने या ग्रंथाला एकनाथी भागवत या नावाने संबोधुन ग्रंथ अंबरमध्ये ठेवून हत्तीवरून मिरवणूक काढून एकनाथ महाराजांवर पुष्पवृष्टी करून एकनाथांचा श्रेष्ठ संत म्हणून गौरव केला. या राष्ट्रीय ग्रंथाला दि.१५,शुक्रवारी कार्तिकी एकादशीच्या पोर्णिमेच्या शुभ पर्वावर ४५१ वर्षे पूर्ण झाल्यामुळे श्री संत एकनाथ महाराज संस्थान वारकरी फड व एकनाथ महाराज भक्त मंडळाच्या वतीने पैठण च्या बाहेरील नाथ समाधी मंदिरात एकनाथी भागवत ग्रंथाची पुजा पुरोहित चंद्रशेखर उपाध्ये,रविंद्र साळजोशी,उत्तम शेवनकर यांच्या मंत्रघोषात संत, महंत व मान्यवरांच्या हस्ते पार पडली. भाविकांनी भारुडे, भजने,भक्तीगीते म्हटली.यावेळी रघुनाथ महाराज पालखीवाले, ज्ञानेश महाराज पालखीवाले, बंडेराव जोशी, दिनेश पारीख,नामदेव उगले, छत्रपती . भोसले.चंद्रकांत मखेडकर, कैलास. गोरख, हरिभाऊ चौधरी,विलास उफाळ,विठ्ठल खरात,एकनाथ उफाड अदि उपस्थित होते

## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अनिल चंडालिया यांच्या प्रचारार्थ अंजलीताई आंबेडकर यांची जाहीर सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१४ नोव्हेंबर : गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल अशोक चंडालीया यांच्या प्रचारार्थ नेत्या सौ अंजलीताई आंबेडकर यांची लासुर स्टेशन येथे प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती.

गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडी कडून अनिल चंडालीया यांच्या प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर सौ. अंजलीताई आंबेडकर, उमेदवार अनिल चंडालिया, अरुंधतीताई सिरसाठ,जिल्हाध्यक्ष योगेश बन, अमितभाई भुईंगळ, वसीम मुफ्ती, बाबासाहेब भिवसने,यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रा. अंजलीताईं आंबेडकर म्हणाल्या गंगापूर खुलताबाद विधानसभा निवडणुकीसाठी उभे असलेले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अनिल चंडालिया अतिशय एक चांगला उमेदवार लाभलेला आहे. वंचित बहुजन आघाडीच्या तिकिटावर उभे आहेत की जो कुठल्याही जातीची असो कुठल्याही धर्माचे असो केवळ ते वंचित आहेत या एकाच मुद्द्यावरती आपण त्या सगळ्यांना घेऊन बरोबर चालत आहे व त्यात वेगवेगळ्या ओबीसी समाजाची लोक आहेत. लोकांच्या विकास कामांवर खर्च झाला पाहिजे याचा आग्रह देणारे लोकांची छोटी छोटी काम करणारे आहेत . त्यांच्या विरोधात सतरावर्षापासूनचे आमदार सामाजिक कार्यकर्ते कमी आणि शिक्षण सम्राट म्हणून जास्त ओळखले जातात त्यांनी गरीब कुटुंबातल्या मुलांना तरी त्यांनी फुकट प्रवेश दिला असेल असे कोणी ऐकले का? कारण ते गरिबांसाठी नाहीये. शिक्षणामुळे माणसं विचार करतात स्वाभिमानाने जगतात समाजाच्या गरीब लोकांना सुद्धा त्यांनी त्यांच्या शिक्षण संस्थेचा काही फायदा करून दिला नाही.असे त्या म्हणाल्या.






# लव-अ‍ॅरेंज मॅरेजवरून करमाळ्यात संजयमामांची टोलेबाजी

- महायुतीत बिघाडी
- भाजपाचे गणेश चिवटे अपक्ष संजयमामांच्या गोटात
- घड्याळ अन् तुतारीची वाढली धाकधूक







**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**

**सोलापूर, दि. १४ नाव्हेंबर-**

**करमाळा विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश चिवटे यांनी अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून एका प्रचार सभेत अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांनी विरोधकांना टोला हाणताना सांगितले की, चिवटे तूम्ही आणि मी एकत्र आलो म्हणजे आपले लव आहे, अ‍ॅरेंज मॅरेज नाही. कारण अरेंज मॅरेजमध्ये देण्याघेण्याचे ठरते. आपले लव असल्याने आपल्यात तसा प्रकार नाही. संजयमामा शिंदे यांनी दिलेले मार्मिक उदाहरण ऐकून उपस्थितांमध्ये हशा तर पिकलाच पण विरोधकांनी कसे बेरेजेचे राजकारण केले याचाही उलगडाही झाला.**

करमाळा या बहुचर्चित विधानसभा मतदारसंघात महायुतीत बिघाडी पहावयास मिळत असून भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश चिवटे हे अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांच्यासोबत गेल्याने संजयमामांचे सफरचंद चिन्ह जोमात आल्याचे तर नारायणआबांची तुतारी व बागलांचे घड्याळ पिछाडीवर पडत असल्याचे चित्र आहे. अधिकृत पक्ष चिन्हाऐवजी अपक्ष लढणाऱ्या संजयमामा शिंदे यांनी जोर धरल्याने विरोधी उमेदवारांची दमछाक सुरु झाली आहे.




सोलापूर जिल्ह्यातील करमाळा व माळशिरस या तालुक्यांच्या राजकारणाचे सोलापूरकरांसाठी एक वेगळे स्थान आहे. माळशिरसचे सहकार महर्षी स्व. शंकरराव मोहिते-पाटील आणि करमाळ्याचे स्व. नामदेवराव जगताप यांनी एकेकाळी सोलापूरच्या राजकारणात मोलाची भूमिका बजावली आहे. सोलापूर जिल्ह्याच्या विकासात या दोन मोठ्या नेत्यांचे मोठे योगदान असल्याचे जाणकार सांगतात. इतकेच काय तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचाही राजकीय उदय करमाळा विधानसभा मतदारसंघातूनच झालेला आहे. शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते तर माळशिरसने विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या रुपाने महाराष्ट्राला उपमुख्यमंत्री दिलेला आहे.

करमाळा विधानसभा मतदारसंघ हा नेहमीच निवडणुकीत चर्चेत असलेला मतदारसंघ आहे. करमाळ्याचे विद्यमान आमदार संजयमामा शिंदे हे अजित पवार यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. परंतु सध्याची राजकीय परिस्थिती पाहता संजयमामांनी यंदाचीही निवडणूक अपक्ष म्हणूनच लढविली आहे. करमाळा विधानसभा मतदारसंघाला माढा तालुक्यातील ३६ गावे जोडण्यात आलेली आहेत. माढा तालुक्यावर संजयमामा शिंदे यांचे वर्चस्व आहे. तर करमाळा विधानसभेतील करमाळा तालुक्यातील माजी आमदार नारायण पाटील हे पूर्वी शिवसेनेचे उमेदवार होते ते यंदा तुतारी चिन्हावर लढत आहेत. त्यांनी जगताप व सावंत गट हाताला धरून बेरेजेचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला खरा पण त्यांना करमाळ्यातील स्थानिक मोठे राजकीय घराणे बागल यांच्या कुटुंबातील दिग्विजय बागल यांचाही सामना करावा लागणार आहे. कारण बागल हे एकनाथ शिंदे सेनेचे धनुष्यबाण हाती घेवून निवडणूक मैदानात उतरलेले आहेत. करमाळा तालुक्यातील मतांचे विभाजन तुतारी व धनुष्यबाण यांच्यात तर अपक्ष संजय शिंदे यांच्या सफरचंद चिन्हाला माढा तालुक्यातील ३६ गावांसह करमाळ्यातूनही मोठी मागणी असल्याचे जाणवत आहे. करमाळ्यातील दोन स्थानिक उमेदवारांच्या लढाईत मतविभाजनाचा लाभ अपक्ष उमेदवाराला होईल, अशी चर्चा करमाळ्यातील राजकीय वर्तुळात रंगली आहे. करमाळा तालुक्याच्या विकासासाठी गत पाच वर्षात विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणलेला आहे. उजनी धरणावर पर्यटन सुरु करण्याचे संजयमामा शिंदे यांचे स्वप्न असून हा ड्रिम प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी त्यांनी सुमारे ३०० कोटींचा निधी मंजूर करून घेतला आहे. करमाळा विधानसभा मतदारसंघातील रस्ते विकास मोठ्या प्रमाणात झाला असून डीपी मंजूर करून घेवून वीजेचा प्रश्न देखील बहुतांश प्रमाणात संजयमामांनी मिटवल्याचे लोक सांगतात. कुकडीची आवर्तन आणल्याने मांगी तलाव भरला अन् लोकांचा पाणी प्रश्न सुटला. दहिगांव उपसा सिंचन योजनेसाठी निधी आणल्याने परिसरातील केळी उत्पादकांच्या उत्पन्नात मोठी वाढ झाल्याचे शेतकरी सांगतात. कुगाव ते कळाशी हा उजनी धरणावरील पूल बांधण्यात येणार असून यासाठी देखील संजयमामांनी निधी आणून अजितदादांच्या हस्ते कामाचा शुभारंभ केल्याचे सांगितले जाते.

एकूणच करमाळ्यातील राजकीय समीकरणे पाहता तुतारी व धनुष्यबाणापेक्षा अपक्ष सफरचंदच पुन्हा चर्चेत आल्याचे चित्र आहे. करमाळ्यात तुतारी वाजणार का धनुष्यबाण चालणार की मतदार यंदाही अपक्ष संजयमामांना पसंती देतात हे २३ नोव्हेंबरला मतमोजणीनंतरच स्पष्ट होणार आहे.



### उजनीवर पर्यटन सुरु झाल्यास जिल्ह्याचा विकास

सोलापूरसाठी वरदायिनी ठरलेल्या उजनी धरणावर सोलापूर जिल्ह्याच्या शेतीचा मोठा विकास झाला आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील ५० लाख लोकांची तहान भागविणाऱ्या उजनी धरणावर शेतीची वार्षिक सुमारे दोन हजार कोटींची उलाढाल होते. सोलापूर जिल्ह्यात उजनीच्या कृपेने ३९ साखर कारखाने कार्यरत आहेत. तर फळ पिकांचे उत्पादन घेणारे जवळपास सर्वच शेतकरी कृषीभूषण आहेत. अशा १२३ टीएमसी पाणीसाठा क्षमतेच्या उजनी धरणावर ३०० कोटींच्या निधीतून पर्यटन सुरु होणार आहे. उजनीवरील पर्यटनामुळे जिल्ह्याचा विकास होणार असून याचे श्रेय करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे यांनाच असणार हे मात्र नक्की होय.

## 'बटेंगे तो कटेंगे'चा मास्टर स्ट्रोक

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिलेल्या 'बटेंगे तो कटेंगे'च्या घोषणेवर उमटलेल्या उलट सुलट प्रतिक्रिया आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे केलेले समर्थन पाहता भाजपसाठी ही घोषणा मास्टर स्ट्रोक ठरते की काय असे, वाटायला लागले आहे.**

ऑगस्टमध्ये बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना आपला देश सोडावा लागला आणि बांगलादेशातील हिंदू समुदायावर हल्ले झाल्याच्या बातम्या समोर आल्या, तेव्हा योगी आदित्यनाथ यांनी 'बटेंगे तो कटेंगे' ही घोषणा केली होती. त्यानंतर आता उत्तर प्रदेशातील नऊ जागांच्या पोटनिवडणुकीमध्ये आणि महाराष्ट्र तसेच झारखंडच्या निवडणुकीमध्येही या घोषणेचा प्रतिध्वनी ऐकू येत आहे. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि भाजपमध्ये 'बटेंगे तो कटेंगे'च्या घोषणेवरून सोशल मीडिया पोस्टर वॉरही सुरू आहे. महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणुका, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांच्या पोटनिवडणुकांमध्ये या घोषणेचा काही परिणाम होईल का, हा प्रश्न आहे. या घोषणेसाठी काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि इतर विरोधी पक्षांनी भाजप आणि योगी आदित्यनाथ यांच्यावर टीका केली नाही, तर महाराष्ट्रातील भाजपचा मित्र राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) देखील या घोषणेपासून दूर झाला आहे. योगी आदित्यनाथ यांनी बांगलादेशातील हिंदू समुदायावरील हल्ल्यांबाबत विरोधकांच्या मौनावर निशाणा साधत याला 'व्होट बँके'चे राजकारण म्हटले आहे. जगभरातील मुद्द्यांवर बोलणारे विरोधी पक्ष बांगलादेशातील हिंदू मंदिरे आणि हिंदूंवरील हल्ल्यांबाबत मौन बाळगून आहेत, असे ते म्हणाले होते. संपूर्ण राजकीय वातावरणावर बारकाईने नजर टाकल्यास, लोकसभा निवडणुकीमध्ये उत्तर प्रदेशात भाजपच्या खराब कामगिरीपासून योगी आदित्यनाथ खुलेआम हिंदुत्वाच्या खेळपट्टीवर खेळत आहेत. सप्टेंबरमध्ये त्यांच्या सरकारने खाद्यपदार्थ, हॉटेल्स आणि ढाब्यांबाबत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती, तेव्हा उत्तर प्रदेशात याबाबत जोरदार भाषणबाजी झाली होती. जुलैमध्ये उत्तर प्रदेश पोलिसांनी सांगितले होते, की कावड यात्रेच्या मार्गावर येणारी सर्व रेस्टॉरंटस्, रस्त्याच्या कडेला असलेले ढाबे आणि खाद्यपदार्थांच्या गाडी चालकांना त्यांच्या दुकानांच्या बाहेर नावे लिहिणे आवश्यक आहे. त्यानंतरही या आदेशावरून वातावरण तापले होते. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी हा सामाजिक गुन्हा ठरवला होता आणि इतर विरोधी नेत्यांनी हा नियम भेदभाव करणारा असल्याचे म्हटले होते. हा वाद इतका टोकाला गेला होता की भाजपच्या मित्रपक्षांनीही या आदेशावर चिंता व्यक्त केली होती. अशा मित्रपक्षांमध्ये लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) आणि संयुक्त जनता दलाचा समावेश होता; मात्र सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारच्या आदेशाला स्थगिती दिल्याने हा वाद संपला.

**लक्षवेधी लढत**



या पार्श्वभूमीवर आता योगी यांच्या 'बटेगे ते कटेंगे' या घोषणेला भाजपची मातृसंस्था मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आणि पंतप्रधानांचे समर्थन आहे. यावरून लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या खराब कामगिरीनंतर कदाचित मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना हिंदुत्वाच्या खेळपट्टीवर उघडपणे खेळण्यास हिरवा कंदील मिळाला असल्याचे मानले जात आहे. 'समाजवादी पक्ष हे गुन्हेगारांचे 'प्रॉडक्शन हाऊस' आहे आणि अखिलेश यादव त्याचे 'सीईओ' असा आरोप योगी यांनी निवडणूक सभेमध्ये केला होता. हिंदुत्वाच्या खेळपट्टीवर आक्रमकपणे खेळत योगी आदित्यनाथ यांनी स्वतःला देशभरातील राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे आणि यामुळे योगींचा राजकीय कौल नक्कीच वाढला आहे. पंतप्रधान मोदी यांनी 'एक है तो सेफ है' अशी घोषणा केली. पंतप्रधानांचा पाठिंबा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या पाठीशी असल्याचे स्पष्ट झाले. विरोधकांकडून केलेल्या जात जनगणनेच्या मुद्द्यावरही पंतप्रधानांनी हल्लाबोल केला आणि असे करून काँग्रेसला जातींमध्ये फूट पाडायची आहे, असे सांगितले. हिंदू मतांच्या विभाजनामुळे लोकसभा निवडणुकीमध्ये नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी मुंबईतील अनेक भागात 'बटेंगे ते कटेंगे'चे पोस्टर लावण्यात आले आहे. हिंदू मतांचे विभाजन झाले, तर पक्षाचे निश्चितच नुकसान होईल, असे भाजपला स्पष्ट वाटते.

जातीच्या आधारावर जनगणना, आरक्षण आणि संविधान धोक्यात आले आहे, या प्रचाराने भाजपला मोठा फटका बसला. गेल्या काही वर्षांमध्ये योगी आदित्यनाथ हे हिंदुत्वाचा नवा चेहरा म्हणून पुढे आले आहेत. २०१७ मध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यापासून अनेक राज्यांमध्ये भाजपचा जोरदार प्रचार केला आहे. त्यांना केवळ उत्तर भारतातील राज्यांमध्येच नाही, तर दक्षिणेतही मोठी मागणी आहे. भाजपने योगी आदित्यनाथ यांना सुशासनाचा चेहरा म्हणून पुढे केले आहे आणि दावा केला आहे, की उत्तर प्रदेशने त्यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड प्रगती केली आहे. खुद्द मोदी यांनी अनेक प्रसंगी योगी यांचे खुलेपणाने कौतुक केले आहे. महाराष्ट्र आणि झारखंड तसेच उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांच्या पोटनिवडणुकांचे निकाल येतील तेव्हा हिंदुत्वाच्या राजकारणाचा मोठा चेहरा असलेल्या योगी आदित्यनाथ यांच्या या घोषणेचा मतदारांवर काही परिणाम झाला आहे का, याचे निश्चितच आकलन होईल; पण सध्या या घोषणेची देशाच्या राजकारणामध्ये बरीच चर्चा आणि प्रतिध्वनी आहे.

## थोरात, विखे, गडाख, पवारांची प्रतिष्ठा पणाला

**या विधानसभा निवडणुकीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील दिग्गज राधाकृष्ण विखे पाटील, बाळासाहेब थोरात, रोहित पवार, प्रा. राम शिंदे, प्राजक्त तनपुरे, चंद्रशेखर घुले, शिवाजीराव कर्डिले, शंकरराव गडाख यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. या जिल्ह्यामध्ये एकूण बारा मतदारसंघांमध्ये काट्याच्या लढती होत आहेत.**

अहिल्यानगर म्हणजेच अहमदनगर जिल्हा. राज्य आणि केंद्र शासनाने या जिल्ह्याचे नाव बदलले असले, तरी आजही निवडणूक आयोगाच्या लेखी नोंदीत अहमदनगर हीच नोंद कायम आहे. हा जिल्हा ऐतिहासिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यटन अशा विविधतेने नटलेला आहे. जिल्ह्याची ओळख म्हणजे सहकाराची पंढरी. सह्याद्रीच्या पर्वतरांगा, कळसूबाई शिखर, हरिषचंद्र गड, चांदबीबीचा महाल, पट्टा किल्ला अशी ऐतिहासिक स्थळे या जिल्ह्यात आहेत. र शिर्डी, शनिशिंगणापूर, मोहटा देवी अशी धार्मिक तीर्थस्थळे असल्याने देशतीलच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याची ओळख तयार झाली आहे. जिल्ह्यातील बारापैकी सात ते आठ विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे आमदार असून विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीचा कस लागणार आहे. एकूण २५९ उमेदवारांनी बारा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केले होते, तर त्यातील १०९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आणि अखेर १५१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. बारा संघांपैकी जवळपास आठ मतदारसंघांमध्ये बंडखोरी झाली असून महायुती आणि महाविकास आघाडी अशा दोन्ही बाजूला अधिकृत उमेदवारांची कसोटी लागणार आहे.

संगमनेरमध्ये महाविकास आघाडीचे आमदार बाळासाहेब थोरात विरुद्ध महायुतीचे अमोल खताळ यांच्यात थेट लढत होत असली, तरी थोरात यांचा या मतदारसंघावर प्रभाव असल्याचे चित्र आहे. माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी लोकसभा निवडणूक हरल्यानंतर या मतदारसंघामधून निवडणुकीची तयारी केली होती; मात्र पक्षाने पिता-पुत्र दोघांना तिकीट न देण्याची भूमिका घेतल्याने थोरातांचा सामना खताळ यांच्याशी होणार आहे. त्यातच विखे यांच्या सभमध्ये वसंतराव देशमुख यांनी आमदार थोरात यांच्या कन्या डॉ. जयश्री यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याचे तीव्र पडसाद या मतदारसंघात उमटले आहेत. थोरात यांच्या ताब्यातील साखर कारखाना, दूध संघ, बाजार समिती या सर्वंच संस्था चांगल्या चालल्या आहेत. संगमनेरची बाजारपेठ त्यांच्यावरच अवलंबून आहे. शिक्षण संस्थामुळे अनेकांना रोजगार मिळाला आहे. थोरात यांची प्रतिमाही संयमी, सर्वसमावेशक असा नेता असल्याने सलग आठव्यांदा त्यांचा विधानसभेत प्रवेश झाला, तर तो एक विक्रम ठरेल. अकोले विधानसभा मतदार संघातून महायुतीचे (राष्ट्रवादी-अजित पवार) आमदार डॉ. किरण लहामटे विरुद्ध महाविकास आघाडीचे (राष्ट्रवादी-शरद पवार) अमित भांगरे यांच्यात लढत होत आहे. महायुती आणि महायुतीतही बंडखोरी झाली आहे. माजी आमदार वैभव पिचड रिंगणात आहेत. कर्जत-जामखेडमध्ये भाजपचे विधान परिषद आमदार राम शिंदे यांच्याविरुद्ध महाविकास आघाडीतील शरद पवार यांचे नातू, आमदार रोहित पवार यांच्यात लढत होणार आहे. १९९० पर्यंत काँग्रेसचे या मतदार संघावर वर्चस्व होते, तर १९९५ पासून मतदारसंघ भाजपने खेचून घेतला आणि २०१९ पर्यंत कायम राखला. २००९ आणि २०१४ ला राम शिंदे निवडून आले. त्यांनी मतदारसंघावर पकड बसवली; पण २०१९ मध्ये मंत्रिपदी असतानाही रोहित पवार यांच्याकडून त्यांना पराभव पत्करावा लागला. आता पुन्हा शिंदे विरुद्ध रोहित पवार अशी लढत होणार असून शिंदे यांची ही अस्तित्वाची लढाई आहे. महाविकास आघाडीचे सरकार असताना आ. पवार यांनी मतदारसंघातील अनेक प्रश्न मार्गी लावले. सरकारबरोबरच बारामती प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी अनेक कामे केली. राज्यपातळीवर त्यांचे नेतृत्व प्रस्थापित झाले. एक अभ्यासू आमदार अशी त्यांची ओळख झाली. त्यांच्या कामांना महायुतीच्या काळात आ. शिंदे यांनी घातलेल्या खो मुळे जिल्ह्यात हा वादाचा विषय झाला होता. आता आ. शिंदे यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांना गळाला लावले आहे. अजित पवार यांचा या मतदारसंघात कारखाना असला, तरी त्यांची आता मदत मिळणार नाही. या पार्श्वभूमीवर इथली लढत कशी होते, हे पाहायचे.

शिर्डी मतदारसंघामधून महायुतीचे (भाजप) उमेदवार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील विरुद्ध महाविकास आघाडीच्या प्रभावती घोगरे यांच्यात लढत होणार आहे. विखे यांच्याविरोधात या वेळी प्रचंड नाराजी होती. एकास एक लढत आणि कोपरगाव, संगमनेरमधून घोगरे यांना रसद मिळाली असती, तर विखे यांचा कदाचित पराभव झाला असता. त्यांच्या ताब्यातील गणेश कारखाना, पुणतांबे परिसरातील अनेक ग्रामपंचायती विरोधकांनी हिसकावल्या; परंतु आता भाजपच्याच डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी बंड केले आहे. विवेक कोल्हे यांना अमित शाह यांनी शांत केले आहे. त्यामुळे त्यांची मदत विखे विरोधकांना होणार नाही. विखे यांच्या विरोधातील मतांचे विभाजन होणार असल्याने ते विखे यांच्या पथ्यायवर पडणार आहे. श्रीरामपूरमध्ये महायुतीकडून शिवसेनेचे भाऊसाहेब कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे लहू कानडे तर महाविकास आघाडीकडून (काँग्रेस) हेमंत ओगले यांच्यात तिरंगी लढत होत आहे. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रचाराला न आल्याने कांबळे यांना रक्तदाबाचा त्रास झाला. त्यानंतर ते व्हीलचेअरवरून प्रचार करीत असल्याने त्यांच्याविषयी सहानुभूती निर्माण झाली आहे. कोपरगावमध्ये महायुतीकडून आमदार आशुतोष काळे व महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप वर्षे यांच्यात सरळ लढत होईल. राहुरी मतदारसंघात महायुतीचे (भाजप) शिवाजीराव कर्डिले विरुद्ध महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी (शरद पवार) आमदार प्राजक्त तनपुरे यांच्यात पुन्हा लढत होणार आहे. कर्डिले यांनी ही शेवटची निवडणूक असल्याचे सांगत भावनिक आवाहन केले आहे. विखे यांनी तिथेही आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे; परंतु चंद्रशेखर कदम आणि सत्यजीत कदम हे भाजपचे नेते नाराज आहेत. जयंत पाटील यांचा भाचा म्हणून तनपुरे यांचेही पारडे जड असल्याने येथील लढत अधिक रंगतदार होणार आहे. पारनेरमध्ये महायुतीचे काशीनाथ दाते विरुद्ध महाविकास आघाडीच्या राणी लंके यांच्यात लढत आहे. येथेही दोन विजय औटी आणि संदेश कार्ले कुणाची मते खातात, यावर विजयाची गणिते अवलंबून आहेत. श्रीगोंदे मतदारसंघातून महायुतीच्या (भाजप) विक्रम बबनराव पाचपुते विरुद्ध महाविकास आघाडीच्या (शिवसेना ठाकरे अनुराधा नागवडे यांच्यात चुरशीची लढत होणार आहे. येथे माजी आमदार राहुल जगताप आणि अण्णासाहेब शेलार यांचे बंड आहे. नेवाशात महायुतीचे (शिवसेना) विठ्ठलराव लंघे विरुद्ध महाविकास आघाडीतर्फे (शिवसेना उबाठा) आमदार शंकरराव गडाख यांच्यात लढत होत आहे. शेवगावमधून महायुतीच्या आमदार मोनिका राजळे विरुद्ध महाविकास आघाडीचे अ‍ॅड. प्रताप ढाकणे निवडणूक रिंगणात आहेत. याशिवाय माजी आमदार चंद्रशेखर घुले, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य हर्षदा काकडे यांनी बंड केले आहे. मराठा मतांत होणारे विभाजन कदाचित अ‍ॅड. ढाकणे यांच्या पथ्थ्यावर पडण्याची शक्यता आहे.



## मतदारांचा जाहीरनामा

**मुद्दे आणि गुद्दे**

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारण रंगले आहे. सर्व राजकीय पक्षांकडून जाहीरनामा प्रसिद्ध केला जात आहे. सत्ताधारी महायुतीकडून आत्तापर्यंत केलेल्या विकासकामांचा लेखाजोखा मांडण्यात येत आहे. तसेच सत्ता मिळाली तर कोणती विकासकामे केली जातील याची माहिती देण्यात येत आहे. आश्वसानांचा पाऊस या जाहीरनाम्यांमधून पडतो आहे. मात्र सध्या सोशल मीडियावर 'मतदारांचा जाहीरनामा' तुफान व्हायरल होतो आहे. यामधून मतदारांच्या आणि सामान्य लोकांच्या अपेक्षा सांगितल्या जात आहेत.

खडकवासला चौपाटी विकास, रिंग रोडचे काम पूर्णत्वास नेणे, वेल्हे रायगड कोंकण मार्ग जलदगतीने पूर्णत्वास नेणे, जीएसटीमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करणे, लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी नागरिकांना भेटणे, शासकीय कार्यालयातील कामांच्या दिरंगाईवरील उपाययोजना स्पष्ट करणे यासारख्या अनेक मागण्या या जाहीरनाम्यामध्ये केल्या आहेत.



एक मतदार म्हणून आम्हाला आपल्याकडून याच अपेक्षा आहेत. बारसे, वाढदिवस, लग्न समारंभ, उद्घाटन, मैत, दहावे, तेरावे यातील आपल्या उपस्थिती पेक्षा आम्हाला एक लोकप्रतिनिधी म्हणून आपली उपस्थिती आणि कार्यवरील कामांमध्ये अपेक्षित आहे. मतदारांच्या जाहीरनाम्यामध्ये 'आम्हाला नुसताच चमकणारा लोकप्रतिनिधी नको असून, मतदारांचे दैनंदिन जीवन सुकर करण्यासाठी चमकणारा लोकप्रतिनिधी हवा आहे, याची सर्व भावी लोकप्रतिनिधींनी नोंद घ्यावी ही विनंती', असे लिहिण्यात आले आहे.

## समाजाने महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे-प. पू. जितेंद्रजी महाराज यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ नोव्हेंबर**

देशामध्ये आयोध्येचे मंदिर हे लोकवर्गीणीतुन झाले तर अनेक ठिकाणचे मंदिरेही लोकवर्गीणीतुन झाले परंतु देशातील एकमेव पोहरादेवी येथील बंजारा विरासत नंगारा भवनाचे काम शासनाच्या खजिन्यातुन होतेय ही बंजारा समाजासाठी दिलासादायक बाब असुन महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांना समाजबांधवांनी पाठींबा देउन प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन पोहरादेवी संस्थानचे महंत प. पू. जितेंद्र महाराज यांनी केले.

माजलगाव मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांच्या प्रचारार्थ दि. १५ शुक्रवारी जुना मोंढा येथे आयोजित बंजारा समाज मेळाव्यात ते बोलत होते. व्यासपिठावर भाजपा तालुकाध्यक्ष अरूण राउत, राष्ट्वादीचे नेते अच्युत लाटे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, युवा नेते रमेश पवार, भास्कर शिंदे, संतोष पवार, आमेल शेरकर, दिलीप राठोड, अमोल शेरकर, युवराज आडे, उत्तम पवार, गंपु पवार, रामराव पवार, रविनाथ चव्हाण, कैलास चव्हाण, राजेश राठोड, रणजीत राठोड, रविकांत राठोड यांचेसह अनेक समाजबांधवांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना महंत प. पू. जितेंद्र महाराज म्हणाले की, बंजारा काशी पोहरादेवी संस्थानचा विकास हा महायुती शासनाच्या काळातच झाला. सेवालाल तांडा समृध्दी योजनेतुन हजारो कोटी रूपयांचा निधी, पोहरादेवीचे पिठाधिवश्वर प. पू. बाबुसिंग महाराज यांना विधानपरिषदेवर घेवुन समाजाला न्याय दिला आहे. बार्टीच्या धर्तीवर बंजारा समाजासाठी वनआर्टीची स्थापना केली. राज्यातील इतर शासनापेक्षा अधिकच्या व कल्याणकारी योजना महायुती शासनाने राबविल्या असुन त्यांना पुन्हा सत्तेत आणण्यासाठी माजलगावचे महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा विधानसभेत पाठवा असे आवाहनही महंत प. प. जितेंद्र महाराज यांनी उपस्थित समाजबांधवांना केले. यावेळी बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, या राज्याचे मुख्यमंत्री म्हणुन कै. वसंतराव नाईक यांनी तेरा वर्षे काम केले. त्यांच्या मंत्रीमंडळात काम करण्याची संधी माझे वडील कै. सुंदरराव सोळंके यांना मिळाली होती. त्याच काळात माजलगाव धरणाची मुहूर्तमेढ रोवली गेली



आणि आम्ही जेंव्हा या मतदारसंघात सहकारी साखर कारखाना उभारत होतो त्यावेळेस बंजारा समाजाने हजारो शेअर्स खरेदी करून कारखाना उभारणीत बंजारा समाजाने मोठे सहकार्य केले आहे. बंजारा समाजाच आणि माझं गेल्या ३५ वर्षांपासुनचे नात आहे. मी बंजाराला समाजाला राजकारण करत असतांना वेगवेगळ्या संस्थांमध्ये प्रतिनिधीत्व देउन सन्मान केलेला आहे. भविष्यातही समाजाच्या विकासाठी कटीबध्द असल्याचे अभिवचन त्यांनी यावेळी दिले. या सभेला बहुसंख्य तांड्यातील महिला, पुरूष, युवक, युवतींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## माझ्या जनतेच्या एका-एका मताचा उपयोग बीड मतदारसंघाच्या विकासासाठी करणार, पाली,मांजरसुंबा येथील प्रचार बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला विश्वास

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ नोव्हेंबर**

बीड मतदार संघातील जनता आमच्या पक्षासोबत आणि माझ्यासोबत आहे. जनता हीच खरी आमची ताकद असून विरोधकांच्या अपप्रचाराला सूज्ञ जनता कधीही थारा देणार नाही.बीड मतदार संघातील पाली असो की, बालाघाटावरील चौसाळा परिसर कायम येथील जनता खा.शरदचंद्रजी पवार साहेबांसोबत राहिलेली आहे. त्यामुळे विरोधकांनी निवडणुकीच्या प्रचारादरम्यान कितीही आरोप केले तरी त्यांना थारा न देता येत्या २० तारखेला मतदान यंत्रावरील अनुक्रमांक ३, 'तुतारी वाजवणारा माणूस' या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड मतांनी मला पुन्हा एकदा तुम्हा सर्वांची सेवा करण्याची संधी द्या.तुमच्या एका-एका मताचा उपयोग मी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी करणार असल्याचा विश्वास आ. संदीप क्षीरसागर यांनी केले.

बीड विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्याकडे जात असताना आता मतदारसंघातील गावोगावी बीड मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांचे कार्यकर्त्यांसह ठिकठिकाणी मतदार त्यांचे जोरदार स्वागत करत आहेत. गुरुवारी (दि.१४) आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील पाली, मांजरसुंबा या गावांचा दौरा करत कॉर्नर बैठकीत त्यांनी मतदारांना पुन्हा एकदा आपली सेवा करण्याची संधी देण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला मतदारांनी जोरदार प्रतिसाद देत आम्ही तुमच्या सोबत असल्याचे बोलून दाखवले.

# शरद पवार यांची उद्या माजलगावात सभा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१५ नोव्हेंबर**



महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार मोहनराव जगताप यांच्या प्रचारसाठी तरुण योद्धा शरद पवार यांची भव्य जाहिर सभा १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वाजता माजलगाव शहरातील मंगलनाथ मैदान येथे होणार आहे.

बीड जिल्हयात व विशेषतः माजलगाव तालुक्यात शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. पहिल्या टप्यात शरद पवार यांनी बीड जिल्ह्यात केज, परळी, बीड येथे तीन सभा घेतल्या आहेत.

तिसऱ्या व अंतिम टप्यात प्रचारात आघाडीवर असलेले व विजयाच्या समीप असलेले शरद पवार गटाचे अधिकृत उमेदवार मोहन जगताप यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची सभा आयोजित केली आहे.माजलगावचे उमेदवार राष्ट्रवादी पक्षाचे सर्व्हेसर्वा वयाच्या ८४ व्या वर्षातही एखाद्या तरुणास लाजवेल असे न थकता काम करणारे तरुण योद्धा शरद पवार यांचीं ही सभा १७ फेब्रुवारी रविवार रोजी होत असल्याने शरद पवार काय बोलतात हे उत्सुकता लागली आहे.

## विजयसिंह पंडित यांच्या प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**विक्रमी मतांनी विजयी करण्याचे रामतीर्थकरांनी केला निर्धार**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ नोव्हेंबर**



गेवराई विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ रामतीर्थ बीड येथे काढण्यात आलेल्या प्रचार रॅलीला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये निघालेल्या या रॅलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते, मतदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सामान्य माणसाच्या हिताचा विचार करणाऱ्या विजयसिंह पंडित यांना विक्रमी मतांनी विजयी करून विधानसभेत पाठवण्याचा निर्धार रामतीर्थकरांनी केला आहे.

रामतीर्थ (बीड) येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांनी प्रचार रॅली काढून मतदारांशी संवाद साधला. रॅलीची सुरुवात वीर लहुजी साळवे व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण व अभिवादन करून करण्यात आली. या रॅलीमध्ये विविध ठिकाणच्या महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी विजयसिंह पंडित यांना विजयासाठी भरभरून आशीर्वाद दिला. प्रचार रॅलीचा समारोप कॉर्नर बेठकीने झाला.

## मतदारसंघातील चौदा तीर्थ क्षेत्रासाठी आमदार पवारांनी दिला दहा कोटीचा निधी

**शनी देवस्थानासाठी १२५ कोटी रूपयांचा आराखडा तयार**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ नोव्हेंबर**

भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गेवराई मतदारसंघातील चौदा तीर्थ क्षेत्रासाठी आमदार लक्ष्मण पवारांनी दहा कोटीचा निधी विकास कामासाठी दिला असून, भाविकांच्या श्रद्धास्थानांची काळजी घेणारा आमदार म्हणून त्यांनाच मतदार राजा पसंती देत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शनी च्या राक्षसभुवन तीर्थ क्षेत्रासाठी १२५ कोटीचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे.



गेवराई विधानसभा मतदारसंघात तीर्थक्षेत्र विकासासाठी आमदार लक्ष्मण पवार यांनी प्रयत्न करून चौदा तिर्थक्षेत्रासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. गेवराई मतदार संघातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तीर्थ क्षेत्राचा विकास व्हावा म्हणून, आ. पवार यांनी सरकारी दरबारी पाठपुरावा मोठा विकास निधी आणला. मतदारसंघातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या १४ तीर्थक्षेत्रासाठी आमदार पवार यांनी दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. या ठिकाणी दर्जेदार कामे करून घेऊन भाविक भक्तांना सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी जातीने लक्ष घातले. विविध तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा यासाठी आमदार पवार सदैव प्रयत्नशील असतात. गेवराई तालुक्यातील व देशातील साडेतीन पीठा पैकी एक पीठ असलेल्या शनी मंदिर विकासासाठी एक कोटी रुपये चा निधी उपलब्ध करून घेतला आहे. त्याच बरोबर श्री क्षेत्र राक्षसभुवन देवस्थानाला ब दर्जा प्राप्त व्हावा यासाठी विशेष प्रयत्न करून तीर्थक्षेत्र विकासाचा १२५ कोटी रुपयाचा आराखडा शासनास सादर केलेला आहे. हे काम पूर्ण झाल्यास लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या या तिर्थक्षेत्राच्या सोयी सुविधा उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर गेवराई तालुक्यातील ग्रामदैवत तलवाडा येथील त्वरीतादेवीच्या विकासासाठी एक कोटी रुपये, गेवराई शहराच्या जवळील पालख्या डोंगरावरील खंडोबा मंदिराचा विकास करण्यासाठी २ कोटी २५ लाख रुपये, शहरातील चिंतेश्वर मंदिर मंदिरासाठी एक कोटी रुपये, भोजगाव येथील जगदंबा २५ लाख रुपये, भाटेपुरी येथील महादेवाच्या मंदिरासाठी २५ लाख रुपये, चकलंबा येथील रोकडेश्वर मंदिरासाठी २५ लाख रुपये, जातेगाव येथील यमादेवी मंदिरासाठी २५ लाख रुपये, कुंभेजळगाव येथील गोरक्षनाथ संस्थांना चा विकास करण्यासाठी २५ लाख रुपये, सिरसमार्ग येथील संतुआई देवस्थान साठी १ कोटी रुपये, उमापूर येथील उमादेवी संस्थानासाठी ५० लक्ष रुपये, घोसापूरी येथील रामगड देवस्थान साठी ५० लाख रुपये, बहिरवाडी येथील रामतीर्थ कुंड मठाचा विकास साठी ५० लाख रुपये व पिंपळनेर येथील जागृत देवस्थान आशापूर्वक गणपती मंदिरासाठी १ कोटी रुपयाचा निधी आ. पवार यांनी मंजूर करून आणला असून कामे प्रगती पथावर आहेत. गेवराई मतदार संघातील भाविकांच्या श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्रावर सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आमदार लक्ष्मण पवार नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे यातून त्यांनी मतदारसंघातील तीर्थविकासाठी दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला आहे त्याचबरोबर उर्वरित सर्व धर्माच्या तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा यासाठी आमदार पवार प्रयत्नशील राहणार आहेत

## कृषिमंत्र्यांनी बेरोजगारासाठी कुठला उद्योग परळी विधानसभा मतदारसंघात आणला?- राजेसाहेब देशमुख

**कटेंगे-बटेंगे' सोडा परळीतील समस्यावर बोला- बहादुरभाई**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१५ नोव्हेंबर**

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी शहर व विधानसभा मतदारसंघातील बेरोजगार युवकांसाठी कुठला उद्योग आणला. हे परळीतील जनतेला सांगावे. परळी शहर व तालुक्यातील गुंडगिरी, दडपशाही संपवण्यासाठी परळी शहराचा विकास करण्यासाठी मतदार बंधू भगिनींनी मला आपली सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी केले. तर महागाईने सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले



आहे. परळी शहरात कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा नऊ अठरा झाले आहेत. त्यामुळे येथे सुखाने कोणी जगू शकत नाही. अशी दयनीय अवस्था सर्वसामान्य, कष्टकरी, गोरगरिबांची झालेली आहे. कटेंगे-बटेंगे' सोडा महागाईचे बोला, परळी शहरातील समस्यावर बोला असे आवाहन विरोधकांना काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी नेहरू चौक तळ येथील कॉर्नर सभेत केले.

या प्रसंगी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यासह वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्त राजेश देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई, युवा नेते सुनील गुट्टे, नरेश हालगे,राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष देवराव लुगडे महाराज, आदिंसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गेवराई शहरातील साठे नगर व संगमित्रा नगर भागातील असंख्य कार्यकर्त्यांचा लक्ष्मण सेनेत जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ नोव्हेंबर**

गेवराई मतदार संघाचे राजकारण चांगलेच तापले असून अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांचा ऑटोरिक्षा सुसाट सुटला असून त्यांना मतदारांचा वाढता पाठिंबा मिळत असल्याने अनेक कार्यकर्ते त्यांच्या गटात प्रवेश करत असल्याचे दिसत आहे. दरम्यान गेवराई शहरातील साठे नगर व संगमित्रा नगर भागातील असंख्य कार्यकर्त्यांर्ते लक्ष्मण सेनेत दाखल झाल्याने शहरात आ.पवार यांची ताकद वाढल्याचे दिसून येत आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांच्याकडे कुठलाच पक्ष नसून ते अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात आहेत. त्यामुळे त्यांना सर्वच जाती धर्माच्या मतदारांचा पाठिंबा मिळत आहे. तसेच आ.पवार हे आपल्या प्रचार सभेत बोलताना वारंवार सांगत आहेत की, मी निवडून आलो तरी कधीच भाजपात जाणार नाही त्यामुळे त्यांना भाजपच्या विरोधातील मतदारांसह अठरा पगड जाती धर्माच्या मतदारांचा पाठिंबा मिळत आहे. गेवराई शहरातील साठे नगर व संघमित्रा नगर येथील असंख्य कार्यकर्त्यांनी आ.लक्ष्मण पवार यांच्या विकास कामावर विश्वास ठेवून त्यांच्या गटात प्रवेश केला आहे. करण भास्कर हातागळे, भूषण जोगदंड,सचिन तुरुकमारे,संतोष सुतार, विकास जाधव, नितीन कांडे, संतोष गायकवाड, रोहित कोरडे, बुद्धभूषण गायकवाड, शेख दस्तगीर मिस्त्री, करण प्रधान यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी इत्यादी कार्यकर्त्यांनी आ. लक्ष्मण पवार यांच्या विकास कामावर विश्वास ठेवून जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी नगराध्यक्ष देवा धुरंधरे, नगरसेवक आप्पासाहेब कानगुडे, युवा नेते रंजीत खाजेकर, बाळराजे थोरात, राणा कानडे, किशोर काडेकर, पप्पू साळवे, किरण गायकवाड, आकाश खाजेकर नवनाथ धुरंधरे, शेख राजू यांच्यासह आदींची उपस्थिती होती. दरम्यान गेवराई शहरासह तालुक्यातील अनेक कार्यकर्ते त्यांच्या गटात प्रवेश करत असल्याने गेवराई मतदार संघात आ.लक्ष्मण पवार यांचे पारडे जड होताना दिसून येत आहे.

## माजी विद्यार्थी मेळाव्यातून कर्तव्य आणि कृतज्ञतेचा भाव जागृत होतां-बिपीनजी क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ नोव्हेंबर**

कर्तव्य आणि कृतज्ञता ही भारतीय संस्कृतीतील महत्वपूर्ण मूल्य आहेत.माजी विद्यार्थी मेळाव्यातून कर्तव्य आणि कृतज्ञतेचा भाव जागृत होतो असे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक तथा रा.स्व.संघाचे जिल्हा कार्यवाह बिपीन क्षीरसागर यांनी केले.

भा.शि.प्र.संस्थेच्या पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयाच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी निमित्त सन १९९५ ते २०२४ या २९ वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा दि.१५ नोव्हेंबर २०२४ शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आला होता.मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना क्षीरसागर यांनी नागरी कर्तव्य,सामाजिक समरसता,कुटुंब प्रबोधन,पर्यावरण संवर्धन आदी सामाजिक विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.विद्यार्थ्यांनी जातीभेदा पलीकडे जाऊन स्वतःला समाजकार्यात झोकून द्यावे.तसेच स्वकर्तृत्वाच्या बळावर गावातील विद्यार्थी आणि गावकरी यांचे जगणे सुखकर व्हावे याकरिता माजी विद्यार्थ्यांना कर्तव्य आणि कृतज्ञतेची जाणीव या मेळाव्यातून करून दिली.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी श्री.खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाचे अध्यक्ष तथा माजी मुख्याध्यापक उन्मेश मातेकर,मुख्याध्यापक संजयराव विभूते,माजी सरपंच सुधाकरअण्णा निकम तसेच आजी-माजी शिक्षक लक्ष्मण काटे, राम काटे,अजय कुलकर्णी, श्रीमती.मंदोदरी करपे,सतीश बलुतकर उपस्थित होते.सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवर व सर्व माजी विद्यार्थ्यांचे पुष्प आणि पुस्तिका देऊन विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

## विजयसिंह पंडित यांना प्रचंड मतांनी विजयी करा-डॉ.राजीव काळे

**गेवराई मतदारसंघात सावता परिषदेचा झंझावात**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१५ नोव्हेंबर**

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांच्या प्रचारार्थ सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे (काका) यांच्या मार्गदर्शनाखाली सावता परिषदेचे राज्य प्रवक्ते डॉ. राजीव काळे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह मतदारसंघात गावोगावी भेट देऊन मतदारांशी संवाद साधताना विजयसिंह पंडित यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

गेवराई विधानसभा मतदारसंघात सावता परिषदेच्या वतीने पाडळसिंगी, मादळमोही, कोळगाव, बंगाली पिंपळा, चकलंबा, उमापुर, धोंडराई, तलवाडा, केकत पांगरी, रोहितळ, जातेगाव, वाहेगाव, ब-हाणपुर आदि गावांमध्ये जाऊन मतदार बांधवांना विजयसिंह पंडित यांना विजयी करण्याचे आवाहन केले. मतदारांशी संवाद साधताना डॉ. काळे म्हणाले की, गेवराई विधानसभा मतदार संघात अमरसिंह पंडित यांचे रचनात्मक व धोरणात्मक कामामुळे या मतदारसंघातील विकास अधिक गतिमान करण्यासाठी विजयसिंह पंडित यांचा विजय निश्चित आहे. शाश्वत विकासाचा आणि लोकोपयोगी धोरणाचा वारसा विजयसिंह पंडित यांच्याकडे असल्याने या मतदार संघातील सुजाण जनता कोणत्याही भुलथापांना बळी न पडता महायुतीचे सरकार राज्यात निर्माण करण्यासाठी घड्याळ या चिन्हासमोर बटण दाबून विजयसिंह पंडित यांना विधिमंडळाच्या विधानसभा सभागृहात या भागाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठवण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले विजयाचा गुलाल यंदा विजयसिंह पंडित यांच्याकडे असल्याचेही ते म्हणाले.


**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई**

दीनदयाळ भवन, बस डेपो जवळ, परळी रोड, अंबाजोगाई,
जि. बीड - ४३१५१७
फोन नं. (२४४६) २४६९२६/२७ । फॅक्स नं. (२४४६) २४६९२७

( सरफेसी कायदा, २००२ च्या २(१) (zd) नूसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार )

जा.क्र./सरफेसी/०६/७००२-१६२/१२८/२०२४-२५ दिनांक: १२/११/२०२४

**नोंदणीकृत पोस्ट / जाहिरातीद्वारे**

प्रति
१. श्री कराड सुरेश नामदेवराव (कर्जदार)
पत्ता:- कृष्णाई निवास, माळी नगर, अंबाजोगाई, जि. बीड- ४३१५१७
२. श्री मुंडे भागवत बाबुराव
पत्ता:- मु.- सोनहिवरा, पो.- नागापुर, ता. परळी वै. जि. बीड ४३१ ५३०
३. श्री. गंभीर संजय शहाजी
पत्ता:- वॉर्ड नं.- १८, गंभीर निवास, हनुमान मंदीरशेजारी, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड ४३१५१७
४. श्री. तांबडे गोपाळ शंकरराव
पत्ता:- मु. पो.- शिरूर घाट, ता. केज, जि. बीड ४३१ १२३

**(कायद्याच्या २(१) (f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)**

**सिक्युरिटायझेशनच्या १३ (२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,

विषयः- नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढून टाकण्याची मागणी आमची

शाखाः परळी रोड अंबाजोगाई

सूचनाः- U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षित्तीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१) तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.

२) पासुन तुमचे कर्जखाते दिनांक २०/०६/२०२३ पासून एन.पी.ए. (NPA) झाले आहे.

३) क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेतः

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. मुदती कर्ज १६२ रू. २७,००,०००/- | मालमत्ता धारक श्री कराड सुरेश नामदेवराव यांचे मौजे अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील न. प. घर क्र. ९-२२७५, प्लॉट नं. १, ज्याचा सर्व्हे नं.- १७३/२, असून क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम-दक्षिण बाजु १४.५५, पुर्व-पश्चिम-उत्तर बाजु १४.६८ मी., व दक्षिण-उत्तर बाजु १५ मी. असे एकुण २१९.२२ चौ. मी. जागा व त्यावर बांधकाम असुन ज्याच्या चतुःसिमा खालीलप्रमाणेः पुर्वः रस्ता. पश्चिमः चिखलीकर यांचे घर, दक्षिणः दहिफळे यांचे घर. उत्तरः रस्ता. ('वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत') | मुद्दल + व्याज एकुण रु. १९,६५,७१४/- अधिक दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.११.२०२४ पासून |

• वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
• अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४) घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ) प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २२/०१/२०२१
ब) गहाणखत नोंदणी दिनांक २१/०१/२०२१ (गहाणखत नोंदणी क्र. ४८६/२०२१)

५) म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६) वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल + व्याज एकुण रु. १९,६५,७१४/- दिनांक ३१/१०/२०२४ अधिक दिनांक ०१/११/२०२४ पासून पुढील व्याज @ ११.८५% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक १३/०१/२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही आणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात
कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहेः
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

(श्री. अनंत गोपाळराव देशपांडे )
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**
मुख्यालय - अंबाजोगाई. मो. ७६६६५७७९००

**ठिकाण :** अंबाजोगाई



**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई**

दीनदयाळ भवन, बस डेपो जवळ, परळी रोड, अंबाजोगाई,
जि. बीड - ४३१५१७
फोन नं. (२४४६) २४६९२६/२७ । फॅक्स नं. (२४४६) २४६९२७

( सरफेसी कायदा, २००२ च्या २(१) (zd) नूसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार )

जा.क्र./सरफेसी/०२/७०५२-०२/१२९/२०२४-२५ दिनांक: १२/११/२०२४

**नोंदणीकृत पोस्ट / जाहिरातीद्वारे**

प्रति
१. श्री लटपटे मंचक पाटलोबा (कर्जदार)
पत्ता:- मु. पो.- कोंद्री, ता.- गंगाखेड, जि. परभणी- ४३१ ५१४
२. सौ. लटपटे सुषमा मंचक (सह-कर्जदार)
पत्ता:- मु. पो.- कोंद्री, ता. गंगाखेड, जि. परभणी- ४३१ ५१४
३. श्री. मुंडे अरुण नागोराव
पत्ता:- मातोश्री निवास, शासकीय विश्राम गृहाजवळ, विद्या नगर, परळी (वै.), जि. बीड- ४३१ ५१५
४. श्री. मुंडे अरुण बाबुराव
पत्ता:- मु.- सोनहिवरा, पो. नागापुर, ता. परळी (वै.), जि. बीड- ४३१ ५३०

**(कायद्याच्या २(१) (f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)**

**सिक्युरिटायझेशनच्या १३ (२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,

विषयः- नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढून टाकण्याची मागणी आमची

शाखाः मुख्य शाखा अंबाजोगाई

सूचनाः- U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षित्तीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१) तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.

२) पासुन तुमचे कर्जखाते दिनांक ११/०४/२०२४ पासून एन.पी.ए. (NPA) झाले आहे.

३) क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेतः

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील / गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. मुदती कर्ज ७०५२-०२ रू. २५,००,०००/- | मालमत्ता धारक श्री लटपटे मंचक पाटलोबा महाजन माळा, सावता माळी चौक, अंबाजोगाई येथील सर्व्हे नं. ३४६/१, न. प. मा. क्र. ९/२३२८/१, प्लॉट क्र.- ११, पुर्व पश्चिम ०६ मीटर, दक्षिण उत्तर १२ मीटर असे एकुण ७२ चौ. मी. जागा असुन ज्याच्या चतुः सिमा खालीलप्रमाणेः- पूर्वः प्लॉट नं.- १२. पश्चिमः प्लॉट नं. ११ मधील शिल्लक प्लॉट विलास गुजर दक्षिणः ०९ मी. चा रस्ता. उत्तरः- सर्व्हे नं. ३४६/१ मधील किशनराव महाजन यांची प्लॉटींग ('वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत') | मुद्दल + व्याज एकुण रु. २३,२०,१८२/- अधिक दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पुढील व्याज @ ९.००% दिनांक ०१.११.२०२४ पासून |

• वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
• अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४) घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ) प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक १२/११/२०२१
ब) गहाणखत नोंदणी दिनांक १२/११/२०२१ (गहाणखत नोंदणी क्र. ५२२०/२०२१)

५) म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६) वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल + व्याज एकुण रु. २३,२०,१८२/- दिनांक ३१/१०/२०२४ अधिक दिनांक ०१/११/२०२४ पासून पुढील व्याज @ ९.००% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक १३/०१/२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही आणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात
कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहेः
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणाऱ्याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

(श्री. अनंत गोपाळराव देशपांडे )
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**
मुख्यालय - अंबाजोगाई. मो. ७६६६५७७९००

**ठिकाण :** अंबाजोगाई

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मतदानाविषयी जनजागृती : पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी मानवी साखळीतून साकारला महाराष्ट्राचा नकाशा



## जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांना, नातेवाईकांना व शेजाऱ्यांना मतदान करण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.या निवडणुकीत जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात मोठ्या संख्येने जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे यासाठी मतदान जागृती कक्षाच्या (स्वीप) वतीने आज १४ नोव्हेंबर रोजी पोद्दार इंटरनॅशनल स्कूल,धाराशिव येथे मतदानाबाबत पोदारच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळीतून महाराष्ट्राचा नकाशा साकारला.

मतदानाविषयीच्या या जनजागृती कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाविषयी शपथ देऊन त्यांच्या पालकांना, नातेवाईकांना तसेच शेजाऱ्यांना जास्तीत जास्त संख्येने मतदान करायला जाण्यास प्रवृत्त करण्याचे आवाहन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, शिक्षणाधिकारी अशोक पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी ढाकणे, पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका रमय्या यांची प्रमुख उपस्थिती होती.

मतदान जनजागृती कार्यक्रमात विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच शिक्षक व कर्मचारी सहभागी झाले होते.

# ज्ञानराज चौगुले यांना विक्रमी मताधिक्य देऊ या : माजी मंत्री बसवराज पाटील



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ नोव्हेंबर -**

आमदार ज्ञानराज चौगुले यांनी उमरगा-लोहारा मतदार संघात अतिशय चांगले काम करून मागील १५ वर्ष मध्ये आपल्या कर्तृत्वाची मोहोर उमटवली आहे. चौगुले यांची विकासकामांच्या माध्यमातून जनतेशी नाळ जोडली आहे. मतदारसंघाचा विकास आणखी गतीने होण्यासाठी त्यांना विक्रमी मताधिक्य देऊन विजयी करूया, असे आवाहन माजी मंत्री व भाजप नेते बसवराज पाटील यांनी केले.

शिवसेना महायुतीचे उमेदवार ज्ञानराज चौगुले यांच्या प्रचारार्थ कार्यकर्ता मेळावा मुरूम मोड, येणेगूर येथे संबोधित करत होते. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकचे बापुरावजी पाटील, अॅड. विश्वनाथ पत्रिके, उल्हास घुरघुरे, विष्णू पाटील, शिवलिंग माळी, अनिल उर्फ पप्पु सगर, बसवराज कारभारी, दीपक मुळे, प्रशांत काळे, योगेश राठोड, हरी लोखंडे, शौकत पटेल, विक्रम मस्के, माजी उपसभापती बुद्धिवंत साखरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी मंत्री बसवराज पाटील यांनी सांगितले की, चौगुले हे शांत, संयमी, सकारात्मक नेतृत्व आहे. राज्यातील अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या २९ मतदारसंघांमध्ये सर्वाधिक मताधिक्याने चौगुले निवडून द्यावे असे सांगितले.

## महायुतीचे उमेदवार आ. चौगुले यांचा उमरगा तालुक्यातील डॉक्टरांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ नोव्हेंबर -**

२४० उमरगा लोहारा विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना - भारतीय जनता पार्टी - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - रयत क्राती संघटना - लहुजी शक्ती सेना - बंजारा क्रांती दल व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ज्ञानराज चौगुले यांनी गुरूवार दि.१४ रोजी उमरगा येथे आय.एम.ए. चे सर्व पदाधिकारी, डॉक्टर्स यांच्याशी संवाद साधला.

उमरगा-लोहारा तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी सहकार्य करावे असे आवाहन चौगुले यांनी यावेळी केले.

# जागतिक मधुमेह दिन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव यांच्या वतीने बाह्य रुग्ण विभागामध्ये जागतिक मधुमेह दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक औषध वैद्यकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रविण डुमणे यांनी केले. बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण हे वाढताना दिसून येत असून मधुमेहावर नियंत्रण ठेवायचे असल्यास योग्य व सकस आहार, नियमित व्यायाम आणि नियमित औषधोपचार या त्रिसूत्रीमुळे मधुमेह नियंत्रणात राहू शकेल. अंतर भरणे आणि अडथळे तोडणे हे या वर्षीचे घोषवाक्य असून वर्षभरात या घोषवाक्यनुसार विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



यावेळी डॉ. विक्रांत राठोर यांनी राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या वतीने उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मधुमेही रुग्णांना देण्यात येणाऱ्या उपचाराविषयी माहिती दिली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी वय वर्ष ३० च्या पुढील सर्व व्यक्तींनी नजीकच्या शासकीय दवाखान्यामध्ये आपली नियमित आरोग्य तपासणी करावी जेणेकरून अशा तपासणी मधून मधुमेह आणि इतर असंसर्गजन्य आजाराचे निदान होऊन रुग्णांना योग्य उपचार मिळण्यास मदत होईल असे त्यांनी यावेळी आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी प्रभारी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन भोसले, निवासी बाह्यसंपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागनाथ धर्माधिकारी, डॉ. इस्माईल मुल्ला, औषध वैद्यकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सौरभ पाटील, सहाय्यक प्राध्यापिका डॉ. शितल पिसाळ तसेच वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनी तसेच परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी वैद्यकीय महाविद्यालयातील द्वितीय वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मधुमेह आजाराविषयी एक पथनाट्य सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार संतोष पोतदार यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमातील अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# २० नोव्हेंबरपर्यंत साजरा होणार बाल कामगार प्रथा विरोधी सप्ताह

## विविध उपक्रमांचे आयोजन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

बालदिन या दिवसाचे औचित्य साधून १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर दरम्यान बाल कामगार प्रथेविरोधी सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्ताने जिल्ह्यात जिल्हा कार्यक्षेत्रातील बाल कामगार बहूलक्षेत्र निश्चित करणे, जिल्ह्यातील विटभट्टी



येथे भेटी देवून तपासणी करणे आणि मालकांकडून, चालकाकडून बालकामगार न ठेवणेबाबतचे हमीपत्र लिहून घेणे, जिल्ह्यातील हॉटेल असोसिएशन यांच्या बैठका घेऊन त्यांना सुधारीत बाल कामगार अधिनियमाबाबत माहिती देणे, जिल्ह्यातील सर्व व्यवसायातील व्यापारी संघटनाचे एकत्रित चर्चा सत्र घेणे, बाल कामगार प्रथेविरुद्ध जिल्ह्यातील बाजारपेठ क्षेत्रात रॅली घेणे, सार्वजनिक ठिकाणी बाल कामगार अधिनियमाबाबत जनजागृती करणे, जिल्ह्यातील सर्व दुकाने व आस्थापना येथे बाल कामगार कामावर न ठेवण्याबाबत स्टीकर, पॉम्प्लेट तयार करुन प्रदर्शित करणे, जिल्ह्यातील औद्यागिक क्षेत्रातील सर्व मालक संघटनांची बैठक घेऊन तेथे बाल कामगार प्रथेविरुद्ध चर्चा करुन जनजागृती करणे आणि त्यांना बालकामगार कामावर ठेवू नये म्हणून सामुदायिक शपथ कार्यक्रम आयोजित करणे आदि कार्यक्रम या सप्ताहादरम्यान घेण्यात येणार आहे.

बालकामगारांशी निगडित काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांच्या सहकार्याने अत्यल्प उत्पन्न असलेल्या क्षेत्रामध्ये पालकांचे प्रबोधन करणे, पत्रके वाटणे, वस्तीमधील लोकांना बाल कामगार निर्मुलन कार्यक्रमात सामावून घेणे, जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना घरेलू कामगार म्हणून बाल कामगारांना न ठेवण्याबाबत आवाहन करणे, प्रत्येक जिल्हा कार्यालयाने त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी, अधिकाऱ्यांना बाल कामगार प्रथेविरुद्ध संवेदनशिल करण्याकरीता कार्यक्रमांचे आयोजन करणे इत्यादी. तसेच बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ नुसार १४ वर्षाखालील बालकांना कोणत्याही व्यवसाय, प्रकियेत कामावर ठेवणे तसेच १४ वर्षे पूर्ण न झालेल्या किशोरवयीन मुलांना धोकादायक उद्योग व प्रक्रियामध्ये कामावर ठेवणे गुन्हा आहे. जर मालकाने, नियोक्त्याने बाल अथवा किशोरवयीन मुलांना कामावर ठेवल्यास त्यास ६ महिने ते २ वर्षापर्यंत कारावास किंवा २० हजार रुपये ते ५० हजार रुपयेपर्यंत दंड किंवा दोन्हीही अशी शिक्षा होऊ शकते.

त्यामुळे बाल अथवा किशोरवयीन मुलांना कामावर ठेवु नये, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे यांनी केले आहे.

# लोकशाही पायदळी तुडवणाऱ्या प्रवृत्तीला ठेचून आपला स्वाभिमानी बाणा दाखवून द्या : आ. पाटील



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ नोव्हेंबर -**

हा बाण बाळासाहेबाचा नाही तर मोदी शहा यांनी चोरलेला बाण आहे. अश्या लोकशाही पायदळी तुडवणाऱ्या प्रवृत्तीला ठेचुन आपला स्वाभिमानी बाणा दाखवून द्यावा असे आवाहन आमदार कैलास पाटील यांनी जनतेला केले. तालुक्यातील खडकी येथे आयोजित सभेत महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास पाटील बोलत होते. यावेळी त्यांनी थेट भाजप सरकारवर आक्रमक शब्दांत टीका केली.

आ. पाटील म्हणाले, हिंदुत्ववादी म्हणून गळा काढणारे भाजपच हिंदुत्व नकली आहे.

अन्यथा यांनी हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पश्चात त्यांचा पक्ष फोडला नसता, त्यामुळे ज्या चिन्हावर बाळासाहेबाचा निष्ठावंत प्रेम करायच तेच चिन्ह देखील चोरून यांना मताची भीक मागावी लागत आहे. हा बाण बाळासाहेबाचा नाही तर मोदी शहा यांनी चोरलेला आहे. याचा बदला जनतेने लोकसभेच्या निवडणुकीत घेतला आहे. पण गद्दारी गाडून पुन्हा एकदा महाविकास आघाडी सत्तेत आल्यास उद्धव ठाकरे यांना न्याय मिळणार आहे असे मत आमदार पाटील यांनी व्यक्त केले.

मोठ्या व्यापारी वर्गाला फायदा करून देण्यासाठी भाजप सरकारने सामान्यांच्या जीवनात अडथळे उभे केले आहेत. चॉकलेट, कोका-कोला, पेप्सी यांसारख्या महागड्या वस्तूंच्या किंमतीत वाढ झाली, तरी सामान्यांच्या जीवनावर त्याचा फारसा परिणाम होत नाही.

पण या वस्तू तयार करणाऱ्या उद्योगपतींना सवलत देण्यासाठी भाजप सरकारने साखरेच्या निर्यात बंदीचा निर्णय घेतला. यातूनच हे स्पष्ट होते की, भाजपचे धोरण हे मोठ्या व्यापाऱ्यांना सोयीस्कर आहे, तर दुसरीकडे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले, शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करत भाजपने शेतकरी विरोधी धोरण राबवली आहेत. शेतकऱ्यांना लागणाऱ्या खतावर १८% ऋद्ध आहे, ज्यामुळे त्यांना वाढीव खर्च सहन करावा लागत आहे. दुसरीकडे, हेलिकॉप्टरसारख्या आलिशान वस्तूंवर मात्र ५ टक्के जीएसटी लावला जातो. ट्रॅक्टरसारख्या शेतकरी गरजेच्या वस्तूंवर हा कर अधिक असून, भाजप सरकारने शेतकऱ्यांना संपन्न समजून त्यांच्या गरजांना दुर्लक्षित केले आहे.

त्यांनी उद्योगपतींच्या कर्जमाफीचा मुद्दा उपस्थित करत भाजप सरकारवर निशाणा साधला, जेव्हा उद्योगपतींच्या १५ लाख कोटी रुपयांच्या कर्ज माफ केल्या जातात, तेव्हा शेतकऱ्यांसाठी मात्र विविध अटी-शर्ती लावून त्यांना कर्जमाफीपासून दूर ठेवले जाते. मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवत फक्त आपल्याच आर्थिक पायऱ्यांची सोय केली आहे.

महायुतीच्या 'लाडकी बहिण योजना'वर देखील आ. पाटील यांनी तीव्र शब्दांत टीका केली. लोकसभेत भाजपचा पराभव झाल्यानंतर निवडणुकीच्या तोंडावरच ही योजना सुरू करण्यात आली आहे.

या योजनेला 'लाडकी बहीण' असे नाव दिले असले तरी, ही योजना लाडक्या खुर्चीसाठी तयार करण्यात आली आहे. भाजपने जनतेच्या मतांचा अनादर करत सत्ता गुवाहाटीमार्गे घेतली, आणि आता निवडणुकीच्या तोंडावर केवळ मतांसाठी महिला मतदारांना भुलविण्याचे पाऊल उचलले आहे,असे आ. पाटील यांनी सांगितले.

आ. पाटील पुढे म्हणाले की, महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. गॅस, तेल, जीवनावश्यक वस्तूचे दर प्रचंड वाढलेले असताना भाजप सरकारच्या 'लाडकी बहीण योजने'तून काहीही लाभ होणार नाही. योजना केवळ मतांसाठीचा एक पोकळ गाजावाजा आहे, ज्यातून सर्वसामान्य महिलांना दिलासा मिळण्याची शक्यता कमीच आहे, असे ते म्हणाले.

# नॅचरल शुगर येत्या गाळप हंगामामध्ये ७.०० लाख मे.टन ऊस गाळप करणार : बी.बी. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

धाराशिव, लातूर व बीड जिल्हयातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वरदान ठरलेल्या नॅचरल शुगरच्या २३ व्या गाळप हंगामाचा शुभारंभ, मागील गळीत हंगामात कारखान्यास गाळपासाठी जास्तीत जास्त ऊस पुरवठा करणारे ऊस उत्पादक श्री.राकेश रामकृष्ण माकोडे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.नुतन राकेश माकोडे यांचे शुभहस्ते विधीवत पूजा करून आणि नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांचे अध्यक्षते खाली बुधवार दि.१३ नोव्हेंबर रोजी संपन्न झाला.

हंगाम शुभारंभ प्रसंगी कृषिरत्न बी.बी.ठोंबरे म्हणाले की, नॅचरल शुगरचे कार्यक्षेत्रात मागील हंगामात लागवड केलेल्या व खोडवा ऊस सभासद व बिगर सभासद यांचे ७००० हेक्टर क्षेत्राची ऊस नोंद कारखान्याकडे झालेली असून किमान ७ ते ७.५ लाख टन ऊस गाळपासाठी यावर्षी



कांही प्रमाणात गेटकेन मधूनही ऊस गाळपास घ्यावा लागेल. नॅचरल शुगरने मागील लागवड हंगामा मध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विविध योजनांचे माध्यमातून कार्यक्षेत्रा मध्ये ऊस लागवडीचा प्रोग्राम हाती घेवून तो वाढवला आणि त्याचे फलीत म्हणजे नॅचरलचे कार्यक्षेत्रामध्ये दुष्काळी परिस्थितीतही कांही प्रमाणात ऊस लागवड आणि खोडवा ऊसाचे संगोपन केल्याने कारखाना कार्यक्षेत्रामध्ये ऊसाचे क्षेत्र चांगले दिसून येत आहे . कारखान्याकडे नोंदवलेला सभासद व बिगर सभासदांचा संपूर्ण ऊस तोडणी प्रोग्राम प्रमाणे गाळपास स्वीकारला जाणार आहे.

पुढे बोलताना बी.बी. ठोंबरे म्हणाले की, नॅचरल शुगरकडे येत्या गळीत हंगामासाठी सभासद आणि बिगर सभासद यांचे ऊसाची एकूण नोंद ७००० हेक्टर झाली असून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त गाळप करणेसाठी कारखान्याची गाळप क्षमता वाढवून चालु गळीत हंगामा मध्ये प्रतिदीन ७५०० मे.टन गाळप करण्यासाठी कारखान्यामध्ये अत्याधुनीक मशीनरीची उभारणी केली असल्याने बिगर सभासदांनाही न्याय देण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

नॅचरल शुगर यावर्षी प्रतिदीन १.७५ लाख लि. ईथेनॉलचे उत्पादन करणार असून त्यासाठी लागणारे बी हेवी मोलासेसचे जास्तीत जास्त उत्पादन घेणार आहे. त्यामुळे प्रोसेससाठी लागणारा वेळ हा कमी होवून, जास्तीत जास्त दैनंदीन गाळप याही वर्षी होणार असल्याने सभासदांचा व बिगर सभासदांचा ऊस वेळेत म्हणा किंवा वेळे पूर्वीही गाळपास येणार आहे. मागील गळीत हंगामामध्ये नॅचरल शुगरचे कर्मचारी, ऊस तोड, वाहतुक ठेकेदार यांनी चांगले काम केल्याने त्यांचा यथोचीत सत्कार करून प्रथम, द्वीतीय व तृतीय क्रमांकाचे ठेकेदारांना रोख बक्षीसही देण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सुत्र संचालन व प्रास्ताविक कारखान्याचे संचालक कृषिभूषण पांडूरंग आवाड यांनी केले आणि प्रवर्तक किशोर डाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमास कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, ऊस तोडणी व वाहतुक ठेकेदार, सभासद, कारखान्याचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या मतांचा वापर करा : खा. चंद्रशेखर आझाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ नोव्हेंबर -**

स्वातंत्र्यापूर्वी दलित, महिला व गरिबांवर अन्याय अत्याचार मोठ्या प्रमाणात केले जात होते. पूर्वी राणीच्या पोटातून राजा जन्माला जात होता. त्याला शिक्षण नसले तरी किंवा अत्याचारी असला तरी तो राजाच राज्य करायचा. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वांना मताचा अधिकार दिला आहे. या माध्यमातून राजा निवडण्याची मोठी शक्ती दिली असून आपल्यावरील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी मताच्या वापर करून आपणच शासनकर्ती जमात व्हावे यासाठी मोठी शक्ती दिलेली आहे. मात्र मोठ्या घरातील व्यक्ती, हेलिकॉप्टर व आलिशान गाड्यांमध्ये फिरणारी मंडळी गरिबाकडे येऊन त्यांच्या झोपडीमध्ये जाऊन जेवण करतात व आपण दोघे भाऊ भाऊ असे म्हणून त्यांचे मत घेऊन निवडून येतात व राज्य करतात. तेच पुन्हा आपल्यावर अन्याय अत्याचार करीत असल्यामुळे आपण आपल्या मताचा आपणच राजा होण्यासाठी आपल्याच समाजातील व्यक्तीला निवडून द्यावे, असे आवाहन आझाद समता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा खासदार चंद्रशेखर आझाद रावण यांनी दि.१५ नोव्हेंबर रोजी केले.



ते आजाद समता पार्टीचे उमेदवार भैय्यासाहेब नागटिळे यांच्या प्रचारार्थ बोलत होते. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


जोडपत्र ४७
प्रपत्रे क्र-१ ते सी ८ आणि क / सीएअ
प्रपत्र क्र- १
(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शन मध्ये प्रसिद्ध करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव व पत्ता :- **अमीर इब्राहिम शेख**
मु.पो. अपसिंगा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव
राजकीय पक्षाचे नाव :- **अपक्ष**
निवडणूकीचे नाव :- **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४**
(अपक्ष उमेदवारांनी येथे "**अपक्ष**" असे (लिहावे)
निवडणुकीचे नाव :- **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४**
मतदार संघाचे नाव :- **२४१ - तुळजापूर विधानसभा**

मी, **अमीर इब्राहिम शेख**, वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे. :-

| अ. क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नांव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, तुळजापूर | RCC NO. २५५/२०२३ | पोलिस स्टेशन तुळजापूर गु.र.नं. २१९/२०२३ ३२४,३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि. धराधरी (मारहाण) बाबत विरोधातील गुन्हा |

**(ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशिल जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा**

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नांव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| १ | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीत नाव नमूद करावे.

**टीप :-**
**१.** उमेदवाराविरूद्धच्या प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्याबाबतचा तपशील ठळक अक्षरात असावा. **२.** वृत्तपत्रांमधील मजकूर किमान १२ या टंक (फॉन्ट) आकारात प्रसिद्ध केला जाईल. **३.** प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र ओळीमध्ये स्वतंत्रपणे तपशील देण्यात यावा. **४.** जर उमेदवार विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवत असेल तर त्याने/तिने पक्षाला त्याच्या/तिच्या विरूद्ध प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबत कळविणे आवश्यक आहे. **५.** उमेदवार अशा प्रसिद्धीनंतर तात्काळ फौजदारी खटल्यांबाबत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धीबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवेल. याशिवाय, तो निवडणुकीचा निकाल घोषीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवडणूक खर्चाच्या हिशेबासह प्रपत्र सी-४ मध्ये प्रकरणांच्याबाबतीत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धीबाबतचा अहवाल सादर करील.
**(अ)** लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्याबाबतीत, हे संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल. **(ब)** राज्यसभा व राज्य विधानपरिषदेच्या निवडणूकीच्या बाबतीत हे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल. हे उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिनाकाच्या दुसऱ्या दिवसापासून आणि मतदानाच्या दिनांकापूर्वी दोन दिवस अगोदरपर्यंत वृत्तपत्र व दूरदर्शनवर प्रसिद्ध केले जाऊ शकते.

**स्वाक्षरित/-**
**अमीर इब्राहीम शेख**
**अपक्ष उमेदवार**
**२४१ - तुळजापूर विधानसभा**